# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख : तहकुब

| | |
|---|---|
| विषय | मा. महासभा / महापालिका |
| | दि: ११/02/2018 |
| | रोजी स: ११:00 वाजता |
| | प्रकरण : 8 - 83 ते 84 |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : व दुपारी : 3:00

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | ८ |

१२/१८

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/२०६ /२०१३-१४ दिनांक :-२६/०२/२०१४.

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा मंगळवार दि. ११/०२/२०१४ रोजी दुपारी ठिक ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा वेळे अभावी तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ८७ ते ९५ व पुरक घोषणा क्र. ९६ ते ९९ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **शनिवार, दिनांक ०१/०३/२०१४ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या आदेशाने.**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ३०/०१/२०१४.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०९, दिनांक ३०/०१/२०१४.**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ______________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा मंगळवार दि. ११/०२/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०९, दि. ३०/०१/२०१४ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक ०९, दि. ३०/०१/२०१४ सोबतची विषय पत्रिका**
**सभा मंगळवार दि. ११/०२/२०१४**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ८३ | दि. १९/११/२०13 रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – |
| ८४ | स्थायी समितीच्या एका सदस्याने राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये एक (१) सदस्याची नेमणूक करणे.<br>राजीनामा दिलेल्या सदस्याचे नांव :- १) श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी. (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष) |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ८५ | राष्ट्रीय फेरिवाला धोरण अंमलबजावणी करणेबाबत. |
| ८६ | शहरातील पावसाळ्यापूर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे व इतर आरोग्य विभागाच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत. |
| ८७ | महापालिका प्रस्तावित घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणीकामी मंजूरी मिळणेबाबत. |
| ८८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी इमारतीवर वेदरशेड उभारणेकरीता सुधारीत धोरण निश्चित करणेबाबत. |
| ८९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ९६ (खेळाचे मैदान) व आरक्षण क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाचे करारनाम्याबाबत. |
| ९० | मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत. |
| ९१ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीच्या स्ट्रीट लाईट पोलचे वार्षिक मुदतीने देखभाल, दुरस्ती करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| ९२ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) रेन्टल हाऊसिंग स्कमीद्वारे प्राप्त होणाऱ्या सदनिकांचे वाटप करण्यासाठी धोरण निश्चित करणेबाबत. |
| ९३ | महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयीसुविधांच्या विकास कामासाठी विशेष अनुदानातून करावयाच्या विकास कामांना मान्यता देणे. |
| ९४ | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम महानगरपालिका हद्दीत राबविणेस मंजूरी मिळणेबाबत. |
| ९५ | मौजे नवघर येथील महानगरपालिकेने विकसित केलेल्या जागेचा मोबदला मिळणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महानगरपालिका सचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- ३० जानेवारी २०१४**

# मा. महासभा

# दि. १९/११/२०१३

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. १९/११/२०१३**

आज मंगळवार दि. १९/११/२०१३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ७ दि. ०७/११/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | भोईर राजू यशवंत | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ८) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ९) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| १०) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ११) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १४) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १५) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १६) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १७) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १८) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १९) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २०) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २१) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २२) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २३) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २४) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २५) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २६) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २७) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २९) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३०) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३१) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३२) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३३) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३४) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३५) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३६) | शरद केशव पाटील | गटनेता, भारतीय जनता पार्टी |
| ३७) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३८) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३९) | शुभांगी महिंन कोटियन | सदस्या |
| ४०) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४१) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४२) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४४) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४५) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४६) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४७) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४९) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ५०) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५१) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५२) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५३) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५४) | झिनत रऊफ कुरेशी | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५५) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५७) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५८) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ५९) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६०) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६१) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६३) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६४) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६५) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६६) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६७) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६८) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६९) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७०) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७१) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७२) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७३) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७४) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७५) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७६) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७७) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७८) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७९) | सुमबंड महरूंन्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८०) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८१) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८२) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८३) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८४) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८५) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८६) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८७) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| २) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| ३) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ५) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ६) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ७) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ८) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ९) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| १०) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |

<u>रजेचा अर्ज – निरंक</u>

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरिता उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करीत आहे. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी माझी विनंती आहे. तसेच सचिन तेंडुलकर यांनी २०० कसोटी पूर्ण करुन निवृत्ती घेतलेली आहे. त्यांनी क्रिकेट करिता दिलेले योगदान लक्षात घेता त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. भारत सरकार तर्फे सचिन तेंडूलकर व ज्येष्ठ वैज्ञानिक सी.एन.आर.राव यांना भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार जाहिर करण्यात आलेला आहे याबद्दल त्यांचे अभिनंदन. सचिवांनी सभेस सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा मंगळवार दि. १९/११/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०७, दि. ०७/११/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करीत आहे. ११.३० झाले आहेत. सन्मा. मदन उदित नारायण सिंग ह्यांचा प्रश्न आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम माझा प्रश्न अर्धा राहीला होता तो पुन्हा आणल्याबद्दल धन्यवाद. मा. आयुक्त साहेब आपला हा जो प्रश्न आहे. आरक्षण आणि नगररचनेशी संबंधीत आपल्या शहरात जे ३८६ आरक्षण डिक्लेयर केले आहेत. ३८६ पैकी किती आपल्या ताब्यात आले आहेत आणि किती आपण डेव्हलप करतो, किती अजून शिल्लक आहेत ह्याची मला माहिती पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. मिरा भाईंदर शहराचा डेव्हलपमेंट प्लान दि. १४/५/९७ ला मंजुर झाला आणि तो दि. १५/७/९७ ला अमलात आला आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना २००० ला मंजुर होऊन दि. १५/८/२००० पासून अमलात आली आहे. आपल्या डेव्हलपमेंट प्लानमध्ये जी टोटल आरक्षण आहेत ती आरक्षण ताब्यात घेण्याच्या संदर्भात आपल्याकडे जी कायद्याची प्रोसीजर विहीत केलेली आहे त्यानुसार आरक्षण आपल्या वाटाघाटीने ताब्यात घेता येतील. जमिन मालकाची संमती असेल तर टी.डी.आर देऊन ताब्यात घेता येईल. त्या उपरही महापालिकेला निकडीच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी ताब्यात घेणे आवश्यक असेल तर सार्वजनिक भूसंपादन अधिनियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन ते आरक्षण आपल्याला ताब्यात घेता येईल.

**मदन उदित नारायण सिंग :-**

ते तर आहेच. ३८६ पैकी किती आपण ताब्यात घेतले आणि किती विकास केला आणि अजून किती शिल्लक आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

विकास केलेल्या कामाची मी आपल्याला डिटेल्स देतो. विकास योजनेमध्ये ५४ गार्डन आहेत. त्यापैकी १० विकसीत झाले आहेत. ५० प्रायमरी स्कूल आणि खेळाची मैदान आहेत त्यापैकी १६ विकसीत झाली आहेत. १८ हायस्कूल व खेळाची मैदान आहेत त्यापैकी ६ विकसीत झाली आहेत. १३ लायब्ररी आहेत त्यापैकी ४ विकसीत झाली आहेत. पार्किंग रिर्झव्हेशन ६ आहेत त्यापैकी २ विकसीत झाले आहेत. डिस्पेन्सरी व मॅटर्निटी होम १६ आहेत. त्यापैकी ६ विकसीत झाले आहेत. १२ मार्केट आहेत त्यापैकी ४ विकसीत झाले आहेत. १० शॉपिंग सेंटरपैकी २ विकसीत झाले आहेत, कम्युनिटी हॉल ७ आहेत. त्यापैकी १ विकसीत झालेल आहे. ब्यूरल ग्राऊंड आणि क्रिमीशन ४ आहेत त्यापैकी ४ विकसीत झाले आहेत. जिम्नॅशियम २ आहेत ते विकसीत झाले नाहीत. विकसीतचा तपशील हा आहे. नागरी सुविधा क्षेत्र जे आपल्याकडे आहेत ते डेव्हलपमेंटचाच एक भाग आहे. ते रिझर्व्हेशन ट्रीट करुनच ..................

**मदन उदित नारायण सिंग :-**

नागरी सुविधा म्हणजे कम्युनिटी सेंटर ना.

**सत्यवान धनेगावे :-**

ॲमिनिटी स्पेस. ॲमिनिटी स्पेस जे आहेत. नवघर व्हिलेज सर्व्हे नं. ४१९, ४२० ह्यामध्ये मा. महापौर महोदयाच्या निवासासाठी तिथे ॲमिनिटी स्पेस डेव्हलप केला आहे. त्याचा वापर सुरु आहे. नवघर सर्व्हे नं. ४२६, ४२७, ४२८ ह्या जागेमध्ये मा. आयुक्त महोदयाचे निवासस्थान म्हणून ॲमिनिटी स्पेस डेव्हलप केला आहे. त्याचा वापर सुरु आहे. नवघर व्हिलेज सर्व्हे नं. ६० चा ४, ६१, २९३-४, २९२ ह्या जागेत जांगिड बिल्डर्सनी डेकेअर सेंटर कम्यूनिटी हॉल व रिडींग एरिया या प्रयोजनासाठी नकाशे मंजूर केले होते. त्याचे बांधकाम पूर्ण होऊन त्याचा वापर महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. नवघर व्हिलेज सर्व्हे नं. १४९, १४७ या जागेत सिनियर सिटीझन व महापालिकेचे वर्ग ४ कर्मचाऱ्यासाठी निवासस्थान बांधले आहे. ते काम जवळपास पूर्ण झाले आहे. ते ताब्यात घेऊन त्याची वापर करण्याची प्रक्रिया सुरु होईल. नवघर सर्व्हे नं. ४३०, ४३१, ४३२ ह्या जागेमध्ये अग्नीशमन केंद्रासाठी बांधकाम करण्यात आलेले आहे. हे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. मिरा पेणकरपाडा, रामनगर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननी महापालिकेसाठी ॲमिनिटी सेंटर बांधलेले आहे. त्याठिकाणी सिटीझन केअर, सिनियर सिटीझनसाठी आहे. डेकेअर सेंटर जिमखाना, कम्यूनिटी हॉल ह्या प्रयोजनासाठी बांधकाम नकाशे मंजूर केले होते ते काम पूर्ण होऊन त्याचा वापर महापालिकेमार्फत चालू आहे. त्यानंतर गोडदेव सर्व्हे क्र. ३२७ व सोनम बिल्डर्स ह्याच्या मार्फत महापालिका अधिकारी व कर्मचारी निवास स्थानासाठी बांधकाम नकाशे मंजूर केले आहेत. त्याचे बांधकाम जो त्यापर्यंत झाले आहे. उर्वरीत काम लवकर होणे अपेक्षित आहे. महाजनवाडी निलकमल एडिटर ह्याच्यामध्ये १० हजार ७६० स्क्वेअर मिटर्सची ॲनिनीटी स्पेस येणे अपेक्षित आहे. परंतू जागेबाबत शासन स्तरावर संदर्भ चालू आहेत जागा ताब्यात आलेली नाही. तदनंतर महाजनवाडी १०७ सर्व्हे नं. काऊंट डाऊन डेव्हलपर्स मंगल प्रभात लोढा ह्यांच्या ह्याच्यामधून ॲमिनिटी स्पेस सात हजार सातशे एक्याऐंशी ताब्यात आलेली आहे. त्यामध्ये शाळेचे प्लान मंजूर केले होते. त्याबाबत मा. उच्च न्यायालय आणि शासनाकडे रेफरन्स चालू आहेत त्याबाबतचा अंतिम निर्णय झालेला नाही. निर्णय आल्यानंतर पुढील कारवाई होऊ शकेल. जनता डेरी सोसायटी दर्वेश प्रॉपर्टी, एस.के. हाईटस् काशिमिरा सिरामिक्स मॅन ग्लोबल ह्या सहा प्रोजेक्टमधून ॲमिनिटी स्पेस येण आहे. त्याच्याकडून ३-४ जागा ताब्यात आल्या आहेत. उर्वरित दोन ठिकाणच्या जागा ताब्यात येण अपेक्षित आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

आपण दिलेल्या माहितीनुसार ३८६ आरक्षण आहेत. त्यापैकी आपण फक्त २५ वरती प्रयत्न करतो किंवा २५ टक्के, २५ टक्के आपण प्रयत्नात आहोत किंवा विकास झालेला आहे. बाकीचे ७५ टक्के आरक्षण आहेत. त्याचा थांगपत्ता नाही. म्हणजे पूर्णपणे ५० टक्के ताब्यात आले नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

टोटल ३८६ आरक्षण आहेत. ३८६ आरक्षणापैकी उत्तन, डोंगरी, चौक, पाली ह्या पाच व्हिलेजसाठी महाराष्ट्र शासनाने एक डिसेंबर २००७ पासून एम.एम.आर.डी.ए. ला स्पेशल प्लानिंग ऑथोरिटी अपॉइंट केली आहे. त्या पाच व्हिलेजमधली ५२ आरक्षण आहेत. ती आरक्षण वजा जाता उर्वरित आरक्षण आहेत. ३३४, ३३४ पैकी १०५ आरक्षण सी.आर.झेड. नी बाधित आहेत. ती सद्यस्थितीत ताब्यात घेऊ शकत नाही व विकसीत करु शकत नाही. उरलेले २२९ आरक्षण आहेत त्या आरक्षणापैकी ३१ आरक्षण विकसीत केलेली आहेत. त्यापैकी १०४ आरक्षण आपण पार्टली व फूल्ली अशी मिळून ताब्यात घेतली. ९४ आरक्षण शिल्लक राहीली ती आपण ताब्यात घेतली नाही.

**मदन उदित नारायण सिंग :-**

एम.एम.आर.डी.ए. चे आपल्या डी.पी. नुसार डेव्हलप होतात की, एम.एम.आर.डी.ए.च्या नवीन डी.पी. प्रमाणे.

**सत्यवान धनेगावे :-**

नुकताच एम.एम.आर.डी.ए. चा प्लान मंजूर झालेला आहे. त्यामुळे तिथली डेव्हलपमेंट ही एम.एम.आर.डी.ए. चा सॅक्शन प्लान आहे त्या डेव्लपमेंट प्लान नुसारच पुढे विकास होणे अपेक्षित आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

तिथे आपली डी.पी. रद्द झाली.

**सत्यवान धनेगावे :-**

हो सर.

**मदन उदित नारायण सिंग :-**

म्हणजे एकंदरीत आपण २५ ते ३० टक्के वरच आहोत. ६० ते ७० टक्के आपल्याला .........

**सत्यवान धनेगावे :-**

आपला विकास जवळपास ५० ते ६० टक्केच्या दरम्यान आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

साहेब ६० टक्के नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

तुम्ही म्हणता त्या आरक्षणात ४० टक्के आपल्या ताब्यात आला आहे. जिथे आपण मातीभराव आणि कुंपण भिंत बांधली नाही तिकडे आपण कसे म्हणणार की, विकास केला आहे किंवा विकास काम चालू आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

माती भराव आणि कुंपण भिंतीचा विषय आहे ...........

**मदन उदित नारायण सिंग :-**

तुमच्या म्हणण्याप्रमाणे १० करोडपेक्षा जास्त माती भराव आणि कुंपण भिंतीसाठी पैसे घेतले ते सुध्दा अजुन वापरले गेले नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

मागच्या बैठकीमध्ये ह्या विषयावर चर्चा झाली होती. नगररचना विभागामार्फत मातीभराव आणि कुंपणभिंत याबाबतच धोरण २०११ पर्यंत आपण माती भराव आणि कुंपण भिंतीचे पैसे भरुन घेत होतो. त्याच्यानंतर माती भराव आणि कुंपणभिंतीचे पैसे न घेता संबंधीतांकडून कुंपणभिंत आणि माती भराव करुन घेण्याचे धोरण निश्चित केल गेल.

**मदन उदित नारायण सिंग :-**

माती भराव आणि कुंपण भिंतीचे पैसे घेतले. त्याचा उपयोग झाला का?

**सत्यवान धनेगावे :-**

त्याबाबत ४ करोड ५६ लाख आपल्याकडे जमा झाले आहेत. ह्या कामावर ३ करोड ४१ लाख खर्च झाले आहेत.

**मदन उदित नारायण सिंग :-**

गेल्या महासभेत ८ करोड जमा झाले आहेत अस दिले होते. ७ ते ८ करोड मातीभराव आणि कुंपण भिंतीच्या हेडखाली आपल्याकडे आले आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

ते डिटेल ह्या वेळेला आणले नाहीत.

**मदन उदित नारायण सिंग :-**

आपण उत्तर दिले आहे. माती भराव आणि कुंपण भिंतीसाठी जो पैसा येतो तो मातीभराव आणि कुंपणभिंतीसाठी वापरायला लागेल ना, दुसरीकडे वापरता येत नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

ह्यासाठीच वापरला टोटल ४.५६ जमा झाले आणि ३ मीटर वापरले उर्वरित पैसे शिल्लक आहेत. बजेट व्हाईज प्रोव्हिजन असते. बजेट स्टँडिंग आणि महासभेकडून मंजूर होतो त्याचे हेड अलोकेशन्स आहेत. त्या हेडनुसारच पैसा खर्च होतो.

**मदन उदित नारायण सिंग :-**

आपल्या महाराष्ट्र शासनाच आदेश पण आहे. हे जे पैसे हेड अंतर्गत येतात दुसऱ्या हेड अंतर्गत वापरता येत नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

त्यासाठी आपली मंजूरी आवश्यक असते. रिॲप्रोप्रिएशन होते.

**मदन उदित नारायण सिंग :-**

त्या आदेशात असे म्हटले नाही की, रिॲप्रोप्रिएशन आपण करु शकतो.

**सत्यवान धनेगावे :-**

कूठला आदेश आहे. माझ्याकडे तर नाही.

**मदन उदित नारायण सिंग :-**

मातीभराव आणि कुंपण भिंतीचा जी.आर. आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

त्यासाठी वापरले ४.५६ जमा झाले आणि ३.४१ वापरले आहेत.

**मदन उदित नारायण सिंग :-**

माझ्या मते जास्त पैसे आले असतील.

**सत्यवान धनेगावे :-**

नाही.

**मदन उदित नारायण सिंग :-**

आपला पर स्क्वेअर मीटर दर काय असतो.

**सत्यवान धनेगावे :-**

मातीभराव आणि कुंपणभिंत बांधण्यासाठी त्या-त्या वर्षामध्ये जो खर्च येतो त्या बाबतचा डी.एस. आर चा रेट सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केला जातो.

**मदन उदित नारायण सिंग :-**

सध्याचा डी.एस.आर. रेट काय आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

सध्याचा डी.एस.आर रेट बांधकाम विभागाला माहिती आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

खांबित साहेब, सध्याचा मातीभराव आणि कुंपण भिंतीचा डी.एस.आर रेट काय आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

सध्या आपण कम्पाऊंड आणि भराव करुनच घेतो. त्यामुळे बांधकाम विभागाने रेट निश्चित केला नाही. चालू वर्षाचे पाहिजे तर मी रायटींगमध्ये देईन.

**मदन उदित नारायण सिंग :-**

ठीक आहे. माझे म्हणणे आहे की, त्या हेड अंतर्गत आपल्याकडे जे पैसे आले ते त्यासाठी वापरावे. अजूनही बरीच आरक्षणे असे आहेत. आपण डी.आर.सी. दिले आहे, पैसे घेतले पण तिथे काहीही केले नाही. कुंपण भिंतही घातली नाही आणि मातीभरावही केला नाही. तिथे अतिक्रमण होत आहे. अजूनही अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. असे आपले बरीच आरक्षण आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

याबाबत प्रभाग अधिकाऱ्यांना सुचना देण्यात येईल.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

प्रभाग अधिकारी काय करणार? आपण अतिक्रमणवर टाकता, अतिक्रमण प्रमुख प्रभाग अधिकाऱ्यावर टाकतात. आम्ही कोणाला विचारायचे? अप्रॉप्रिएट ॲथॉरीटी कोण? जे आपल्या आरक्षणाचे संरक्षण करणार आपले आरक्षण दुसरे कोण खाता कामा नये अतिक्रमण होता कामा नये. त्यासाठी आपल्याकडे काय उपाययोजना आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

अनधिकृत बांधकाम होऊ नये, अतिक्रमण होऊ नये, झालेले बांधकाम तोडणे याबाबत सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना पूर्ण कायद्याचे अधिकार दिले आहेत त्यानंतर मा. आयुक्त साहेब सर्वच जबाबदार आहेत.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

सर्व डिपार्टमेंट आहेत पण तशी काम होतात का? तुम्ही खात्रीने म्हणू शकता का आपले सर्व आरक्षण आपल्या ताब्यात आहे कुठे अतिक्रमण झालेले नाही?

**सत्यवान धनेगावे :-**

असे कुठले पर्टीक्युलर असेल तर सांगा त्याबाबत तपासणी करु.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आहे ना. आपल्या शिवार गार्डनच्या मागे तिकडे झोपड्या होतात. अजूनही बरीच आरक्षणे आहेत. १०६,१०८,११०,१११ तिथे कुंपण भिंत आणि माती भराव नाही. मी दोन उदाहरणे देतो ११६ आणि ११७, ४ हजार ५०० स्वे. मि. आणि १० हजार २०० स्वे. मी. त्यातले ७२ टक्के आपल्या ताब्यात आले आहे. आपण कुंपण भिंत आणि माती भराव केलेला आहे. त्या आरक्षणात जाण्यासाठी आपल्याकडे एक्झीट नाही. आपण तिथे पोहचू शकत नाही त्याच्यासाठी कोणी काही प्रयत्न केले आहेत का? करायचा आहे का? केला पाहिजे की नाही केला पाहिजे? कोणाकडे एक दोन गुंठा जागा असते तो माणुस धडपड करुन रस्ता घेतो विनंती करतो. आपलं डेव्हलप करतो आपली मोठमोठी आरक्षणं आहेत ती कचऱ्यासारखी पडलेली आहेत आपण काहीच प्रयत्न केला नाही. तिथे जायला रस्ताच नाही. ११६,११७ मोठी आणि चांगली आरक्षणे आहेत. त्याच्या आजुबाजुला इतके अतिक्रमण झाले आहे ती आतमध्ये शिरायलाच रस्ता नाही मग ते घेऊन काय करणार?

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षण क्र.११६,११७ ह्या जागेवर अतिक्रमण झाले नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

पण आतमध्ये जायला आपल्याला रस्ताच नाही मग डेव्हलप कसे करणार? त्या परिसराच्या आजुबाजुला म्हणजे तिथे आपण एखाद्या बिल्डींगला परवानगी दिली. परवानगी द्यायच्या अगोदर किंवा एखादे अतिक्रमण होत असेल त्याच्या अगोदर आपल्या लक्षात यायला पाहिजे होते की, इथे जर अतिक्रमण झाले परवानगी दिली तर आपले आरक्षण वाया जाणार तिथे आपल्याला एक्सेस मिळणार नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

तिथे आरक्षणाला रस्ता मिळू नये म्हणून अशी कुठली आजुबाजुला परवानगी दिली नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

तिकडे रस्ताच नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

जी काही वस्तुस्थिती किंवा परिस्थीती ती पूर्वीचीच परिस्थीती आहे. नवीन परिस्थीती निर्माण केली नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

त्या परिस्थीतीत अजुन काही चांगलं होईल किंवा रस्ता मिळेल असे काही प्रयत्न केले आहेत का?

**सत्यवान धनेगावे :-**

प्रयत्न करु या.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आपली महानगरपालिका गठीत होऊन बारा वर्ष झाली. आपली डी.पी. होऊन डी.पी. संपत आली २०१७ ला रद्द होणार.

**सत्यवान धनेगावे :-**

डी.पी. संपत नाही. डी.पी. संपणार कशी? रिव्हीजन होणार तेव्हा जुने डेव्हलप झाले नसेल तर आपोआप रद्द होतील. ते आरक्षण पुन्हा रिइस्टेट केले जातात.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

त्याच्यासाठी आपण काय प्रयत्न करणार?

**सत्यवान धनेगावे :-**

ती कायद्यातली प्रोव्हीजन आहे डेव्हलपमेंट प्लान्ट बनविण्यासाठी जे ऑफीसर अपॉईट केले जातात ते ऑफीसर सगळी काळजी घेणार.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

हा जो मोठा आरक्षण आपल्या ताब्यात आहे पण त्यात जायला ॲक्सेस नाही किंवा रस्ता नाही त्याच्यासाठी आपण काय करणार?

**सत्यवान धनेगावे :-**

त्यावर साईट इन्स्पेक्शन बघु आणि साहेबांकडे अहवाल देऊ.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आम्ही महासभेत प्रश्नोत्तर आणल्या नंतरच का त्याच्या अगोदर कोणाला काही करावसं वाटत नाही का?

**सत्यवान धनेगावे :-**

असा विषय नाही तो तुमची मागणी आहे ११६,११७ डेव्हलप झाले पाहिजे हि आपली मागणी आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आमची मागणी आहे की, आपल्या शहरात जेवढी आरक्षण आहेत तेवढी ताब्यात आले पाहिजे डेव्हलप झाले पाहिजे. २०१७ झाले की, नविन डी.पी. करु जुने आरक्षण रद्द होईल नंतर आपल्याला जागाच मिळणार नाही मग कसं काय? आता आपल्या शहरात स्थिती काय आहे? आपण परवानगी देतो एक मजल्याची आणि त्याच्यावर आठ-आठ मजले बांधतात लोक जाणार कुठे? आपण मुलभुत सुविधा कुठून देणार त्याच्यासाठी काय करायचे?

**सत्यवान धनेगावे :-**

एक माळ्याची परवानगी दिल्यावर नऊ माळे बांधतात, बिल्डींग तुटली पण जाते. कोर्ट मॅटर होतात.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

नाही तुटत ना सगळी लोक राहतात सुविधा वापरतात.

**सत्यवान धनेगावे :-**

आज तुटण्याच्या ऐवजी उद्या तुटणार.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, आपण एक मजल्याची परवानगी देतो त्याच्यावर ८ ते ९ मजले बांधतात माझा म्हणण्याचा अर्थ शहराचा विकास होत चालला आहे. लोकसंख्या वाढत आहे. आपले आरक्षण असेच संपत गेले तर उद्या आपण लोकांना मुलभुत सुविधा कोठून देणार? आपल्याकडे थिएटरचा आरक्षण होत ते गेलं. थिएटरचं दुसरे आरक्षण नाही तर काय करायचं?

**सत्यवान धनेगावे :-**

थिएटरच्या आरक्षणा संदर्भात मागे स्टँडींग कमिटीमध्ये चर्चा झाली होती. महासभेत दोन तीनदा विषय दिला होता. त्यावेळेला सभेची मंजूरी मिळाली नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

ठीक आहे. आपली महापालिका आणि डी.पी. होऊन एवढी वर्ष झाली काहीतरी प्रयत्न केले पाहिजे की नाही?

**सत्यवान धनेगावे :-**

प्रशासनाचे प्रयत्न चालू आहेत.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब ११६ आणि ११७ आहे त्याला रस्ता कसा मिळेल?

**मा. आयुक्त :-**

मी पाहणी करतो त्या रस्त्यासाठी काय करता येईल ते प्रयत्न आपण करु आपण निश्चितपणे डेव्हलप करु.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

बाकी जेवढी आरक्षण आपल्या ताब्यात आहेत त्याच्यावर माती भराव आणि कुंपण भिंत टाकली जाईल अशी काहीतरी रुलींग द्या.

**मा. आयुक्त :-**

आपण चांगला प्रश्न निर्माण केलेला आहे. चांगला अभ्यास केलेला आहे. त्यामुळे चांगली चर्चा होते. धनेगावेंनी सांगितल्याप्रमाणे ६० टक्के आरक्षण ताब्यात घेतले आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

६० टक्के संपूर्णपणे नाही पार्टली.

**मा. आयुक्त :-**

परंतु, आपण चांगल्याप्रकारे प्रयत्न करतो आपले चांगले सजेशन आहेत जास्तीत जास्त आरक्षण विकसीत करण्याचा प्रशासन प्रयत्न करेल.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

जेवढं आपल्या ताब्यात असेल त्याला कुंपण भिंत किंवा बोर्ड नजरेस कसं राहिल कोण अतिक्रमण करणार नाही ह्याची खात्री झाली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ह्या ठिकाणी जिथे जिथे आरक्षण असतील तिथे पुढच्या महासभेच्या पूर्वी सगळ्या ठिकाणी बोर्ड लावले जातील ह्याची मी तुम्हाला खात्री देतो.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

कुंपण भिंत आणि माती भराव पण करुन घ्या.

**मा. आयुक्त :-**

त्या साईडवर ज्या पध्दतीची परिस्थीती असेल त्याप्रमाणे शक्य असेल तर.....................

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मी संपूर्ण शहराचे केले नाही ठरावीक २-४ आरक्षण बघितले पण अजून जे काही उदाहरण असतील त्याचा पॉझीटीव्ह प्रयत्न झाला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे ज्या ठिकाणी बोर्ड नसतील तिकडे लावू.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

समावेशक आरक्षण केले आहे हाऊस ऑफ डिसहाऊस मध्ये त्याच्यात आपल्याला किती घरं मिळाली आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

हाऊस ऑफ डिस हाऊस मध्ये आपण अकॉमोडेशन रिझर्व्हेशनखाली परवानगी देतो.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

माझा एक प्रश्न होता. समावेशक आरक्षण कोणाकोणाला दिली आहेत त्याची नावे देण्यात यावी आपण सांगितले की, यादी दिली आहे परंतु मला ती यादी भेटली नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

यादी आपल्याला उद्या देतो.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, हाऊस ऑफ डिस हाऊस किंवा समावेशक आरक्षण जो असतो आपण १० टक्के वर देतो ते ९० टक्के बिल्डर बांधतो १० टक्के आपल्याला देतो संपूर्ण आपण घेतलं तर आपल्याला १०० टक्के मिळेल.

**सत्यवान धनेगावे :-**

१०० टक्के पूर्ण घेण्यासाठी लॅन्ड एक्वीझीशन करायला लागेल बिल्डर स्वतःहून देणार नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

तो १० टक्के आपल्याला देतो ९० टक्के तो घेतो.

**सत्यवान धनेगावे :-**

१० टक्के आपल्याला बिल्ट-अप एरीया मिळतो. बिल्टअप एरीयामध्ये जागेची किंमत आली. बांधकामाचा खर्च आला आणि कमी वेळेमध्ये आपल्याला अव्हेलेबल होतात. कायद्यातील तरतुदीनुसार परवानग्या दिलेल्या आहेत.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

तो १०० टक्के खातो आणि आपल्याला १० टक्के देतो.

**सत्यवान धनेगावे :-**

जागा त्यांची आहे आपली नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

ठीक आहे पण आपल्या आरक्षणात आहे ना.

**सत्यवान धनेगावे :-**

हो.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

एवढा मोठा लेआऊट डेव्हलप करतो महापालिका पुढे सुविधेसाठी कुठे जाणार

**मा. आयुक्त :-**

१० टक्के ऐवजी १०० टक्के पाहिजे असेल तर कायद्यात बदल करावा लागेल.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

१०० टक्के नको पण ५० टक्के तरी त्यांनी द्यावा. काहीतरी आपला प्रयत्न झाला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

कायद्यात बदल करण्यासाठी असेंम्बलीमध्ये बदल करायला लागेल. आपल्या सुझावाप्रमाणे प्रयत्न करु त्याप्रमाणे शासनाला पाठवू.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आपली बरीच आरक्षण अशी आहेत मालक आपल्याकडे आले नाहीत आणि आपण मालकाकडे गेलो नाहीत त्या जागेवर मालक राजरोसपणे बिझनेस करुन कमवतात. महापालिकेला एकही पैसा रेव्हेन्यु न देता अशी बरीच आरक्षणं आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

महापालिकेला रेव्हेन्यु द्यायचा काय विषय आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

का नाही? विषय महापालिकेचा छोटा टपरीवाला. टपरीवाल्यांनी दररोजचा २०० रुपयाचा धंदा केला तरी आपले एल.बी.टी. वाले जाऊन त्याच्या टपरीवर बसतात. १००० रुपये एल.बी.टी. भरायला लागेल.

**सत्यवान धनेगावे :-**

धंद्याची बाब वेगळी आहे त्याबाबतचे लायसन्स ते घेत असतील ना.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

घेतात पण एवढा मोठा प्लॉट असून आपल्या आरक्षणात असून ते ५० हजार लाख रुपयांनी भाड्यानी देतात आणि आपल्याकडे येत नाही आणि आपण पण त्यांना विचारत नाही. आरक्षणाची अशीच पध्दत राहीली तर आपल्याला आरक्षण कोठून मिळणार.

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षणामध्ये असेल तर आपण ते बांधकाम तोडतो. कम्यूनिटी सेंटरचे बांधकाम मागे तोडले.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, मी दोन तीन उदाहरण देतो. आपला सर्व्हे नं. ९४,९६,३५८,३५९ मोठमोठी आरक्षण आहेत. पण आपल्याकडे कोण येत नाही. आपण जात नाही. तिथे त्यांचा बिझनेस चालतो. महापालिकेला एक रुपये रेव्हेन्यू न देता. ते ओपन लॅन्ड टॅक्स पण भरत नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

ओपन लॅन्ड टॅक्सच्या बाबतीत महापालिकेने धोरण ठरवले आहे. सी.सी.कमेंसमेन्ट सर्टिफिकेट दिल्यानंतर सी.सी. टू ओ.सी. पर्यंतचा टॅक्स वसूल करायचा आहे. ह्या रिर्झव्हेशनच्या जागा आहेत. त्यामध्ये परवानगी दिल्या नाहीत त्यामुळे ह्याच्यात व्हेकेन्ट लॅन्ड टॅक्सचा विषय नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

एक पानपट्टीवाला दररोज २०० रु. धंदा करत असेल आपले एल.बी.टी.ची लोक जाऊन तिकडे बसतात की, तुला १००० रु. वर्षाचे महिन्याचे भरायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

अशी उदाहरण असतील मला सांगा.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आहेत ना, भरपूर आहेत. प्रत्येक नगरसेवकांना विचारा.

**मा. आयुक्त :-**

एल.बी.टी.कायदा वेगळा आहे. त्याची जी प्रोव्हीजन आहे. त्याचा जो टन ओव्हर आहे. त्याच्यात जर बसत असेल, जो पाच लाखाचा बिझनेस आहे. एक लाखाचे लिमिट आहे ते जर कव्हर करत असेल तर त्याच्याकडे माणस जाण अपेक्षित आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मी एक उदाहरण दिले आहे.

**मा. आयुक्त :-**

पानपट्टीवाला बिचारा कष्ट करतो त्याला आपण कमी पण मानायचे कारण नाही एल.बी.टी. च्या कायद्याप्रमाणे लिमीट क्रॉस करत असेल तरच आपली लोक वसूल करतात.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मी एक उदा. दिले आहे की, एखादा माणूस महिन्याचे १००० रु. कमावत असेल तो एल.बी.टी. भरतो.

**मा. आयुक्त :-**

किती कमावतो १००० रु. ला एल.बी.टी. लागत नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आपली लोक जाऊन तिकडे दमदाटी करतात.

**मा. आयुक्त :-**

करु शकत नाही, रजिस्ट्रेशनची प्रक्रिया पहिली करायला लागते.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

माझा म्हणण्याचा हेतू हा आहे जे मोठमोठी आरक्षण आहेत त्यांना आपण का विचारत नाही. आपण त्यांच्याकडे का जात नाही की हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अंतर्गत आरक्षण आहे. त्याच्यासाठी काय प्रोसिजर केली आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

डेव्हलपमेंट प्लानचे पुर्ण आरक्षण एकदा जरी ताब्यात घ्यायचे म्हटले तरी त्याला दोन हजार करोडचे बजेट प्रोव्हिजन लागेल.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

थोड थोड घ्या ना.

**सत्यवान धनेगावे :-**

असे होत नाही ना एकदाच सगळी आरक्षण ताब्यात घ्यायची. शासनाने जो कायदा केला आहे. तो २० वर्ष टाईमलिमिट देण्यामगाचे कारणच ते आहे की, टप्प्याटप्प्याने घ्यायला पाहिजे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

२०१७ ला ही डी.पी. आपण चेंज करणार.

**सत्यवान धनेगावे :-**

हो.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मोठमोठे लॅन्ड लॉर्ड मालक आहेत ते त्यांची बदली करुन घेतील.

**सत्यवान धनेगावे :-**

कसे करुन घेतील. त्याच्या हातात थोडच आहे. सभागृहात मोठ-मोठी लोक आहेत त्यांना विचारा. असे करुन घेता येते का? शासनाचा कायदा आहे. शासनाचा अधिकारी आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आपली नगररचना, बांधकाम आहे. आपल्या शहरासाठी मूलभूत सुविधासाठी जे आरक्षण पाहिजे त्याच्यासाठी काही तरी पॉझिटिव्ह प्रयत्न करावे.

**सत्यवान धनेगावे :-**

जे-जे आरक्षण आहेत त्याबाबत सर्व तपासणी केली जाईल. आपण ज्या सुचना केल्या आहेत. त्या सुचनेनुसार सर्व पाहणी करण्यात येईल.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

२१८ कम्यूनिटी सेंटर तिथे पण आपली काही हालचाल नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

२१८ आरक्षण क्रमांक विकसित करण्या संदर्भात बांधकाम विभागाची कार्यवाही चालू आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

१०० टक्के आपला ताबा आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

पूर्ण १०० टक्के ताब्यात आहे. जागेवर अतिक्रमण झालेले नाही. पूर्ण एरिया आपल्या ताब्यात आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आपल्या ताब्यात आहे पण काही तरी विकास झाला पाहिजे ना.

**सत्यवान धनेगावे :-**

विकासाच्या बाबतीत कार्यवाही चालू आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

३६५ खेळाचे मैदान त्याच्यावर पण काही कारवाई झाली नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षण क्र. ३६५ काशी गावामध्ये आहे, त्यातली पार्टली एरिया ताब्यात आली आहे. बाकी एरिया ताब्यात घेण्यासाठी जमिन मालकाला बोलवल होते त्याची नेगोशिएसन चालू आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

माझा शेवटचा प्रश्न होता ताब्यात न घेतलेल्या आरक्षणाचे क्रमांक व मालकाचे नाव जे आपण ताब्यात घेतले नाही किंवा आरक्षण आहे त्याच्या मालकाचे नाव आणि कारण का आपण ताब्यात घेतल नाही किंवा आपल्या ताब्यात का आले नाही? आपण मला उत्तर दिले. सदर मुद्दयातील विचारणा केलेली माहिती महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. मग आम्ही कोणाकडे जावे.

**सत्यवान धनेगावे :-**

आपला प्रश्न होता की, "ड" क्रमांकाचा प्रश्न होता ताब्यात न घेतलेले आरक्षणाचे क्रमांक, मालकाचे नाव व कारण त्याच्यात आम्ही उत्तर दिले की सदर मुद्दयात विचारणा केलेली माहिती महापालिकेकडे उपलब्ध नाही. कारण असे आहे की डेव्हलपमेंट प्लान सोबत डी.पी. रिपोर्ट बनतो ज्या डी.पी. रिपोर्टमध्ये आरक्षण क्रमांक कुठल्या व्हिलेजमध्ये आहे. तिथे सर्व्हे नं. काय आहे, त्याचा टोटल एरिया काय आहे. परंतु त्या सर्व्हे नं. मधील हिस्सा नं. कोणाचा आहे. जमिन मालक ही डिटेल माहिती डेव्हलपमेंट प्लान तयार केल्यापासुन माहिती एकत्रीत संकलीत केलेली माहिती नसते त्यामुळे माहिती उपलब्ध नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

ते कोण करणार?

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षण ताब्यात घ्यायचे असेल भूसंपादन करायचे असेल. त्यावेळी ती प्रोसेसची माहिती आपल्याकडे येते.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

प्रोसेस आपण कधीही करु या पण आपल्याकडे माहिती तर असली पाहिजे. किती शिल्लक आहे आणि कितीवर कारवाई करायची आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

ते डिटेल्स दिले ना, टोटल किती आरक्षण होते, विकसीत किती झाले, किती आपण ताब्यात घेतले.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आपण म्हटले महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

प्रत्येक जमिन मालकाचे नाव उपलब्ध नाही.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

साहेब, आपण ७/१२ काढला की सगळ मिळते ना.

**सत्यवान धनेगावे :-**

७/१२ तून काय साध्य होणार. ७/१२ चा गठ्ठा आणून देऊ का?

**मदन उदीत नारायण सिंह :-**

मी काय करणार? मी अधिकारी नाही ना.

**सत्यवान धनेगावे :-**

मी गठ्ठा आणून देणे अपेक्षित आहे का?

**मदन उदीत नारायण सिंह :-**

ही माहिती महानगरपालिकेतून असली पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

विशेष पर्टीक्यूलर कुठल्या आरक्षणाचे असेल तर मागा ती माहिती आपल्याला उपलब्ध करुन दिली जाईल.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

आपण पूर्ण शहराबद्दल बोलतो.

**सत्यवान धनेगावे :-**

आपण जी माहिती मागता ती टाऊन प्लानिंग ऑफिसर डेव्हलपमेंट प्लान बघतो ते सुध्दा डिटेल्स घेत नाही.

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे.

**मदन उदीत नारायण सिंह :-**

वेळ संपलेली आहे. मला पुढे प्रश्न चालवायचा नाही. पण जो उद्देश आहे तो तरी झाला पाहिजे. दोन मिनिटात मी पूर्ण करतो. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त हे प्रश्नोत्तर आणले म्हणजे मला काही काम नव्हत. टाईमपास करायला मी आणल नव्हत. मा. महापौर मॅडम आपले ३८६ आरक्षण आहेत ते डव्हलप झाले पाहिजे

त्याच कुठलही अतिक्रमण झाले नाही पाहिजे. कूठलही आरक्षण आपल्या ताब्यात असो किंवा नसो विकास झाला असो किंवा नसो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीचा बोर्ड तिकडे असला पाहिजे. ज संबंधीत विभाग आहेत त्यांनी त्याच्यावर लक्ष दिले पाहिजे की, आपले आरक्षण आपल्याकडेच असले पाहिजे. २०१७ आल म्हणजे त्यापुढे आपल्याकडे सुविधेसाठी आरक्षण नसणार. असे होता काम नये. ह्याच्यावर लक्ष द्यावे व रुलिंग द्यावे. धन्यवाद.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम रुलिंग एकत्र द्या. विषयाला सलग्न असाच माझा विषय आहे. सन्मा. मदन सिंहनी एक चांगला विषय आणला. त्याच्या मागचा उद्देश चांगला त्याचे अभिनंदन. विषय आरक्षणाचाच आहे. मा. आयुक्त महोदय मी कोणावर व्यक्तिगत टिका टिपण्णी करणार नाही. आज कोण अधिकारी आहेत. ह्याच्या अगोदर कोणत्या अधिकाऱ्याने काय कारवाई केली अशा प्रकारे मला वाटत नाही अशी भाषा सभागृहात वापरली पाहिजे. आपल्याकडे बरीच आरक्षण ताब्यात घेतली नाही म्हणून प्रलंबित आहेत. असा एक विषय शहरामध्ये घडला ज्याच्यामुळे आपले एक आरक्षण आपल्या हातातून गेले आहे. ९७ पासून आपली विकास योजना अमलात आली. २००३ मध्ये मा. महासभेने जेव्हा नगरपरिषद होती तेव्हा सन्मा. मोहन पाटील ह्यांची एक सूचना होती. शहरामध्ये असलेल्या आरक्षण ताब्यात घ्या त्याच्यामध्ये त्याच्यात ड्रामा थिएटरचा विशेषतः उल्लेख होता. शिवार गार्डन आणि ड्रामा थिएटर, २६२ आणि २६३ हा बहुतेक सर्व्हे नं. असावा. ह्या दोघांचा उल्लेख विशेषतः त्या ठरावामध्ये होता. २००३ पासून त्याला लाल फितीमध्ये बांधुन ठेवल्यानंतर १४/०३/२००७ मध्ये त्या जागा मालकांनी तो आपल्या आर्किटेक्टच्या माध्यमातुन महापालिकेला प्लान सादर केला की, आम्ही हे डेव्हलप करुन द्यायला तयार आहोत त्यांनी प्रस्ताव सादर केला तो प्रस्ताव सादर केला त्याच्यावर आम्ही उत्तरच दिले नाही. २००७ ला ते पुन्हा नगरविकासाला मंजुरीसाठी पाठवलं. त्यानंतर २००८ ला एक वर्षांनी आम्ही नगरविकासाचा पाठपुरावा कधी करतच नाही साहेब, कुठल्या अधिकाऱ्यांना बदली करायची असेल तर तो आठवड्यामध्ये बदली करुन आणतो त्याला स्थलांतरीत व्हायचं असेल किंवा मोठं पद पाहिजे असेल तर मंत्रालयाच्या खेपा घालतो नगरविकासाच्या अधिकाऱ्यांकडे रांगेत जाऊन बसतो. सगळं काही करायची त्याची तयारी असते परंतु, शहर विकासाचा प्रश्न येतो तेव्हा तो त्याचे कर्तव्य बजावत नाहीत. मी परत एकदा टिका टिप्पणी करत नाही. हा प्रशासनाचा विषय आहे २००८ मध्ये नगरविकासाने नियमावलीत सुधार करण्याचा विषय परत महासभेसमोर नगरपालिकेला कळवलं आहे की, ह्याच्यामध्ये सुधार करुन घ्या. महानगरपालिकेने त्याच्यात सुधार २००८-१० मध्ये केला म्हणजे २००८ पासून २०१० पर्यंत तो लाल फितीमध्ये विषय प्रलंबित.....

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर मॅडम, प्रश्नोत्तराची वेळ झालेली आहे. असेच चालणार असेल तर आमच्या प्रश्नाला वेळ द्यायला लागणार.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य माझा दोन मिनिटाचा विषय आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

दोन मिनिटं दिली तुम्हाला पाच मिनिट झाली.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौरांनी मला परवानगी दिली आहे. मला बोलायचा अधिकार आहे २०१० मध्ये त्या विकासकर्त्यांनी आपल्याला पर्चेस नोटीस दिली होती. पर्चेस नोटीसवर पालिकेने कारवाई केली नाही फक्त मी महासभा आणि नगरविकास ह्याच्यामध्ये खेपा घालत राहिलो. विषय असा झाला की, उच्च न्यायालयमध्ये गेला आणि १० वर्षानंतर उलटल्यानंतर एम.आर.टी.पी. ॲक्ट आम्हाला त्या आरक्षणावर ताबा राहत नाही तो अधिकार परत विकास कर्त्या मालकाचा होतो अशी ऑर्डर ओक साहेबांनी डबलनेच ओक साहेब विषयात अखंडीत विषयानी तो निर्देश ते आम्हाला आदेश दिले. त्याच्या बाजुंनी निकाल लागला त्या विकास कर्त्याला जमिन मालकाला ती जागा विकास करण्यासाठी परत देण्यात यावी. आज परिस्थिती अशी आहे की, आम्हाला सुप्रीम कोर्ट अपॅक्स कोर्टमध्ये आम्ही आहोत. आम्ही परत अपील केलेली आहे. महासभेत उभा राहून मी माहिती देऊ इच्छितो. गिरनार ट्रेडर्स, सुप्रा टु हा विषय सुप्रिम कोर्टाच्या समोर होता आणि तो निकाल त्याच्या बाजुने लागला म्हणून हो निकाल त्यांचा बाजुने लागला आहे म्हणुन हा निकाल जमिन मालकाच्या बाजूने लागु शकतो. पालिकेचा लागलेला पैसा आपल्या हातातून घालवलेले आरक्षण ह्याला जबाबदार कोण? २००३ मध्ये धनेगावे साहेब नसावेत कोणतरी टाऊन प्लॅनर आपल्याकडे असणार. सहाय्यक संचालक बऱ्याच लोकांनी हे पद भुषवलेले आहे. मला तर सगळेच ह्याला कारणीभूत वाटतात. असे परत कधी होऊ नये चांगला योग आहे साहेब, तुम्ही ह्या ठाणे जिल्ह्याचे प्रांत होता. जमिनी बाबतची माहिती ठाणे जिल्ह्याची तुम्हाला जास्त आहे म्हणून आमची तुमच्याकडे विनंती राहिल की, असं परत कुठले तरी आरक्षण कारण तो विषय आता न्यायप्रविष्ठ आहे म्हणुन त्याच्यावर भाष्य करण्याची गरज नव्हती फक्त ह्या सभागृहाला हा हरकतीचा मुद्दा होता माझ्याजवळ प्रश्न आला म्हणून ह्या प्रश्नाशी संलग्न होऊन तो प्रश्न माझा विषय इंथे मांडला आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, एका मिनिटांत प्रश्न पुर्ण करतो चांगला विषय होता. सन्मा. जुबेर इनामदारानी सांगितले की, अधिकाऱ्यांचे काही काम असंल तर पटकन दोन मिनिटांत होते आणि शहराच्या विकासाचे असले की, कोणी करत नाही पण हे विसरत आहे की, सरकार ह्यांचीच आहे असे ह्यांचे म्हणणे आहे का? की सरकार अधिकाऱ्यांची कामं करते शहराची करत नाही. हा चिंतेचा विषय आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, हा टिका टिप्पणीचा विषय नव्हता. मधल्या काळामध्ये तुमची सरकार होती शहराच्या हिताचा विषय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही आमचे शब्द मागे घेतो.

**जुबेर इनामदार :-**

धन्यवाद।

**नरेंद्र मेहता :-**

महापालिका आरक्षणाबद्दल कारवाई करते टी.डी.आर. देते आपण ताब्यात घेतो कुठे तरी आपल्याला मोबदला देऊन किंवा आता सांगितले दोन हजार कोटी देऊन ते आरक्षण ताब्यात घ्यायचे आहे. काही आरक्षण ॲमिनिटी स्पेस आहे जे ४-५ आपल्या ताब्यात यायचे बाकी आहे. मा. आयुक्त साहेब त्या आरक्षणाला परवानगी देऊन मोबदला दिला आहे. मग ते ताब्यात यायचे का बाकी आहेत मी एफ.एस.आय. दिल्यानंतर कुंपण भिंत आणि बाऊंन्ड्री करुन महापालिकेच्या ताब्यात असले पाहिजे आय एम रिडींग द टाईम्स ऑफ इंडीया म्हाडा म्हणुन एक सोसायटी सिस्टीम आपल्याला माहित असेल त्यामध्ये म्हाडाने ॲमिनिटी स्पेस एका संस्थेला भाड्याने लिजवर देऊन टाकला आहे. त्यांच्याकडे डॉक्युमेंट आहे. महापालिकेने किंवा म्हाडा प्लॅनिंग ॲथोरीटीने जे असेल त्यांनी ती जागा रवि ग्रुप ला दिली. रवि ग्रुपनी त्याचा एफ.एस.आय. कॉम्प्लेक्स मध्ये वापरुन घेतला असता आता ती जागा कोणाची त्या संस्थांची, रवि ग्रुपची की महापालिकेची रवि ग्रुप आणि संस्था दोन्ही भांडत आहे. आपला त्याच्यात काय रोल आहे की नाही जागा आपली विषय आपल्याला समजला असेल की, म्हाडानी त्या रवि ग्रुपला हि जागा लिजवर द्यायचा किंवा त्याच्या टर्मस ॲन्ड कंडीशनवर दिली असेल त्याच्या अगोदर ॲमिनिटी स्पेस ही एका संस्थेला भाड्याने दिली आहे. रवि ग्रुपनी हे आपल्याला दाखवले नाही त्याची परवानगी घेतली त्याची एफ.एस.आय. मिळवून घेतली आता ती जागा आमची सोसायटीची की कोणाची विदाऊट एक्वीझेशन ऑफ दॅट पर्टीक्युलर लॅन्ड ज्या जागेचा आपण मोबदला दिला आहे त्याचा ताब्यात घेतल्याशिवाय एफ.एस.आय. देण्याचे काही कारण नाही. आता धनेगावे साहेबांनी सांगितले ५-६ जागा ताब्यात आहे. आपण परवानगी दिली आपला विषय संपला जसा आपण रोडचा एफ.एस.आय. देतो रोड आपण ताब्यात घेतो एफ.एस.आय. दिला आमचं काम संपलं त्याने बिल्डींग एका वर्षात बांधा ५० वर्षात बांधा मा. महापौर मॅडम भविष्यात एखाद्या माणसाने एखादी झोपडी बांधली त्यासाठी एवढे टेन्शन घेतो. उदा. डी.बी. रिॲलीटीची एक लाख फुट जागा अजून ताब्यात आली नाही १० ते १२ वर्ष परवागनी घेऊन झाले अजून ताब्यात आली नाही आपण भांडतोच आहे. मा. आयुक्त महोदय ॲमिनिटी स्पेसची जागा आहे त्याची खात्री करुन घ्या ५-६ परवानगी दिली आहे तुम्ही मोबदला दिला आहे ती ताब्यात घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

**नगरसचिव :-**

आजच्या महासभेला लक्षवेधी आली नाही प्रकरण क्र.५०, दि. ११/०९/२०१३ व दि. २१/०९/२०१३ (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. ११/०९/२०१३ व दि. २१/०९/२०१३ (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा सुचना क्र. ५, दि. ३०/०८/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचारविनिमय करणेसाठी दि. ११/०९/२०१३ रोजी मा. महासभा बोलविण्यात आलेली होती. सदर महासभेचे कामकाज तहकुब करुन दि. ०३/१०/२०१३ रोजी सभा बोलविण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर झालेला होता. परंतु ठरावाप्रमाणे सभा दि. ११/०९/२०१३ रोजी न बोलावता सदर सभा दि. २१/०९/२०१३ रोजी बोलाविण्यात आलेली होती.

या नियमबाह्य व बेकायदेशीर झालेल्या सभेबाबत मा. प्रधान सचिव सो. नगरविकास विभाग यांचेकडे तक्रार केली आहे. तसेच मा. मुख्यमंत्री यांचेकडे अपील दाखल केलेले आहे. तरी नियमबाह्य बेकायदेशीररित्या तहकुब झालेल्या इतिवृत्तांस मंजूरी देण्यात येत नाही असा मी ठराव मांडीत आहे.

**जुबेर इनामदार :-**

सभा बेकायदेशीर कशी होऊ शकते नंतरच्या सभेमध्ये "ज" चे प्रस्ताव होते.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब इतिवृत्तांतामध्ये दोन ठराव होऊ शकतात का?

**नगरसचिव :-**

मा. महापौर ह्याच्यावर रुलींग देतील दोन ठराव आले तर मतदान घ्यावे लागते.

**भगवती शर्मा :-**

दोन ठराव कसे करता येईल? इतिवृत्तांतात काय होऊ शकते?

**नगरसचिव :-**

इतिवृत्तांतात दुरुस्ती होऊ शकते.

**भगवती शर्मा :-**

दुरुस्ती होऊ शकते ठराव होऊ शकत नाही ना. मग तुम्ही कसे सांगता दोन ठराव.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, विषय पत्रिका हा विषय म्हणून दिला जातो आणि त्याला सभागृहाचा अधिकार असतो त्या ठरावाला मंजुर करणे किंवा विषयाला मंजुर करणे मग दुरुस्ती असु द्या, बदल असु द्या. सभागृहाला जो उचित वाटेल तो निर्णय घेणे आम्ही आमची भुमिका मांडली आहे. त्याच्यावर सचिवांनी सांगितले दोन ठराव आले आहेत तर मतदान घेऊन आपल्याला वाटेल तो निर्णय घ्यावा, मांडायचा अधिकार आमचा आहे आणि मांडायचा अधिकार त्याचाही आहे त्यांनी त्यांचे मांडले आम्ही आमचे मांडले.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही सांगा नियमाप्रमाणे काय आहे?

**नगरसचिव :-**

इतिवृत्तांतात दुरुस्तीमध्ये दोन ठराव झाले असतील तर मतदान घेऊन त्याच्यावर निर्णय घ्यावा लागेल.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही दुरुस्ती काय आहे ते सांगा?

**नगरसचिव :-**

शब्द चुकला असेल ग्रॅमेटीकल काही दुरुस्ती असेल.

**भगवती शर्मा :-**

ठरावामध्ये ग्रॅमेटीकली काय आहे?

**नगरसचिव :-**

माझ्याकडे प्रकरण क्र. ५० करिता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदक सन्मा. जुबेर इनामदार. दुसरा ठराव सुचक सन्मा. शरद पाटील. अनुमोदक सन्मा. प्रशांत केळुस्कर. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. शरद पाटील ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत का? सुचक ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहे का?

**मा. महापौर :-**

सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४३ विरोधात ३५ तटस्थ शुन्य अशी मते पडली आहेत. श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५० :-**

दि. ११/०९/२०१३ व दि. २१/०९/२०१३ (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ५० :-**

दि. ११/०९/२०१३ व दि. २१/०९/२०१३ (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |
| २ | ॲड. रवि व्यास | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | पाटील वंदना विकास | ३ | सिंग मदन उदितनारायण | |
| ४ | वंदना मंगेश पाटील | ४ | पाटील रोहिदास शंकर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ५ | म्हात्रे कल्पना महेश | निरंक |
| ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ७ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ८ | डॉ. आसिफ गुलाब शेख | ८ | मेहता डिंपल विनोद | |
| ९ | गोविंद हेलन जॉर्जी | ९ | केळुसकर प्रशांत नारायण | |
| १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | १० | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| ११ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | ११ | रावल भगवती जयशंकर | |
| १२ | खण्डेलवाल सुरेश | १२ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १३ | नरेश तुकाराम पाटील | १३ | शरद केशव पाटील | |
| १४ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १४ | जैन गिता भरत | |
| १५ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | १५ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १६ | भावसार शिल्पा कमलेश | १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| १७ | वंदना रामदास चक्रे | १७ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | |
| १८ | भोईर कमलेश यशवंत | १८ | सुजाता रविकांत शिंदे | |
| १९ | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | १९ | महेता नरेंद्र लालचंद | |
| २० | रविंद्र भिमदेव माळी | २० | सिमा कमलेश शहा | |
| २१ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २१ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २२ | पिसाळ मनिषा नामदेव | २२ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २३ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २३ | जैन दिनेश तेजराज | |
| २४ | पाटील सुनिता कैलास | २४ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २५ | वेतोसकर राजेश शंकर | २५ | अनिल बाबुराव भोसले | |
| २६ | प्रभात प्रकाश पाटील | २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| २७ | बगाजी शर्मिला विल्सन | २७ | संध्या प्रफुल्ल पाटील | |
| २८ | रकवी सुहास माधवराव | २८ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| २९ | झिनत रऊफ कुरेशी | २९ | तारा विनायक घरत | |
| ३० | मोहम्मद फरिद सिद्धीक कुरेशी | ३० | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३१ | पुजारी कांचना शेखर | ३१ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३२ | काझी रशीदा जमील | ३२ | जयमाला किशोर पाटील | |
| ३३ | इनामदार जुबेर | ३३ | परमार अनिता भरत | |
| ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ३५ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | ३५ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ३६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| ३७ | डिसा मर्लिन मर्विन | | | |
| ३८ | भट दिप्ती शेखर | | | |
| ३९ | विराणी रेखा अनिल | | | |
| ४० | जाधव मोहन महादेव | | | |
| ४१ | भोईर भावना राजू | | | |
| ४२ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४३ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५१, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. रेन्टल हाऊसिंग स्कीम भागातील सोयी पुरविणे या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. कडील रेन्टल हाऊसिंग स्कीम अंतर्गत खालील प्रकल्पाच्या नकाशांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | मौजे | सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | भूखंडाचे क्षेत्र |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | महाजनवाडी<br><br><br><br><br><br><br>सुधारीत | सि.स.क्र. ४५०९ ते ४५१३, ४५१७, ४५४७, ४५४८, ४५७२ ते ४५७५, ४६०४, ४६०९, ४६१०, ४६११, ४६५२, ४६९१, ४६९२, ४७०२ ,४७१०, ते ४७२१, ४७२४ ते ४७३२, स.क्र. ९५/१० ते १२, ९५/१४, १५, ९७/३पै. ९७/५पै, सि.स.क्र. ४६३८,४६३९, ४६४७, ४६८६, ते ४६९०, ४७०४ ते ४७०९, ४७२२, स.क्र. ९४/१, ९४/२, २६० पै. सि.स.क्र. ४३६२, ४४५५, ४४५६, ४३६३, ४४५४, ४६१४, ४५१५, ४५१६, ४५१८, ४५१९, ४५२०, ४५४९, ४१००पै. ९६/१, ९६/४ | ५०२०२.७६ चौ.मी |
| २ | नवघर | ४२/१, ४१/६<br>२५६/१, २५४/६<br>सुधारीत | ३३००.०० चौ.मी. |
| ३ | नवघर | १२९, १३०/३ ४४५,<br>४४६/३<br>सुधारीत | ८९०५.०० चौ.मी |
| ४ | महाजनवाडी | १०७/१ पै., १पै., १०८/१,२,३ १०९/१ ते ७,८ पै., ९ अ, १० ते २८, ११०/१पै. ते ५ पै.<br>सुधारीत | ९७००.०० चौ.मी<br><br>११४५२ चौ.मी |
| ५ | मिरा<br>(महाजनवाडी) | सि.टी. एस. क्र. ४४३६ ते ४४५१, ४४८१, ४४८२, ४४८६ ते ४५०८, ४५४० ते ४५४६, ४५६५ ते ४५७१, ४५९९ ते ४६०३, ४६९९, ४३९८ ते ४४०३<br>सुधारीत | ६५४२.९५ चौ.मी. |

वरील प्रकल्पाच्या ठिकाणी सोयी सुविधा पुरविण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. ने मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रु. ७.९७ कोटी रक्कम वर्ग केलेली आहे. सदर रक्कम मिरा-भाईंदर महानगरपालिकेने "एम.एम.आर.डी.ए. रेन्टल हाऊसिंग स्कीम भागातील सोयी पुरविणे" या लेखाशिर्षाखाली सन २०१३-१४ या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे.

वरील तक्त्यामधील प्रकल्पाच्या ठिकाणी बांधण्यात येत असलेल्या इमारतीकडे जाणारे रस्ते, गटारे यांची कामे करावी लागणार असून त्यांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क रस्ता श्वेता रेसीडेन्सी ते के.डी. एम्पायर पर्यंत रस्ता तयार करणे व एका बाजूस गटार बांधणे. | रु. | २,३६,९८,४५०/- |
| २ | मिरारोड (पूर्व) एस.के.स्टोन ते सिंगापूर प्लाझा व पुढे रेल्वे स्टेशन पर्यंतचा रस्ता मजबुतीकरणासह तयार करणे. | रु. | २,८९,०७,२००/- |
| ३ | मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन शांतीसागर हॉटेल ते पोस्ट ऑफिस पर्यंतचा रेल्वे समांतर रस्ता तयार करणे. | रु. | ७४,४८,५००/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) जया अपार्टमेंट बी विंग ते हरी ओम टॉवर/एम आय डी सी-प्लेझंट पार्क रस्ता जोडणारा डी.पी. रस्ता व उर्वरीत गटार बांधणे. | रु. | १,५६,२०,५५०/- |

वरील कामे करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. मार्फत रु. ७.९७ कोटी रक्कम महानगरपालिकेकडे जमा केलेली असून सदर रक्कमेची तरतूद सन २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. तरी सदर कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

एम.एम.आर.डी.ए. कडे जाणारे जे रस्ते आहेत. त्याच्यामध्ये मिरारोडचा काही पार्ट आहे किंवा महाजन वाडी त्याचप्रमाणे नवघरचा सुध्दा एरिया आहे. आणि ह्या ठिकाणी जाणारे रस्ते म्हणजे ज्योती पार्क पासून नवघर चाळघर पर्यंत रस्त्याची एकदम दुर्दशा आहे. त्या भागामध्ये जाणाऱ्या रस्त्याचे सुध्दा उल्लेख करुन घ्या.

**मा. महापौर :-**

लेखी सुचना मी स्विकारत आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम जो संबंधीत विषय आला आहे बरेच प्रोजेक्ट येतात विषय येतात. कोणी लक्ष देत नाही. उसमें लेट हो जाता है। मेरी ऐसी सुचना है की, ऐसे विषयो में महापालिका के जो परमनन्ट स्टाफ है उनको हॅन्डल करके विषय दिया जाए। तो ऐसे स्किम जल्द होगे।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एम.एम.आर.डी.ए. कडून ७ कोटी ९७ लाख आले आणि त्याच्या खर्चाच्या मंजुरीसाठी विषय आमच्या समोर ठेवला. आमचे असे म्हणणे आहे की, सभागृहाला माहिती असायला हवी की, एम.एम.आर.डी.ए. मिरा भाईंदरसाठी काय करते. त्यांना आपण किती जमिन दिली कशापोटी. त्यांनी १ रुपयातले २५ पैसे आपल्याला दिले आणि ७५ पैसे त्यांच्याकडे ठेवले अशी आमची माहिती आहे. त्याची माहिती द्या की कशापोटी ७ कोटी ९७ लाख आले. म्हणजे ९७ नगरसेवकांना माहिती होईल की, हे पैसे कसले आहे. मग त्याच्यावर आम्ही आमच्या सुचना मांडतो. ठरावाला विरोध करायचा प्रश्न येत नाही. ठरावातली माहिती मिळायला पाहिजे.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, महाराष्ट्र शासनाने ४/११/२००८ ला एक शासन निर्णय घेतला आहे की, एम.एम.आर. रिजनमध्ये भाडे तत्वावर गृहनिर्माण योजना राबवण्यासंदर्भात भाडे तत्वावर गृहनिर्माण योजना बांधण्यासंदर्भात जी नियमावली तयार केली आहे त्या नियमावलीमध्ये ज्या विकासकांना रेन्टल हाऊसिंग बांधण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्या विकासकांनी इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस म्हणून ५०० रु. परस्क्वेअर मीटर हे एम.एम.आर.डी.ए. कडे जमा करायचे आहेत. त्यातले ९० टक्के अमाऊंट त्या-त्या महापालिकेला इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटसाठी वर्ग करायचे अशी शासन निर्णयातील तरतूद आहे. त्या निर्णयानुसार जी रक्कम एम.एम.आर.डी.ए. कडे जमा झाली त्यातली ९० टक्के वाटा एम.एम.आर.डी.ए. ने महापालिकेकडे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटसाठी दिला आहे. ती इन्फ्रास्ट्रक्चर काय घ्यायचे ह्या संदर्भात हा विषय आहे.

**रोहिदास पाटील :-**

ह्या रेन्टल बेसीसवर आपण घर बांधायची ती घर आपल्याला बांधून देणार ना.

**सत्यवान धनेगावे :-**

एम.एम.आर.डी.ए. ला बांधून देणार.

**रोहिदास पाटील :-**

एम.एम.आर.डी.ए. ला कोण बांधून देणार.

**सत्यवान धनेगावे :-**

विकासक बांधून देणार.

**रोहिदास पाटील :-**

एम.एम.आर.डी.ए. त्या घराचे काय करणार?

**सत्यवान धनेगावे :-**

एम.एम.आर.डी.ए. त्या घराचे काय करणार ह्याबाबत स्टँडिंग कमिटीमध्ये विषय झाला होता की, शासनाने निर्णय घेतला आहे.

**रोहिदास पाटील :-**

स्टँडींग कमिटीमध्ये विषय झाला आहे म्हणून सभागृहात आला आम्ही तुमचे अभिनंदन करतो. मा. महापौराना धन्यवाद देतो. मिरा भाईंदर हद्दीमध्ये ज्या जुन्या इमारती आहेत. आपण आज महापौर आहेत. अधिकारी आधीपासून आहेत. नगरपरिषदेच्या स्थापनेपासून अधिकारी इकडे काम करतात. ह्या शहरामध्ये ह्या इमारती जुन्या होतील, मोडकळीस येतील ह्यातली लोक बेघर होतील ह्यासाठी आपण कोणताही प्रस्ताव करत नाही केलेला नाही, तो करणे गरजेच होत ना, मी आपले मुख्यमंत्र्याचे, अजितदादाचे अभिनंदन करेन आमच्या आशीष शेलारचे अभिनंदन करीन की, ज्यांनी कॅम्पासाठी सारी दुनिया त्यांच्या मागे लागली. मी माझ्या वॉर्डातले सांगतो तिकडे एक हजार लोक बेघर झाली. सगळी मिडीया, सगळे कायदेतज्ञ, पुढारी मागे लागले. माझ्या वॉर्डात चार हजार लोक बेघर झाली आहेत, ते वाऱ्यावर फिरतात त्यांच्यासाठी आपली काय योजना आहे. हे मला विचारायचे आहे.

**मा. महापौर :-**

काका तो वेगळा विषय आहे.

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्याशी संबंधीत आहे.

**मा. महापौर :-**

तो विषय पण घेऊ या.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम तुमचे मी अभिनंदन केले. उपमहापौराचे अभिनंदन केले. ते कधी देतील सांगू द्या त्यांचा काय कार्यक्रम आहे. अधिकारी जूने आहेत आपण नविन आहोत.

**मा. महापौर :-**

ह्याच्यात अधिकाऱ्याचे काही नाही तो विषय मी घेणार. दुसऱ्या महासभेत विषय घ्यायचा आहे. त्याच्यावर थोडस वर्किंग बाकी आहे. ते पूर्ण झाल्यावर पुढच्या महासभेत ते ही घ्यायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना देण्यासाठीच मी प्रवृत्त करतो. तुमच्यावर आरोप नाही.

**मा. महापौर :-**

मा. अजितदादा पवारकडे गेली होती करुन घेतले आहे. थोडस जे बाकी आहे त्याच्यावर करुन दुसऱ्या महासभेत आपण त्याच्यावर चर्चा करु या.

**रोहिदास पाटील :-**

आता विषय असा येणार हा खर्च करायचा आहे हा खर्च होणार आहे. त्याची जी घरे विकासकाकडे आहे त्याचा आकडा आपल्याला माहित आहे का? किती हजार घर आहेत हे प्रयत्न विकासकांनी बांधलेले आहेत. आणि आपल्या ताब्यात घेण बाकी आहे. म्हणजे ते कसे देणार.

**सत्यवान धनेगावे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमधून एम.एम.आर.डी.ए. ला जी घर बांधून हॅन्ड ओव्हर होतील त्यापैकी ५० टक्के घर आपल्याला ट्रान्झीट कॅम्पसाठी मिळणार आहेत.

**रोहिदास पाटील :-**

माझा तोच आग्रह आहे की, जी घर तयार असतील त्याच तातडीने निगोशीएशन होण गरजेच आहे की काही घर आपल्याला ताब्यात घेऊन जे जसे बसतील तसे ............

**सत्यवान धनेगावे :-**

त्यामागची पॉलिसी आपल्याकडे येणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्याचा ताबा घेऊन त्या लोकांना घर दिली पाहिजे. महापालिकेच्या कामकाजातील ही चूक आहे की, आपण व्यवस्था न केल्यामुळे लोकांना सात हजारामध्ये देखील घर भाड्याने मिळत नाही. काही खर्च महापालिकेने घेतला पाहिजे. काही खर्च त्यांनी घेतला पाहिजे आणि त्यांना ताबा दिला पाहिजे. असे काही तरी धोरण आखा आणि ते लवकरात लवकर आणा. लोक वाऱ्यावर फिरतात.

**मा. महापौर :-**

काका दुसऱ्या महासभेत आपण धोरण ठरवून मग त्या लोकांना देऊ या.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने, आताच काकांनी देखील हा विषय घेतलेला आहे. मागच्या जुलै ६/७/१३ ला ह्या संदर्भात ठराव झालेला आहे की, ट्रान्झीट कॅम्प लोकांसाठी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात परंतु ६,७ नंतर अद्यापी झालेले नाही. दिवसेंदिवस धोकादायक इमारतींची संख्या वाढत आहे आणि गरिब लोकांना बाहेर ७,८, १० हजार भाड देण परवडत नाही. त्यामुळे ज्या बिल्डींग तयार आहेत त्या संदर्भात ताबडतोब निर्णय घेऊन ............

**मा. महापौर :-**

मॅडम मी आताच बोलली की, दुसऱ्या महासभेत धोरण ठरवू ............

**निलम ढवण :-**

मॅडम ठराव ७ जुलैला झाला त्यानंतर बरीच लोक आपल्याकडे येतात.

**मा. महापौर :-**

आपण दुसऱ्या महासभेत घेऊ या परमीशन. बाकी होते ते आपण घेतले आहे. आता आपण करु या.

**निलम ढवण :-**

लवकरात लवकर त्याची कारवाई व्हावी.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते. ह्याच विषयाला धरुन आहे. आपण त्या इमारतीकडे जाणारे रस्ते आणि गटारे ह्याच्या सुविधेसाठी आपण आज मान्यता देणार आहोत. मला ह्या अनुषंगाने विचारायचे आहे की, ही घर तेथे बांधण्यात आली आहेत का? आणि ते एम.एम.आर.डी ने हस्तांतरण करुन घेतलेली आहेत का?

**मा. आयुक्त :-**

टोटल ६९६ सदनिका आपल्याला मिळणार आहेत.

**प्रशांत दळवी :-**

परंतु सद्यस्थितीत बिल्डींग उभारली गेली आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, काऊंट डाऊन डेव्हलपर्सची रेन्टल हाऊसिंगची बिल्डींग तयार आहे. अल्पावधीत त्यांना भोगवटा दाखला देण्यात येईल. भोगवटा दाखला दिल्यानंतर मग एम.एम.आर.डी.ए. कडून आपल्याकडे हॅन्ड ओव्हर होतील.

**प्रशांत दळवी :-**

एम.एम.आर.डी.ए. ला अजून पर्यंत ती घर हस्तांतरण करण्यात आली नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

नाही केली.

**प्रशांत दळवी :-**

आपण त्यांना भोगवटा दाखला ही दिला नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

नाही दिला.

**प्रशांत दळवी :-**

आज आपल्याकडे किती इमारती अनधिकृत पाडल्या गेल्या?

**सत्यवान धनेगावे :-**

धोकादायक इमारती ना.

**प्रशांत दळवी :-**

हो.

**सत्यवान धनेगावे :-**

विषय बघा ना. धोकादायकचा काय संबंध.

**प्रशांत दळवी :-**

धोकादायक इमारतीमधून जे गरिब लोक रस्त्यावर आहेत त्यांना रेन्टल हाऊसिंगमध्ये घर देणार आहोत ना. मग पूर्तता का होत नाही, त्यांना ओ.सी. का दिली नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

त्यांनी एम.एम.आर.डी.ए. ला हॅन्ड ओव्हर केल तर ओ.सी. देणार ना.

**प्रशांत दळवी :-**

साहेब आपण म्हणता एम.एम.आर.डी.ए. ला हॅन्ड ओव्हर केल तर माझ्या माहितीप्रमाणे त्या ठिकाणी बिल्डरनी लोकांना घर ताब्यामध्ये दिली आहेत.

**सत्यवान धनेगावे :-**

लोकांना घर दिली त्याच्या सेल्फ कम्पोनेन्ट मध्ये दिली आहेत.

**प्रशांत दळवी :-**

ओ.सी. नसताना त्यांनी पजेशन कस काय दिली.

**सत्यवान धनेगावे :-**

ह्या बिल्डींगच पजेशन दिल त्याला ओ.सी. आहे. रेन्टल हाऊसिंगचा विषय चालू आहे. सेल्फ कम्पोनेन्टचा नाही.

**प्रशांत दळवी :-**

रेन्टल हाऊसिंगमध्ये काही ना तिथे पजेशन देण्यात आले आहे. मग ते कस दिल.

**सत्यवान धनेगावे :-**

रेन्टल हाऊसिंगमध्ये पजेशन दिले नाही.

**प्रशांत दळवी :-**

माझ्या माहितीप्रमाणे देण्यात आले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

माझी कालची माहिती आहे. रेन्टल हाऊसिंगमध्ये पजेशन दिल नाही.

**प्रशांत दळवी :-**

आपण त्यांना कधी देणार.

**सत्यवान धनेगावे :-**

एम.एम.आर.डी.ए. कडून आपल्याला मिळाल्यावर आपण देणार आहोत.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, अजून किती इमारती पडल्या. नंतर गरिब लोक रस्त्यावर येणार आहेत. महापौर मॅडम तुम्ही रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

दुसरा विषय घ्या. सुचनेनुसार ठराव मंजुर करत आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम माझा विषय तोच आहे. ट्रॉन्झीट कॅम्पला एक हजार घर बांधायची आहेत. एक हजार घर बांधायला आपण परवानगी दिली होती. परंतु आज ती झाली नाहीत. मा. महापौर मॅडम मला अस म्हणायच आहे की, आज धोकादायक इमारती आपण पाडल्या. आज १६ बिल्डींग पाडल्या ती गरिब लोक रस्त्यावर आहेत.

**मा. महापौर :-**

आपण दुसऱ्या महासभेत धोरण ठरवून त्यांना घेऊ या.

**प्रशांत दळवी :-**

ह्याच्या अगोदर स्टँडिंगमध्ये २-३ वेळा विषय आला.

**मा. महापौर :-**

स्टँडिंगमध्ये झाला महासभेत आता आला. दुसऱ्या महासभेत विषय घेईन.

**प्रशांत दळवी :-**

१ हजार ट्रान्झीट कॅम्पला आपण मान्यता दिलेली आहे. ते काम का सुरु होत नाही.

**मा. महापौर :-**

आपण दुसऱ्या महासभेत करु या.

**प्रकरण क्र. ५१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. रेन्टल हाऊसिंग स्कीम भागातील सोयी पुरविणे या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ५१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. कडील रेन्टल हाऊसिंग स्कीम अंतर्गत खालील प्रकल्पाच्या नकाशांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | मौजे | सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | भूखंडाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | महाजनवाडी<br><br>सुधारीत | सि.स.क्र. ४५०९ ते ४५१३, ४५१७, ४५४७, ४५४८, ४५७२ ते ४५७५, ४६०४, ४६०९, ४६१०, ४६११, ४६५२, ४६९१, ४६९२, ४७०२ ,४७१०, ते ४७२१, ४७२४ ते ४७३२, स.क्र. ९५/१० ते १२, ९५/१४, १५, ९७/३पै. ९७/५पै, सि.स.क्र. ४६३८,४६३९, ४६४७, ४६८६, ते ४६९०, ४७०४ ते ४७०९, ४७२२, स.क्र. ९४/१, ९४/२, २६० पै. सि.स.क्र. ४३६२, ४४५५, ४४५६, ४३६३, ४४५४, ४६१४, ४५१५, ४५१६, ४५१८, ४५१९, ४५२०, ४५४९, ४१००पै. ९६/१, ९६/४ | ५०२०२.७६ चौ.मी |
| २ | नवघर | ४२/१, ४१/६<br>२५६/१, २५४/६<br>सुधारीत | ३३००.०० चौ.मी. |
| ३ | नवघर | १२९, १३०/३ ४४५,<br>४४६/३<br>सुधारीत | ८९०५.०० चौ.मी |
| ४ | महाजनवाडी | १०७/१ पै., १पै., १०८/१,२,३ १०९/१ ते ७,८ पै., ९ अ, १० ते २८, ११०/१पै. ते ५ पै.<br>सुधारीत | ९७००.०० चौ.मी<br><br>११४५२ चौ.मी |
| ५ | मिरा<br>(महाजनवाडी) | सि.टी. एस. क्र. ४४३६ ते ४४५१, ४४८१, ४४८२, ४४८६ ते ४५०८, ४५४० ते ४५४६, ४५६५ ते ४५७१, ४५९९ ते ४६०३, ४६९९, ४३९८ ते ४४०३<br>सुधारीत | ६५४२.९५ चौ.मी. |

वरील प्रकल्पाच्या ठिकाणी सोयी सुविधा पुरविण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. ने मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रु. ७.९७ कोटी रक्कम वर्ग केलेली आहे. सदर रक्कम मिरा-भाईंदर महानगरपालिकेने "एम.एम.आर.डी.ए. रेन्टल हाऊसिंग स्कीम भागातील सोयी पुरविणे" या लेखाशिर्षाखाली सन २०१३-१४ या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे.

वरील तक्त्यामधील प्रकल्पाच्या ठिकाणी बांधण्यात येत असलेल्या इमारतीकडे जाणारे रस्ते, गटारे यांची कामे करावी लागणार असून त्यांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क रस्ता श्वेता रेसीडेन्सी ते के.डी. एम्पायर पर्यंत रस्ता तयार करणे व एका बाजूस गटार बांधणे. | रु. २,३६,९८,४५०/- |
| २ | मिरारोड (पूर्व) एस.के.स्टोन ते सिंगापूर प्लाझा व पुढे रेल्वे स्टेशन पर्यंतचा रस्ता मजबुतीकरणासह तयार करणे. | रु. २,८९,०७,२००/- |
| ३ | मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन शांतीसागर हॉटेल ते पोस्ट ऑफिस पर्यंतचा रेल्वे समांतर रस्ता तयार करणे. | रु. ७४,४८,५००/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) जया अपार्टमेंट बी विंग ते हरी ओम टॉवर/एम आय डी सी-प्लेझंट पार्क रस्ता जोडणारा डी.पी. रस्ता व उर्वरीत गटार बांधणे. | रु. १,५६,२०,५५०/- |

वरील कामे करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. मार्फत रु. ७.९७ कोटी रक्कम महानगरपालिकेकडे जमा केलेली असून सदर रक्कमेची तरतूद सन २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. तरी सदर कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक सौ. प्रभात प्रकाश पाटील व अनुमोदक श्री. राजेश वेतोसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट मधील ज्योती पार्क ते चाळघर नाल्यापर्यंत चा रस्ता मजबुतीकरणासह तयार करणे रु. २,३०,०९,१००/- या कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे ही सुचना मुळ ठरावात समाविष्ट करुन घेण्यात यावी.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य मदन उदितनारायण सिंह ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

उपरोक्त विषय चांगल्याप्रकारे राबविण्यात यावा व त्वरीत पूर्ण व्हावा, ह्याकरीता संबंधित विषय आपल्या महानगरपालिकेतील असलेल्या कायमस्वरुपी (परमनन्ट) कर्मचाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात यावे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. सुरेश खंडेलवाल व अनुमोदक श्री. वेंचर मेन्डोंसा ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर (पूर्व) रामदेव पार्क रोडवरील सुर्या ऑर्चिड ते आ.क्र. २४८ पर्यंतचा डी. पी. रोड तयार करुन गटारे बांधणे, अंदाजित खर्च रु. १,०१,६८,२००/- या कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे अशी सुचना मुळ ठरावात समाविष्ठ करण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५२, भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११९ येथे क्रिडा संकुल विकसित करणे कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास व महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणे.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सदर विषयाबाबत दिलेल्या गोषवाऱ्यामध्ये शिल्लक असलेल्या वास्तु बांधकामासाठी आर्थिक तरतुदी बाबत स्पष्टीकरण दिलेले नाही. तथापी सदरचा विषयाची परिपूर्ण माहिती पुढच्या मा. महासभेत मान्यतेकरीता सादर करावी असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. ५२ :-**

भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११९ येथे क्रिडा संकुल विकसित करणे कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास व महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणे.

**ठराव क्र. ५२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सदर विषयाबाबत दिलेल्या गोषवाऱ्यामध्ये शिल्लक असलेल्या वास्तु बांधकामासाठी आर्थिक तरतुदी बाबत स्पष्टीकरण दिलेले नाही. तथापी सदरचा विषयाची परिपूर्ण माहिती पुढच्या मा. महासभेत मान्यतेकरीता सादर करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. बर्नड डिमेलो　　　　　　अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५३, भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नुतनीकरण करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, उसमें में एक ठराव देना चाहता हूँ। सबसे पहली बात, महाराष्ट्र कोस्टल झोन को हमारे अधिकारीयों ने उस एरिया के बारे में जो माहिति दिया था, वो सी.आर.झेड वन में है। और इन्होंने उसमें दिया था की, सी.आर.झेड थ्री है। यह पुरी तरह गलत है। इसलिए मैं इसमे एक ठराव करना चाहता हूँ। मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसलपार्क खाडी किनारी महानगरपालिकेने दशक्रिया या विधी करीता शेड बांधलेली आहे. सदरची जागा प्राप्त माहितीनुसार CRZ-१ (बफर झोन) ने बाधीत आहे. तरी सदरील अस्तित्वात असलेल्या वास्तुची डागडूजी व रंगरंगोटी करण्यात यावी व त्याच धर्तीवर भाईंदर (पश्चिम) येथे अस्तित्वात असलेली शेडसुध्दा दशक्रिया तसेच इतर विधीकरीता वापरात येत असल्याने त्याचीही डागडूजी व रंगरंगोटी कराव व दोन्ही वास्तुंमध्ये इतर कुठलेही बदल व बांधकाम करण्यात येऊ नये असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, तो वाचलेला ठराव नीट लक्षात आला नाही. आम्ही आमचा ठराव वाचतो. लक्षात घ्या. सचिव साहेब, तो ठराव परत वाचा. तो ठराव काय आहे?

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, दुसरा ठराव होण्यापूर्वी, श्री. धनेगावे साहेब, हा विषय तुमच्या समोर आहे. हा नगररचनेचा विषय आहे. साहेब हा सी.आर.झेड कोणता लागतो, जिथे ही शेड आज आहे? साहेब, खाडीला लागून आहे.

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सी.आर.झेड. वन बफर झोन आणि सी.आर.झेड थ्री अशा तिन्हीमध्ये ती शेड येते.

**हंसुकूमार पांडे :-**

श्री. खांबित साहेब, सी.आर.झेड वन मतलब उसे खाडी से कितना दूर रहना चाहिए?

**जुबेर इनामदार :-**

साहेब, इथे स्पष्टपणे उल्लेखलेले आहे. महापालिकेने महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट, सी.आर.झेड कडे जे पत्रव्यवहार केलेले आहेत, ॲज पर इन्फॉर्मेशन सबमिटेड, म्हणजे आपण जी माहिती दिली त्यानुसार. त्यांनी स्वतः येऊन पाहणी केलेली नाही. आम्हाला प्राप्त झालेल्या माहिती अनुसार तो सी.आर.झेड वन आहे. धक्क्याला लागून असलेली वस्तू, खाडीला बिल्कुल लागून असलेली वस्तू ...............

**सत्यवान धनेगावे :-**

महापालिकेने एम.सी.झेड.एम. कडे प्रपोजल दिलेले आहे. त्या प्रपोजलमध्ये खाडीपासून किती डिस्टन्सवर आहे ते सर्व डिटेल्स दिल्यानंतर एम.सी.झेड.एम. ने परवानगी दिली.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे तुमच्या म्हणण्याप्रमाणे ५० टक्के आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

पार्टली सी.आर.झेड वन आहे. पार्टली सी.आर.झेड थ्री आहे.

**नगरसचिव :-**

श्री. हंसुकूमार पांडे यांनी वाचलेल्या ठरावाचे मी वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसलपार्क खाडी किनारी महानगरपालिकेने दशक्रिया या विधी करीता शेड बांधलेली आहे. सदरची जागा प्राप्त माहितीनुसार CRZ-१ (बफर झोन) ने बाधीत आहे. तरी सदरील अस्तित्वात असलेल्या वास्तुची डागडूजी व रंगरंगोटी करण्यात यावी व त्याच धर्तीवर भाईंदर (पश्चिम) येथे अस्तित्वात असलेली

शेडसुध्दा दशक्रिया तसेच इतर विधीकरीता वापरात येत असल्याने त्याचीही डागडूजी व रंगरंगोटी कराव व दोन्ही वास्तुंमध्ये इतर कुठलेही बदल व बांधकाम करण्यात येऊ नये असा मी ठराव मांडत आहे.
असा श्री. हंसुकूमार पांडे यांचा ठराव आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एक निवेदन नीट ऐकून घ्या. याच्यावर सभागृहाच्या भावनाही लक्षात घ्या. एक, जर ती बाजू कायद्यानेच चालवायची असेल तर सर्व कामकाज कायद्याने चालेल. कधी-कधी समाजाच्या उपयोगाच्या दृष्टीने, गावाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार बदल करणे हे पालिकेचे अधिकार असतात किंवा नसतात. त्याला महत्व नसते. जी भावना असते की लोकांच्या उपयोगी आहे. हे विधी शेड १९८९ सालापासून चालते. या विधी शेडसाठी महापालिकेने याच्या आधी छोटे पत्र्याचे शेड होते. पत्र्याचे शेड चार खांबांवर होते. लोक जाऊन विधी करत होते, येत होते. शहर वाढत गेले, त्याची गरज वाढत गेली. त्यानंतर त्याला दुरुस्ती केली. त्याच्यापूर्वी दुरुस्तीनंतर सन्मा. नगरसेवक श्री. शशिकांत भोईर आणि श्री. प्रफुल्ल पाटील यांनी त्याचे पुन्हा नुतनीकरण करुन मोठे केले. मोठे करतेवेळी ते जसे पाहिजे तसे झाले नाही. फक्त पत्र्याचे शेड झाले. आता चार माणसे आतमध्ये बसली. पंचवीस माणसे पाऊस आला तरी माणसांना उठून जावे लागते. ऊन आले तरी उठून जावे लागते. ही गोष्ट सभागृहाच्या, प्रशासनाच्या पुन्हा-पुन्हा लक्षात आणण्यासाठी मी तुम्हाला लेखी पत्र दिलेले आहेत की, महापालिकेचे सचिव श्री. हरीभाऊ पाटील यांच्या भावाचे विधीकार्य चालू असते वेळी सर्व लोकांची पळापळ झाली, पाऊस आला. बसायला जागा नव्हती. तत्कालीन उपमहापौर श्री. जयंत पाटील यांच्या भावाचा विधी चालू होता, त्यावेळीही लोकांची पळापळ झाली. आजही तिकडे विधी चालते. त्याला कोणतीही अडचण नाही. आपले जे शेड आहे ते पत्र्याचे आहे. मी गेल्या सभेतपण बोललो होतो. आजही बोलतो. या ठिकाणी विरारपासून, मुंबईपासून, ठाण्यापासून, भिवंडीपासून लोक येत असतात. आपल्या खाडीचे पाणी शुध्द असल्याकारणाने दहिसर, बोरीवलीचे लोक त्या ठिकाणी विधी करु शकत नाहीत. या ठिकाणी मुंबईचे मा. महापौर पण आले. या ठिकाणी भिवंडीचे मा. महापौर पण आले. या ठिकाणी वसई-विरार महापालिकेचे पण मा. महापौर आले. लोक चर्चा करतात की, तुम्हाला चांगली जागा मिळालेली आहे. आणि ज्यावेळी श्री. नारायण मानकर आले होते. त्यावेळी ते पत्रे तुटलेले होते. त्यांनी त्या माणसामध्ये असे बोलले की, काका तुमचे पत्र उडाले. आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवून त्यांना उत्तर दिले होते की, ही वास्तु लवकरात लवकर चांगली बनेल. आमची महापालिका सक्षम आहे, समर्थ आहे. आता जो विषय आलेला आहे, त्यात दुरुस्ती म्हणजे काय? रंगरंगोटी काय? ते तुटलेले पत्र्यांना रंग लावणार आहात? आपण जी मागणी केलेली आहे, मी काल श्री. खांबित साहेबांकडून विषय समजून घेतला. आपण बनवणार म्हणजे काय बनवणार? लोक उगाच अफवा पसरवतात. चार माळ्यांची बिल्डींग बांधणार आहेत, पाच माळ्यांची बिल्डींग बांधणार आहे. काय लँग्वेज काय वापरतात? कुठे बांधतो, कोण बांधतो? सन्मा. सदस्यांनी ते कामकाज समजून घेतले पाहिजे. हा विषय आठ महिने झाले, चाललेला आहे. ती चार माळ्यांची बिल्डींग नाही. त्याला एकही माळा नाही. फक्त आर.सी.सी. शेड आहे. याच्यात जर ठराव मांडायच्या आधी पुन्हा ठराव मांडणार की, ती आर.सी.सी. शेड, तेवढेच नाही तर मी त्यामध्ये असाही ठराव मांडतो की, ती शेड अद्यावत व्हावी. जेणेकरुन त्या पुलावर जर राजधानी गाडी उभी राहिली, तर या महापालिकेने, मा. आयुक्तांनी, मा. महापौरांनी या सन्मा. सभागृहाने एक चांगली वास्तु की, ज्याला एक लुक आहे अशी वास्तू बनावी. आणि त्यासाठी जर या पंचावन्न लाख रुपयांमध्ये निधी कमी पडला असेल तर माझा पंचवीस लाखाचा प्रभाग समिती निधी श्रीम. कल्पना म्हात्रे यांचा पंचवीस लाखाचा प्रभाग समिती निधी आम्ही या सभेतच दिला आहे असे आमचे पत्र घ्यावे आणि जर सन्मा. सदस्यांची समज पटली नसेल तर मला ठराव मांडावा लागेल.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, मैं किसी के भावनाओं से नहीं खेलता हूँ। यह पत्र आपके पास भी आया है। मा. आयुक्त साहब के पास भी आया है। लोगों ने इसका विरोध किया है की, भाईंदर ईस्ट में एकही चौपाटी की जगह है, जहाँ लोग घुमते फिरते है। धार्मिक कार्य होते है। मैं इसके विरोध में नही हूँ की, वहाँ कोई चिज किया जाए। लेकिन मेरा यह कहना है की, जब श्री. प्रफुल्ल पाटील साहब थे, उन्होंने हमें बहुत सहकार्य किया। हमने २००७ में श्री. प्रफुल्ल पाटील साहब से बात भी किया था। वो भी शिफ्टींग के लिए तैयार हो गए थे की, यहाँ पर धार्मिक कार्यक्रम होता है। पांडे जी आप बरोबर बोल रहे हो। श्री. शशिकांत भोईर साहब से बात हो गई थी। उस टाईम पर वो शिफ्टींग के लिए तैयार हो गए थे। तब हमने बोला था की, हमारी निधी लो लेकिन उसमें हमारा नाम मत डालना। आप लोगों का नाम डालिए। जैसा अब काका बोलते है की, हमारी और कल्पना मॅडम की निधी लो। मैं भी आपको आश्वासन देता हूँ की, मेरी और श्रीम. मनिषा पिसाळ का प्रभाग निधी में उनको दे रहा हूँ। वो कही भी शिफ्ट करे और अच्छे से बनाइए। जहाँ लोग घुमतेफिरते है। पुरे जैसल पार्क में चौपाटी के उपर पुरे इस्ट के लोग आते है। वैसे जगह पर सुबह-सुबह रोना शुरु है। यह सब अच्छा नहीं लगता है। इसलिए मेरी सभागृह से विनंती है की, इसको अगर शिफ्ट किया जाए, कही भी अच्छी जगह लेकर किया जाए तो बहुत मेहेरबानी होगी।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, श्री. तुळशीदास म्हात्रे मा. महापौर असताना याच वास्तुसाठी पन्नास लाखाचा निधीपण उपलब्ध करुन दिला होता. मग आज याला विरोध करण्याचे कारण काय? धार्मिक कार्यासाठी ही वास्तु होते आणि तिकडे सर्व लोक विधीसाठी येतात. मॅडम आपण हा ठराव मंजुर न करता त्या ठिकाणी वास्तुला परवानगी देण्यांत यावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, हा विषय सामान्य विषयासारखा नाही. भावनात्मक विषय जोडलेला आहे. श्री. हंसुकूमार पांडे बोलतात हेही सत्य आहे. त्या ठिकाणी मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसाजी नी भेट दिली, श्री. हंसुकूमार पांडे यांनी दिली, मी दिली. अनेक नेत्यांनी त्या ठिकाणी भेट दिली. त्या लोकांची भावना ही आपण समजून घेतलेली आहे. आता या विषयात कुठेतरी राजकारण किंवा कोणाची ही भावना दुखवू नये यासाठी एकमताने हा निर्णय झाला तर योग्य आहे असे मला वाटते.

**मा. महापौर :-**

बोटींगचे जे तिकीट काऊंटर बनते, त्यासाठी मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा तिथे गेलेले. या विधीसाठी गेलेले नव्हते. इनफॅक्ट त्यांनी दहा लाखाचा माझा आमदार निधी देत आहे असे त्यावेळी सांगितले. त्यावेळी श्री. तुळशीदास म्हात्रे महापौर होते.

**नरेंद्र मेहता :-**

मला असे निदर्शनास आले की, लोकांनी या विषयावर त्यांची भावना त्यांच्यासमोर मांडली असेल. कारण मी सुध्दा तिकीटासाठी गेलो होतो तेव्हा भावना मांडली. श्री. हंसुकूमार पांडे गेले, तेव्हाही भावना मांडली. सर्वांचे हे मत होते की, ही चौपाटी सुंदर आहे. पण अनेक वर्षापासून आपण त्या ठिकाणी दशक्रीया विधी करतो. तर त्या ठिकाणी शेवटी आम्ही लोकांना हे आश्वासन दिले की, ठिक आहे. पण ते आर.सी.सी. बांधकाम झाले तर ते पत्रे उडून जातात, पावसात गळते, ऊन पडते हे होणार नाही.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब, कोणत्या साली पत्रे उडून गेले ते तुम्ही मला सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

यांच्या बंगल्यामधून त्यांना काय दिसते?

**प्रविण पाटील :-**

मुळ परिस्थिती ती आहे. त्यांचे घर तिकडे आहे. त्यातून ते दिसते म्हणून त्याचे हे कारण आहे. आणि ती विधी शेड तिकडून हलवायची नाही.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. सदस्य श्री. हंसूकुमार पांडे यांनी त्यांची भावना मांडली की, ते शिफ्टींग करुन घ्या. पण हे विधी कार्य असे आहे, ते समुद्र किनारीच होते.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

जेव्हा बांधली जात होती तेव्हा तुम्ही नगरसेवक होते, तेव्हा तुम्ही विरोध केला नाही?

**हंसुकूमार पांडे :-**

तेव्हा मी नगरसेवक नव्हतो.

**निलम ढवण :-**

आता त्रास का व्हायला लागला?

**प्रविण पाटील :-**

पांडेजी स्मशान और कब्रस्तान का जगह चेंज किया जा सकता है क्या?

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, काका की भावना कोई गलत नहीं है। श्री. हंसुकूमार पांडेजी की भावना गलत नहीं है। उनका प्रस्ताव अलग था। काका का भी अच्छा प्रस्ताव है। सब सदस्यों का मत एक है की, वहाँ होना चाहिए। अल्टरनेट जगह के लिए भी सुझाव दिया लेकिन अल्टरनेट जगह खाड़ी के किनारे ही होनी चाहिए यह भी वस्तुस्थिती है। तो मेरा यह सुझाव है की, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, सब गटनेता जाकर लोकेशन देखकर अगर आम सहमती से अगल बगल में किसी का विरोध ना हो और शिफ्ट होकर एक बढिया वास्तु बन सकता है तो उसको .................

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

सर्व लोकांसाठी तिथे काम होते आहे. संपूर्ण शहरासाठी तिथे काम होत आहे.

**प्रभात पाटील :-**

पन्नास हजार खर्च करा किंवा लाख रुपये खर्च करा. परंतु, तिथे विधीकार्य होण्यासाठी जागा पाहिजेच पाहिजे.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, मेरे ठराव में मैंने जगह का विरोध नहीं किया है।

**जुबेर इनामदार :-**

सभागृहाची दिशाभूल करायचा प्रयत्न केला जातो आहे. ठरावामध्ये स्थलांतरित करायचा विषयच मांडलेला नाही.

**मा. महापौर :-**

त्यांच्या ठरावामध्ये त्यांनी शिफ्ट करा म्हणून उल्लेख केलेलाच नाही.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील यांनी श्री. तुळशीदास म्हात्रे साहेबांचा उल्लेख केला. आमच्या पक्षाचे माजी महापौर आहेत. तेव्हा हा विषय सार्वजनिक नव्हता. त्यांनी आपला निर्णय स्वतःहून घेतला होता. मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा यांनीही घेतला असेल. मात्र त्या परिसरातील लोकांच्या भावना आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

शहरातील लोकांची पण गरज आहे. शहरातील इतर लोकांच्या पण त्याच्याशी भावना आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, श्री. हंसुकूमार पांडे सांगतात की, रंग व डागडुजी करुन घ्या. पण ती वास्तु तिथेच पाहिजे. मग नवीन बनवायला प्रॉब्लेम काय आहे?

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, त्यांना ठराव वाचू द्या. भरपूर चर्चा झालेली आहे. त्यांचा ठराव होऊन जाऊ द्या. त्यांची भुमिका ते मांडतील. आमची भुमिका आम्ही मांडून झालेली आहे.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, तिकडे ५६ लाखाची गरजही नसेल. त्यापेक्षा कमी खर्चामध्ये पण होऊ शकेल. परंतु, ज्या प्रायोगिक सुखसुविधा आहेत. ज्या अत्यावश्यक सेवा आहेत त्या तिथे करा आणि त्या कामाची सुरुवात आहे ॲज इट इज राहू द्या. आमचे काही म्हणणे नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

कमी पडले तर आम्ही आमचा नगरसेवक निधी देऊ.

**प्रभात पाटील :-**

कमी पडणार नाही. ज्या प्राथमिक सुविधा आहेत त्या द्या. बस झाले. एवढ्या खर्चाची पण गरज नाही. तिथे पाणी नसते. तिथे कपडे बदलायला शेड नाही. त्या सामान्य गोष्टी आहेत. तेवढ्या केल्या तरी खूप झाले. एवढ्या खर्चाला पण मान्यता देण्याची काही गरज नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, वास्तुचे एस्टिमेट तयार करा आणि त्या हिशोबाने करुन घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये आमची फक्त एकाच लाईनची सुधारणा आहे की, ते परमनन्ट आर.सी.सी. केले तर छपरे, दरवेळी ते रिपेअरींग, दुरुस्ती ............

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही ठराव मांडलेला आहे. तो नियमबाह्य विषय होईल. त्यांना त्यांची भुमिका मांडू द्या.

**नरेंद्र मेहता :-**

त्या ठरावामध्ये एका लाईनची सुधारणा आहे. डागडुजीचा अर्थ मला समजलेला नाही. ते आर.सी.सी. करावे एवढीच आमची मागणी आहे. मॅडम, हे ठराव झाल्यानंतर दोन ठिकाणी फिरवले जातील आणि वेगवेगळे आरोप होणार आहेत. म्हणून आमची चिंता आहे की, एकमताने होऊ द्या. श्री. हंसुकूमार पांडे यांनी मांडले तेवढेच की, जागा शिफ्टींग करु नये. त्यांनी एवढे मांडले आहे की, डागडुजी रंगरंगोटी सगळे करा. आम्ही मांडले की, आर.सी.सी. करा, तर दरवेळी खर्च करायची आवश्यकता नाही. आम्ही तेवढेच मांडलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

श्री. हंसुकुमार पांडे यांनी जो ठराव मांडला की, रंगरंगोटी करा आणि ते म्हणतात की, भविष्यात शिफ्टींग करा. तेही चांगले आहे. त्यांची तीपण सुचना पटलावर ठेवा की, त्यांना भविष्यात तिथे नको तर आपण त्यांची तीपण सुचना ग्राह्य धरु आणि त्यांनी दुसरी एक सुचना केली की, तिथे आवश्यक ती रंगरंगोटी

आणि जे काही करायचे आहे. त्याला सुध्दा त्यांचा विरोध नाही. त्यामध्ये दोन गोष्टी आहेत की, एक कपडे बदलण्यासाठी शेड. साधारणतः तिथे माणसाला पंचा नेसावा लागतो किंवा हे जे विधी होतात, ते पुरुष मंडळींचेच काम असते. तर ते सगळ्या बायकांमध्ये कधी-कधी पॉसीबल होत नाही. ती एक शेड जर आतमध्ये करता आली, म्हणजे टॉयलेट स्वरुपाचे करुन ती प्रोव्हीजन त्याच्यामध्ये करा. आणि पिण्याच्या पाण्याचीही सोय नसते. तर त्यांच्या ठरावामध्ये या सुचना घ्या आणि तोच ठराव मंजुर करावा. माझी तुम्हाला विनंती आहे की, ज्या प्राथमिक सुविधा आहेत, त्या त्याच्यामध्ये नमुद कराव्या आणि श्री. हंसुकूमार पांडे यांनी मांडलेला ठरावच मंजूर करावा.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आम्ही आमचा ठराव मांडतो.

**प्रभात पाटील :-**

काका, उगीच वादाला मुद्दा करु नका. मी तुम्हाला पुन्हा म्हणते ................

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी आर.सी.सी. शब्द वापरुन दुरुस्त करावे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही तिथे मजबूत करायला आर.सी.सी. पिलर टाका. पुन्हा त्या विषयाला तुम्ही चिघळू नका. दोन ठराव आले तर पुन्हा कॉन्ट्रावर्सी होईल. ज्या प्राथमिक सुविधा आहेत, त्या सुविधा त्याच्यामध्ये नमुद करा. तुम्हाला ज्या दोन-तीन गोष्टी त्यांच्या ठरावामध्ये नमुद करायच्या असतील त्या करा आणि त्यांचा ठराव मंजुर करा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, हा जो आर.सी.सी. स्ट्रक्चरचा प्लान आहे, तो सी.आर.झेडच्या अधिकाऱ्यांकडे पाठवून द्या. त्यांची मान्यता येऊ द्या.

**निलम ढवण :-**

श्री. जुबेर इनामदार साहेब, इनामदार साहेब, तुम्ही त्यांच्याकडे विधी शेडसाठी परमिशनसाठी पाठवता. अशी बरीचशी अनधिकृत बांधकामे त्या बाजूला सी.आर.झेड मध्ये झालेली आहेत. त्यांची परमिशन कुठे आहे? हा लोकांच्या भावानांशी संबंधित विषय असताना ...................

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या पालिकेने हा जो प्लान बनवला आहे, तो सी.आर.झेड ऑथोरीटीकडे पाठवून द्या. त्यांची मान्यता येऊ द्या.

**मा. महापौर :-**

श्रीम. प्रभात पाटील मॅडम बोलल्या त्याप्रमाणे आपण करुन घेऊ.

**हंसुकूमार पांडे :-**

श्रीम. प्रभात पाटील मॅडमने जो बोला उससे मैं सहमत हूँ। प्रभात ताई की सुचना को समाविष्ट करके लिया जाए।

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, यांनी जो ठराव दिलेला आहे. त्याच्यात आम्ही सुचना देतो. ही सुचना घेत नसाल तर आम्ही ठराव मांडतो. सदर विधी शेडमध्ये आर.सी.सी. करावे व आवश्यक त्या सोयी जसे प्रभात पाटील मॅडमनी सांगितले की, बाथरुम पाहिजे ............

**मा. महापौर :-**

मी तेच तर बोलले की, श्रीम. प्रभात पाटील मॅडमनी सांगितले त्याचप्रमाणे करायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

वरचे छप्पर आर.सी.सी. हे बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम, आर.सी.सी. बांधकाम करण्यासाठी परमिशन लागेल. एका बाजूला आम्ही ठराव करतो की, सी.आर.झेड ने बाधित आहे. बफर झोन आहे सी.आर.झेड वन आहे. दुसऱ्या बाजूला आम्ही आर.सी.सी. कन्स्ट्रक्शन करायला मान्यता द्यायची? हे नियमबाह्य काम आम्ही करणार नाही. तुम्ही त्यांची मान्यता घेऊन या आणि करा.

**रोहिदास पाटील :-**

मा. आमदारांनी तिकडे लाखो रुपये खर्च केले, ते आम्ही कोर्टात नेऊ का?

**जुबेर इनामदार :-**

मा. आमदारांनी जे केले ते शहराच्या चांगल्यासाठी केले आहे. लोकांना त्याचा फायदा आहे. आणि सन्मा. श्री. रोहिदास पाटील साहेब, तिकडे जे काम झालेले आहे. त्याच्यामध्ये स्ट्रक्चरल बांधकाम नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर मॅडम, आपण आता जे छप्पन लाख रुपये काढलेले आहेत. ते कशासाठी काढलेले आहेत? ते आपण कशासाठी खर्च करणार? कलरसाठी, पत्र्यासाठी? मग त्यामध्ये आर.सी.सी. लिहा.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, त्यांनी जो ठराव मांडला, त्याच्यामध्ये मी सुचना मांडतो आहे. ही सुचना तुम्ही स्विकारायची आहे. जर स्विकारली नाही तर आम्ही ठराव मांडणार. कोणत्याही पक्षाने, व्यक्तीने जिद्द पकडण्यासाठी गरजच नाही. आज शांत डोक्याने काम करायचे आहे. शेड होणे गरजेचे आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

काका, जिद आप पकडकर बैठे हो। मैं जिद पकडकर नहीं बैठा हूँ।

**प्रविण पाटील :-**

श्री. जुबेर इनामदार हे कुठले नगरसेवक आहे? मिरारोडचे की भाईंदरचे?

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही न्याय देत नसाल तर आम्हाला ठराव मांडायला लागेल. सभागृह सांभाळून घ्यायचं तुमचे आणि आमचे काम आहे.

**वंदना मंगेश पाटील :-**

मा. महापौर मॅडम ह्याच्यात गाववाल्याच्या भावना लक्षात ठेवा मिरा भाईंदर हे असे शहर आहे की, इथे सगळ्या जाती, धर्माची लोक सलोख्याने राहतात त्यामुळे त्यांच्या भावना दुखावल्या जाऊ नये अशी मी त्यांना विनंती करते.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, जेसलपार्क चौपाटीवरची दशक्रिया विधीची शेड हा जितका गरजेचा मुद्दा आहे तितका भावनिक मुद्दा देखील बनलेला आहे हे चित्र सभागृहात आहे सगळ्या मतांचा विचार करुन सन्मा. हंसु कुमार पांडेनी ठराव मांडला ठरावामध्ये काही सुचना व्हाव्यात काकांचे जे म्हणणे आहे म्हणजे आपण सर्व पक्षीय नव्हे त्याही गोष्टीची पूर्तता होऊ शकेल अशी मी उपसुचना मांडते त्या शेडमध्ये आहे त्या स्थितीमध्ये तिथे एक चेंजिंग रुम, बाथरुम त्यानंतर पाण्याची सोय, मघाशी काकांनी म्हटल्याप्रमाणे पाऊस आला किंवा वारा आला तर पावसाच्या पाण्यात लोक भिजतात कारण पाऊस चारी बाजुने येतो. चार जे पिलर किंवा कॉर्नर आहेत. तिथे सूशोभिकरण करा. ज्याला आपण फेन्सींग म्हणू शकू. म्हणजे लोकांचे संरक्षण होईल आणि ते दिसायलाही चांगले दिसेल अशा आवश्यक त्या सोयी सुविधा केल्या तर मला असं वाटते की, हंसु कुमार पांडेनी जो ठराव मांडला आहे त्या ठरावाला त्याच अनुमोदनच असेल किंवा त्याला त्याची सहमती असेल मला असं वाटते काकांचेही समाधान होईल. तर मुळ ठरावामध्ये ह्या गोष्टीची पूर्तता करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना चक्रे :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे आवश्यक काम असल्याकारणाने शहरातील लोकांची सेवा होण्याच्या दृष्टीने शहराची शान वाढण्याच्या दृष्टीने ह्या अत्यावश्यक सुविधेविषयी ज्याला म्हणतात पक्क बांधकाम आर.सी.सी. बांधकामाचा शब्द वापरा अगर काय वापरा त्या सहीत होणं अशी माझी दुरुस्ती आहे तसं असेल स्विकारलं असेल तर नाहीतर आम्ही ठराव मांडतो. तुमचा निर्णय द्या ते चार खांबे उभे केले त्याचीच अडचण होते कारण प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावामध्ये आपण कशाला काटकसर करतो. चांगलं बनवू द्या ना. चांगलं लुक घ्या प्रशासनाला प्रश्न विचारुन अडचणीत आणून ठेऊ नका.

**प्रभात पाटील :-**

सुशोभिकरणात सगळ्याच गोष्टी आल्या.

**रोहिदास पाटील :-**

आर.सी.सी. शब्द त्याच्यात पाहिजे नाहीतर ते होणार नाही.

**मा. महापौर :-**

काका, ते पण तेच म्हणतात की, आर.सी.सी. नाही छपरे टाकायचे.

**रोहिदास पाटील :-**

आर.सी.सी. नाही तर बदल करणार.

**वंदना मं. पाटील :-**

आर.सी.सी. साठी त्यांना काय प्रॉब्लेम आहे ते विचारा.

**रोहिदास पाटील :-**

आर.सी.सी. का नको ते रिझन द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

समुद्र किनारा असल्यामुळे वारा, वादळ असल्यामुळे छपरे उडुन जातात ते छप्पर किती वेळा बदलणार त्यापेक्षा आर.सी.सी. करु द्या विषय संपला.

**मा. महापौर :-**

सर्वांची भावना लक्षात घेऊन आपण बसून त्याच्यावर निर्णय घेऊन पुढे ढकलू या.

**रोहिदास पाटील :-**

कशासाठी पूढे ढकलता पुढे ढकलण्याचा अर्थ काय?

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, फक्त आर.सी.सी. ला परमिशन द्यायची आहे.

**वंदना मं. पाटील :-**

मॅडम, त्यांना विचारा आर.सी.सी. साठी काय प्रॉब्लेम आहे.

**रोहिदास पाटील :-**

९८ नगरसेवक आहेत आपण तिघं बोलून तरी काय बोलणार? ९८ नगरसेवक साक्षीला आहे. प्रशासन साक्षीला आहे. तुम्हाला असं वाटते आर.सी.सी. बनवायचं नाही. तुमचं धोरण बांधा. आमचा आग्रह आहे आर.सी.सी. बनवायचं आहे लुक कसा द्यायचा तो द्या.

**मा. महापौर :-**

मी पहिलं म्हटलं ना सन्मा. विरोधी पक्ष नेता, सन्मा. सभागृह नेता, प्रभाग समितीचे सर्व सभापती आपण बसूया ह्याच्यावर निर्णय घेऊया. पुढच्या मिटींगला हा विषय परत आणूया.

**नरेंद्र मेहता :-**

एक विनंती राहिल बाकी विषयासारखा हा विषय लांबता कामा नये. आपण आपल्या सोयीप्रमाणे बैठक बोलवा.

**मा. महापौर :-**

आपण दुसऱ्या मिटींगला घेऊया. पुढचा विषय घ्या.

**(सदरचा विषय मा. महापौरांच्या आदेशाने तहकुब करण्यात आला)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५४, राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलिस पथक निर्माण करणे व पोलिस स्टेशन स्थापन करणेबाबत. (फेर सादर)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी उपाय योजना करण्याकरीता शासन निर्णय दि. ०२ मार्च २००९ अन्वये निर्णय घेतला आहे. नागरी गुन्ह्यांची नोंदणी, तपासणी व खटला भरण्यासाठी स्थापन करावयाच्या विशेष कक्षासाठी खालील संवर्गातील पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण करणे प्रस्तावित आहे.

**परिशिष्ट-अ नागरी पोलीस यंत्रणेसाठीचा आकृतीबंध**
**(महानगरपालिका क्षेत्रासाठी)**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारीत) | ड-वर्ग मनपासाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक | ८०००-२७५-१३५०० | ०१ |
| २. | पोलीस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | ०१ |
| ३. | सहा. पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | - |
| ४. | पोलीस उप- निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ०४ |
| ५. | सहा. पोलीस उप- निरीक्षक | ४५००-१२५-७००० | ०० |
| ६. | पोलीस हवालदार | ४०००-१००-६००० | ०४ |
| ७. | सशस्त्र पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | २४ |
| ८. | महिला पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | १६ |
| ९. | पोलीस नाईक | ४०००-१००-६००० | ०३ |
| | | **एकुण** | **५३** |

परिशिष्ट-ब नागरीगुन्ह्यांच्या नोंदणी, तपास व खटला भरणेकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलीस स्टेशनसाठीचा आकृतीबंध

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | ड-वर्ग मनपासाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | ०१ |
| २. | पोलीस उप- निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ०१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | सहा.पोलीस उप- निरीक्षक | ४५००-१२५-७००० | | ०१ |
| ४. | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | | ०४ |
| ५. | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | | ०८ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | | ०१ |
| ७. | वाहन चालक | ४०००-१००-६००० | | ०१ |
| | | | एकुण | १७ |

उक्त पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार आहेत. तथापी त्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती आगावू (Advance Payment) च्या स्वरुपात महानगरपालिकेने करावयाची आहे. ही बाब विचारात घेऊन ही सभा

अ) उक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि महानगरपालिकेसाठी अनुज्ञेय असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन अंशदान होणाऱ्या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरुपात राज्य शासनाकडे/संबंधित पोलीस आयुक्तालयाकडे भरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच

ब) सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणाऱ्या वाहन, कार्यालय व इतर सुविधांवर येणाऱ्या खर्चास व तो शासनाकडे/संबंधित विभागाच्या पोलीस आयुक्तांकडे आगावू स्वरुपात भरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच

क) सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणाऱ्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात नविन लेखाशिर्ष निर्माण करुन त्याखाली आवश्यक तरतुद प्रतिवर्षी करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५४ :-**

राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरीता पोलिस पथक निर्माण करणे व पोलिस स्टेशन स्थापन करणेबाबत. (फेर सादर)

**ठराव क्र. ५३ :-**

राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी उपाय योजना करण्याकरीता शासन निर्णय दि. ०२ मार्च २००९ अन्वये निर्णय घेतला आहे. नागरी गुन्ह्यांची नोंदणी, तपासणी व खटला भरण्यासाठी स्थापन करावयाच्या विशेष कक्षासाठी खालील संवर्गातील पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण करणे प्रस्तावित आहे.

**परिशिष्ट-अ नागरी पोलीस यंत्रणेसाठीचा आकृतीबंध**
**(महानगरपालिका क्षेत्रासाठी)**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारीत) | ड-वर्ग मनपासाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक | ८०००-२७५-१३५०० | ०१ |
| २. | पोलीस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | ०१ |
| ३. | सहा. पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | - |
| ४. | पोलीस उप- निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ०४ |
| ५. | सहा. पोलीस उप- निरीक्षक | ४५००-१२५-७००० | ०० |
| ६. | पोलीस हवालदार | ४०००-१००-६००० | ०४ |
| ७. | सशस्त्र पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | २४ |
| ८. | महिला पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | १६ |
| ९. | पोलीस नाईक | ४०००-१००-६००० | ०३ |
| | | एकुण | ५३ |

परिशिष्ट-ब नागरीगुन्ह्यांच्या नोंदणी, तपास व खटला भरणेकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलीस स्टेशनसाठीचा आकृतीबंध

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | ड-वर्ग मनपासाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | ०१ |
| २. | पोलीस उप- निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | सहा.पोलीस उप- निरीक्षक | ४५००-१२५-७००० | ०१ |
| ४. | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ०४ |
| ५. | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | ०८ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | ०१ |
| ७. | वाहन चालक | ४०००-१००-६००० | ०१ |
| | | **एकुण** | **१७** |

उक्त पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार आहेत. तथापी त्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती आगावू (Advance Payment) च्या स्वरुपात महानगरपालिकेने करावयाची आहे. ही बाब विचारात घेऊन ही सभा

अ) उक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि महानगरपालिकेसाठी अनुज्ञेय असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन अंशदान होणाऱ्या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरुपात राज्य शासनाकडे/संबंधित पोलीस आयुक्तालयाकडे भरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच

ब) सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणाऱ्या वाहन, कार्यालय व इतर सुविधांवर येणाऱ्या खर्चास व तो शासनाकडे/संबंधित विभागाच्या पोलीस आयुक्तांकडे आगावू स्वरुपात भरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच

क) सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणाऱ्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात नविन लेखाशिर्ष निर्माण करुन त्याखाली आवश्यक तरतुद प्रतिवर्षी करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५५, महानगरपालिकेच्या विविध प्रयोजनासाठी शासकीय जागा मागणी प्रस्ताव करणे व आर्थिक खर्चासाठी प्रशासकीय मंजूरी देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये एकुण ३८६ आरक्षणे विविध प्रयोजनाकरिता दर्शविण्यात आलेली आहेत. सदर आरक्षणापैकी शासकीय जागेवर दर्शविण्यात आलेल्या आरक्षणांची संख्या २८ आहेत. सदर पैकी हस्तांतरीत झालेल्या आरक्षणांची संख्या २७ आहेत. यापैकी मिरा भाईंदर महानगरपालिका समूचित प्राधिकरण असलेल्या आरक्षणाखालील जागा २१ आहेत व इतर संस्थांनी विकसीत करावयाच्या आरक्षणांची संख्या ७ आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजना आरक्षणाखाली असलेल्या शासकीय जागा अतिक्रमणापासून संरक्षण होणेकरिता मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील आदेश क्र. महसूल/क-१/टे-१/एलबीपी/अति.संरक्षण/एसआर-०३/१०, दि.०७/१०/२०१० अन्वये एकूण ०८ जागा व क्र. महसूल/क-१/टे-१/एलबीपी/अति.संरक्षण/एसआर-०४/१०, दि.०७/१०/२०१० अन्वये एकूण १७ जागा अशा एकूण २५ जागांचा महानगरपालिकेस आदेशात नमुद अटी व शर्तीस अधिन राहुन आगाऊ ताबा देण्यात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस आरक्षणा व्यतिरिक्त विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी शासकीय जागेची आवश्यकता असते. आरक्षणा व्यतिरिक्त इतर शासकीय जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेतल्यानंतर सार्वजनिक सोईसुविधा / प्रयोजनासाठी वापर करता येवू शकतो, म्हणून प्रथमतः अशा शासकीय जागा हस्तांतरीत करुन घेण्यासाठी शासनास / विविध प्राधिकरणास प्रस्ताव सादर करणे, तसेच पाठपुरावा करुन जागा ताब्यात घेणे आवश्यक आहे. म्हणून महानगरपालिकेच्या विविध प्रयोजनासाठी शासकीय जागा मागणी प्रस्ताव तयार करणे, सादर करणे व पाठपुरावा करुन हस्तांतरीत करुन घेण्यासाठी आयुक्त, मिरा

भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करुन उक्त शासकीय जागा संपादनासाठी होणा-या खर्चास ही आर्थिक व प्रशासकीय मंजूरीसह जागा हस्तांतर करुन घेण्यासाठीचे सर्व अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम माझी एक सुचना आहे की, महासभा दि. १५ जानेवारी २०१३ मध्ये...........

**शरद पाटील :-**

मॅडम मला बोलायचे आहे अतिक्रमणसाठी आपण.............

**मा. महापौर :-**

५४ झालं, ५५ पण झालं सर्व झालं आता "ज" चा विषय आहे.

**शरद पाटील :-**

आम्हाला ह्याच्यावर बोलू द्या बोललं नाही तर कसं व्हायचं.

**मा. महापौर :-**

रुलींग द्यायच्या अगोदर मी पाच मिनिटे थांबली.

**शरद पाटील :-**

ह्याला विरोध नाही पण बोललं नाही तर होणार नाही. मॅडम, आपण सभागृहामध्ये त्यावेळेला रुलींग दिलेली आहे आणि अधिकारी फक्त नगरसेवकांची नाव डिक्लेअर करायची असतील तर अधिकाऱ्यांना अतिक्रमणवरुन काढून टाका. अतिक्रमण विभागाची आपल्याला गरज नाही. फुकट त्यांच्या पगारावर खर्च करायचा आणि ह्यांनी फक्त नगरसेवकांची नाव सांगायची कोणी सांगितलं ह्यांनी सांगितलं तुमचं काम नाही. छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर आजही फेरीवाले बसतात. सगळ्या गल्ल्या सोडा. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग तुम्ही खाली करु शकत नाही तिथे फेरीवाले बसतात. अधिकारी तिथून रोज येत नाही का? त्यांना माहित नाही सगळं करुन द्यायचं पोलिस प्रोटेक्शन द्यायचं पोलिस प्रोटेक्शन आल्यानंतर काय होणार ते सांगतो ना? परत एखाद्या नगरसेवकांनी एखाद्या तक्रार केली तर त्याचं नाव सांगायचं मग त्याला त्या माणसाचा फोन जाणार हा विषय मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये चालला आहे. त्यादिवशी मोहिते साहेबांना विरोधी पक्षनेत्यांनी बोलवून घेतले होते ते म्हणतात मी काय करु तुम्ही प्रभाग अधिकाऱ्यांना सांगा म्हणजे तुम्ही काय फक्त बॉल ढकलत राहायचं आम्ही काय सगळ्याच्या मागे धावत राहायचं का? मॅडम तुम्ही ह्याच्यात लक्ष घाला तुम्ही त्यावेळेला सुध्दा सांगितलं होतं की, कोणत्याही नगरसेवकांनी तिथे शिफारस केली नाही पाहिजे. मला कोणाला दुखवायचे नाही. कोणाच्या विरोधात बोलायचे नाही. तुम्ही चला छत्रपती मार्गावर तुम्हाला दाखवतो किती पाणी पुरीच्या गाड्या आणि किती मच्छीचा धंदा लागतो तुम्हाला दाखवतो.

**मा. महापौर :-**

मी कमिशनर साहेबांना शनिवारी बोलली की, तुम्ही मेन रस्ता खाली करा मच्छी विकणाऱ्यावर मी देखील ऑब्जेक्शन घेतले आहे.

**शरद पाटील :-**

मॅडम, तुमच हातात आहे आम्ही तुमच्यावर भरवसा ठेवतो तुम्ही दिलेलं रुलिंग आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, आपण मागच्या महासभेत आदेश दिले होते की, चार दिवसात नवघर रोड, बी.पी. रोड सगळं खाली करा फेरीवाले उठवा आज महिनभरानी पुन्हा मिटींग झाली परंतु तिकडे एकदाही कारवाई केली गेली नाही आपल्या आदेशाला देखील ते मानत नाहीत का?

**मा. महापौर :-**

कारवाई झालेली.

**निलम ढवण :-**

आम्ही तिकडे राहतो आम्हाला माहिती आहे. तिकडे चालणं मुश्किल होते एवढे अपघात होतात आपण त्याच्यावर कारवाई करा असे आदेश दिले.

**मा. महापौर :-**

मिरारोड, भाईंदर वेस्ट इकडे कारवाई झाली आहे.

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम, कारवाई केले अशा पत्राची उत्तरं नगरसेवकांना दिली पण कारवाई केली नाही. हायवे परिसरामध्ये............

**मा. महापौर :-**

ठीक आहे तिथेही कारवाई होऊन जाईल.

**अनिल भोसले :-**

मॅडम, आमचा विषय समजून घ्या. हायवे परिसरामध्ये जेवढे अपघात होतात त्याची माहिती घ्या. फेरीवाल्याचे एवढं वाढले आहे की, आपण फुटपाथ बनवले आहेत काशिमिरा मध्ये जेवढे फुटपाथ आहेत त्या फुटपाथावर माणसाला चालायला रस्ता नाही आणि हायवेच्या रस्त्यांनी जाताना अनेकांचे अपघात झालेले आहेत अतिक्रमण विभगाला अनेक पत्र देऊन सुध्दा आणि मागच्या महासभेत रुलींग देऊनसुध्दा कारवाई झाली नाही. त्यांनी फक्त पत्र पाठवलं की आम्ही कारवाई केली. मॅडम, कारवाई केली नाही ही सत्य परिस्थीती आहे.

**मा. महापौर :-**

ठीक आहे त्याच्यावरही आपण कारवाई करु या.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, मागच्या मिटींगमध्ये आपण रुलींग दिले होते की, चार दिवसामध्ये मिरारोडमध्ये कारवाई करायची आहे. तिकडे कारवाई झाली आणि अजून एक रुलींग दिली होती की, जिकडे ना फेरीवाला क्षेत्र आहे तिकडे कारवाई झाली आणि अजून एक रुलींग दिली होती की, जिकडे ना फेरीवाला क्षेत्र आहे तिकडे फेरीवाला क्षेत्र असे बोर्ड लावा तिकडे एक महिना झाला अजून एक पण बोर्ड लावले नाही आणि बोर्ड येऊन तिकडे पडले आहे. प्रभाग कार्यालयाला आम्ही सांगतो कारवाई करा तरीपण ते कारवाई करत नाही. तुमचं जर ते ऐकत नाही तर आमचे कसे ऐकणार.

**मा. महापौर :-**

कारवाई झालेली आहे. मला माहित आहे. कितीतरी नगरसेवकांनी मला फोन करुन सांगितले की, मॅडम कारवाई झालेली आहे.

**दिनेश जैन :-**

मॅडम, कुठे झाली आहे. एवढे नगरसेवक बसले आहेत त्यांना विचारा.

**निलम ढवण :-**

मॅडम, नवघर रोड आणि बी.पी. रोडचे कोणी सांगितले असेल तर विचारा.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. मी पून्हा एकदा आदेश देते की, जिथे कारवाई झाली नाही तिथे पण करुन घ्या.

**दिनेश जैन :-**

बोर्ड पण लावले नाही.

**मा. महापौर :-**

बोर्ड लावून घेऊया.

**अनिल भोसले :-**

प्रभाग ६ मध्ये कारवाई झालेली नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो बी.पी. रोड वरील हिरा पन्ना बिल्डींग आणि गायत्री नगर बिल्डींग तोडलेले आहेत. अर्धे तोडले आहे त्यामुळे रस्ता अरुंद झालेला आहे. आणि त्या रस्त्यावरुन डांबरीकरणासाठी दगड टाकून ठेवलेले आहेत त्याचे डांबरीकरण होत नाही. आम्ही ठेकेदाराला विचारले डांबरीकरण का होत नाही. मॅडम हिरा पन्ना बिल्डींग अजून साफ केलेली नाही. त्यामुळे रस्ता अजून अरुंद झालेला आहे. ती बिल्डींग कधी तोडणार आणि रस्ता कधी करणार ते मॅडम विचारुन घ्या.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**वंदना मं. पाटील :-**

आजपर्यंत एकापण फेरीवाल्याला उचलले गेले नाही.

**दिनेश जैन :-**

आपण आर.टी.ओ. चे पथक तयार केले होते. पण आता आपली लोक रोडवर दिसतात ते आर.टी.ओ. पोलिस असतात ते दिसत नाही. त्या लोकांची जबाबदारी आपण पूर्ण केली म्हणजे झाले का?

**मा. महापौर :-**

पोलिस असतात. त्यांची माणस कमी आहेत म्हणून त्यांनी वॉर्डन मागून घेतले आहेत. मी शहरात फिरते तर कुठे कुठे वॉर्डन बरोबर पोलिसही असतात.

**दिनेश जैन :-**

कुठे-कुठे असतात नाहीतर त्याच्या डिपार्टमेंटची लोक कमी केली आणि आपली लोक काम करतात म्हणून.

**मा. महापौर :-**

नाही.

**दिनेश जैन :-**

तुम्ही त्याच्यावर लक्ष द्या.

**मॉरस रॉड्रिक्स :-**

मा. महापौर मॅडम मा. कमिशनर साहेब वॉर्ड क्र. १ मध्ये अतिक्रमण एवढ चालल आहे. ५० हजारापासून दोन लाखापर्यंत तिकडे कोण प्रभाग अधिकारी कोण आहे प्रभागचा चेअरमन. दुपारी माझ्या बरोबर चला प्लास्टिकचे पेपर बांधून काम चालली आहेत. ५० हजारापासून दोन लाखापर्यंत पैसे वसूली केले जातात. झोपड्या आहेत त्याचे दोन माळे वाढत चालले आहेत. त्याचे पैसे घेतात. उद्याच्या उद्या ह्याचा निकाल लावा. जेवढी काम चालली आहेत तेवढी तोडून घ्या. प्रभाग अधिकारी तिकडे बसून काय करतात. गांधीनगर, गणेश देवलनगर, बजरंग नगर आहे. त्या नगरमध्ये एवढी झोपडपट्टी चालू झालेली आहे. तिकडे यु.पी. वाले पब्लिक येऊन तिकडे एका माणसाचे दोन हजार प्रमाणे त्याला झोपायला लावतात. झोपायचे दोन हजार महिन्याला घेतात. दहा माणस झोपली की २० हजार त्याला येतात. एवढ अतिक्रमण चालू आहे तिकडे कोणाचे लक्ष नाही. उद्याच्या उद्या ते तोडल गेल पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम आजचा विषय होता पोलिस दल आपल्या महापालिकेत मिळणेबाबत मा. आयुक्त साहेब, पहिला ठराव मा. मायरा मेंन्डोन्सा असताना झाला होता. त्यानंतर ८ ते १० वर्ष झाली अजून काही निष्कर्ष निघाला नाही. ह्या विषयामधून मंजूर झालेला पोलिस आपल्या महापालिकेच्या कार्यालयामध्ये पोलिस दल आपल्या स्वतःचा पेरोलवर किंवा मानधनावर त्याच जे काही असेल ते नियुक्त करण्यासाठी ठराव झाला होता त्यांनतर कुठलीही कारवाई नाही. आपला गोषवारा तरी वाचला नेमकी आपल्याला काय अडचण आली? का हे झालं नाही? काय होणार आहे? नाही होणार आहे कधी होणार आहे आपण ठराव करत राहतो ह्या प्रस्तावाला ८ ते ९ वर्ष होत आली ह्यावर नक्की मागणी काय आणि कुठे आपलं काम थांबलं आहे आणि कशासाठी ते आपण क्लीअर करावे मा. विक्रम कुमार साहेब होते त्यावेळी साधारण ९० टक्के कन्स्ट्रक्शन इललिगली कंट्रोलमध्ये होत. मा. काकाणी साहेब आले ८० टक्के झाले. शितोळे साहेब मला माहित नाही अधिकाऱ्यांनी आपल्याला काय गृहित धरुन ठेवलेलं आहे. आता साधारण इललिगल जेवढे काम बाकी होते त्याची पूर्तता होत आली आहे. ही वॉर्डाची परिस्थीती आहे. उदाहरण सांगतो माझं आयुक्तांना दिलेले पत्र ठेकेदाराचा साफसफाई करणारा कामगार माझ्या घरी घेऊन येतो ते माझे ऑफीशिएल डॉक्युमेंट माझं तुझ्याकडे कसे आले मा. आयुक्तांना दिलेले पत्र अशी परिस्थीती आहे. ज्यावेळेला एखादा प्रभाग अधिकारी काम करत नसेल तर आपण वरिष्ठांकडे जातो. वरिष्ठांनी केलं नाही तर आयुक्तांकडे जातो. ह्यामध्ये मला एक उत्तर दिलेलं आहे. विभाग प्रमुख अतिक्रमणनी असं सांगितलं असं असं काम चालु आहे जसं बघा तक्रार आली आहे. त्यांनी मला उत्तर दिलं आपण जे सांगितलं आहे ते प्रभाग अधिकाऱ्याला माहिती दिली आहे. आता मी प्रभाग अधिकाऱ्याच्या ऑफीसला जाऊ मी त्यांना काय प्रोटोकॉल माहित नाही का? एखाद्या मुख्यमंत्र्यासारखी उत्तर येतात. संबंधीत विभागाला कार्यादेश पाठवला आहे. जनरली आयुक्त आम्हाला माहिती काढून उत्तर पाठवतात की, ह्याच्याबद्दल काय चाललं आहे. मा. महापौरांना पत्र दिलं तर माहिती देतात तुम्हाला असं सांगितलं आपलं पत्र प्रभाग अधिकाऱ्याकडे कारवाईसाठी पाठवलं आहे तर आम्ही प्रभाग अधिकाऱ्याकडे जायचं त्यांना एवढीही माहिती नाही का पत्र कसं द्यायचे कोणाला द्यायचे प्रभाग अधिकारी बोलतात पोलिस दल नाही. मा. आयुक्तांची मान्यता घ्यावी लागेल काही ठिकाणी ग्रील लावली तर त्यांना लावू देत नाही इथपर्यंत त्यांची दादागिरी असते. कोणत्याही लोक प्रतिनिधीचा असा इंटरेस्ट नाही की, शहरात इललिगल व्हावे शेवटी आपल्याला लोकप्रतिनिधीच पत्र आपल्याकडे घेऊन आले किंवा माहिती आली तर आपल्याला स्टॉप करायचं आपण का बदनामी घ्यावी हे एक धोरण आपल्याला ठरवायला लागते माझी एक खास विनंती आहे की, अधिकाऱ्याला तशी माहिती द्या कोणाचं नाव काय करायचे त्यांचे काम आम्ही त्याच्या निर्दशनास आणून देतो आणि आमची बदनामी करायची. एखादं काम पूर्ण झालं म्हणजे नगरसेवकाचं सेटलमेंट झालं अशी सामान्य भाषा आहे. एखादा तक्रार घेऊन माझ्याकडे आला आणि कारवाई झाली नाही तर सेटलमेंट झाले नाही असे पत्रकार छापून देतात. अतिक्रमण संबंधात मॅडम आपल्याला माहित असेल दुसरं म्हणजे अतिक्रमण संदर्भात आपण फेरीवाल्यांसाठी आपल्याला माहितचं आहे इस्टीमेट कॉस्ट काढली तर लाखो रुपये आपण खर्च करतो जे पॉलिसीपेक्षा जास्त आपण खर्च करतो. कुठलाही अधिकारी त्याच्यावर कारवाई करत नाही. अतिक्रमणसाठी आपण पोलिसांची नेमणूक केली तरी त्या मोठ्या मोठ्या बांधकामासाठी छोट्या मोठ्या कामाला पोलिस लागत नाही. कुठे सांगितले बांधकाम तोडा तर १० मिनिटांत तोडतात कुठे सांगितले तर आम्हाला २६० ची नोटीस द्यावी लागेल तो हीअरींगला येईल १५ दिवसानंतर त्याला मुदत म्हणजे स्टे घेऊन ये. स्टे व्हेकेंट झाला तरी सेम नोटीस की आपले असं असं व्हेकेंट झालं काही ठिकाणी काही न विचारता घरात राहू द्या नाही राहू द्या काढून टाकतात एका शहरात दोन दोन कायदे असतात. आमच्या दोनचं मागण्या आहेत अधिकाऱ्यांनी ज्या कोणा नगरसेवकांची तक्रार असेल ती योग्य तक्रार असेल तर जी योग्य तक्रार असेल त्याची विल्हेवाट लावावी कोणाचे नाव घ्यायची आवश्यकता नाही. मा. आयुक्त साहेब, जो प्रस्ताव आलेला आहे त्याची माहिती सभागृहाला दिली तर सोईचे होईल.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पोलिस दल आपण तैनात करतो महत्वाचं म्हणजे आपण किती सोयी सुविधा करतो त्यापेक्षा आपल्या अधिकाऱ्याची मानसिकता किती आहे ती तपासली पाहिजे त्यांना जर करायचे नसेल ना तर पोलिसाचा फौजफाटा इथे आणला तरी ती लोक काम करणार नाहीत. गेंड्यांची कातडी पांघरलेले हे अधिकारी आहेत. मागच्या वेळेला मी गॅरेजच्या संदर्भात लक्षवेधी आणली होती त्याला चार महिन्याहून जास्त कालावधी झाला त्यानंतर मी २१/०९ ला पत्र दिले की, ह्या शहरामध्ये अनधिकृत बांधकाम किती आहेत? किती बांधकामांना स्टे आहे, आणि किती स्टे कधी व्हेकेंट होणार आहेत? ह्याची मी माहिती २१/०९ ला मागवली. ११/११ पर्यंत मला त्याची माहिती मिळाली नाही म्हणून मी आयुक्तांच्या नावाने पत्र दिले. मला माहित नाही की, मा. आयुक्तांच्या पत्राचा इफेक्ट झाला आहे. परवाच्या दिवशी एक पत्र आलं त्याच्यामध्ये मी अनधिकृत बांधकामाची माहिती मागवली होती त्या पत्रात तुमची लक्षवेधी त्यानंतर शिवाजी महाराज पथकावर असलेले गॅरेजेस त्यांचे टेलीफोन नंबर त्या गॅरेजची नाव, त्यानंतर वाहतुक अधिकाऱ्यांशी आमच्या कधी मिटींगा झाल्या त्यांचे आम्हाला काय पत्र एवढा बंच आहे. लक्षवेधीचे माझे पत्रच नव्हतं लक्षवेधी माझी सभागृहात होती मला त्याचं उत्तर दिलं. दुसऱ्या दिवशी एक पत्र आलं की, त्यामध्ये सही करुन पत्र दिले आहे की, तुमच्या पत्राला उशीर झाला. कारण आमच्या प्रभाग अधिकाऱ्याने आम्हाला वेळेत माहिती दिली नाही. त्याच्यामुळे संबंधीत प्रभाग १,२,३,४,५,६ ह्यांना आम्ही ज्ञापन काढले आहे त्या ज्ञापनाची मला प्रत दिली. मला त्या ज्ञापनाशी काय करायचे आहे मी मागितलेली माहिती मिळावी की, आपल्याला जायचे आहे पूर्वेला आणि जातो पश्चिमेला आपल्याला डायवर्ट कसे करायचे ते ह्यांच्याकडुन शिकायचं कळलं ना म्हणुन मी म्हणते गरजच नाही हे पोलिस कशाला आणता एखादा ग्रामीण पोलिस जरी मिरा भाईंदर मध्ये आणून ठेवले तरी मिरा भाईंदरच्या अधिकाऱ्यांना कशा वाटा काढायच्या त्याचे छोटे छोटे मार्ग माहित झाले आहेत आपण कोणाची तक्रार केली की, तो बिल्डर आपल्या दारात येतो मॅडम तुमची काय तक्रार आहे. ह्यांची काम आम्ही करतो आणि हे आम्हाला समाजामध्ये बदनाम करतात सभागृह नेत्यांनी ठराव तर मांडलाच आहे पण माझा विरोध आहे कारण त्याच्यातनं काही निष्पन्न होणार नाही.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त महोदय माझी सुचना आहे हा विषय गंभीर आहे मिरा भाईंदर शहरामध्ये प्रभाग ६ हा सर्वात मोठा आहे. माझी सुचना आहे की, अतिक्रमण खुप मोठ्या प्रभाणात झाले आहे आमच्याकडे इंजिनियर नाही. मा. आयुक्त महोदय आमचा प्रभाग मोठा असल्याकारणाने इंजिनियर द्या अशी माझी अनेक महिन्यापासून मागणी आहे आता साडे तीन महिने राहिले नाही. कालावधी संपल्यानंतर देणार आहात का? बिल्डरचे इललिगल बांधकाम भरपुर झाले आहे. जे इंजिनियर आम्ही मागुन घेतले आणि ज्यांना तुम्ही दिलं ते शिंदे महोदय त्यांना काही कळत नाही त्यांनी अजून पर्यंत कुठलही इललिगल बांधकाम तोडले नाही. असे मी ठामपणे सांगेन राणेंना आम्ही मागून घेतलं किंवा तुम्ही दिलं. बोरसे तर थांबलेच नाहीत त्यांनी काय कारभार केला आणि त्यांच्यावर ते मोहिते मागच्या महासभेत मी विषय आणला होता तुम्ही क्लास ३ चा इंजिनिअर क्लास २ च्या जागेवर ठेवला. ३२ क्लास २ चे अधिकारी आहेत त्यांना तुम्ही बदलून का घेत नाही? कुठल्या कायद्यात तरतुद आहे. मी तुम्हाला कायदा दाखवते. पुढच्या मा. महासभेत ५६ खाली कारवाई करायला मजबुर करेन असं मी पुर्ण तयार केलं आहे. पण ते पुर्ण झालं नाही म्हणुन मी त्या विषयावर थांबते ते आम्हाला डायरेक्ट बोलतात की आम्हाला एस.एम.एस. करा असा गंभीर विषय आहे. आम्हाला इंजिनिअर देता की नाही ते सांगा की, कालावधी संपल्यावर देणार आहात तुम्ही वॉर्ड ऑफीसरला सुचना देता की नाही?

**मा. महापौर :-**

वॉर्ड ऑफीसर आहे ना.

**वंदना चक्रे :-**

आहे पण काम करतात का ते त्यांना विचारा त्यांना बोलवा सभापती कोण बोलत नाही. सर्व सभापती चुप बसतात वंदना चक्रे सच्चा आहे म्हणुन बोलते.

**मा. महापौर :-**

मॅडम, बसून घ्या.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम कधी देणार आहात माझी कामं थांबलेली आहेत.

**मा. महापौर :-**

आता तुम्हाला काय पाहिजे?

**वंदना चक्रे :-**

अतिक्रमण विभागाचा इंजिनिअर पाहिजे जेणेकरुन बिल्डींगचा प्लान त्यांना माहित असला पाहिजे किती इललिगल आहेत किती लिगल आहेत ते त्यांना कळत नाही. असा इंजिनियर दिला तर कारवाई कशी होईल? दोन वेळा सस्पेंन्ड झालेला माणूस मला दिला आहे राणे साहेब म्हणतात थोडीच वर्ष राहीली आहेत त्याला काय पडलेली नाही आता मी करायचे मला सहन होत नाही तुम्ही ह्याच्यावर विचार करा.

**मा. महापौर:-**

तुम्ही सजेस्ट करा तुम्हाला जो माहित आहे.

**वंदना चक्रे :-**

मी तुम्हाला नाव देते.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, हा जो विषय आहे महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामे निष्कासन करण्यासाठी पोलिस पथक निर्माण करणे व पोलिस स्टेशन स्थापने बाबत हा विषय मागे देखील घेतला गेला होता त्यावेळी देखील मी एक मत मांडल होतं की, अतिक्रमण हटविण्यासाठी स्थानिक पोलिस स्टेशनवरुन स्टाफ मिळत नसल्यामुळे आपल्याला हे पोलिस स्टेशन स्थापायचे आहे परंतु ह्या पोलिस स्टेशन स्थापण्यामागे त्यांचे अधिकाऱ्यांचे खर्च आणि तरतुद आपण मागच्या सभेमध्ये दाखवली होती.

**मा. आयुक्त :-**

हायकोर्टामध्ये जो पीआयएल होते त्याच्यामध्ये चीफ सेक्रेटरींनी एफीडेव्हीट दाखल केले आहे आणि प्रत्येक महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे पथक निर्माण करा म्हणुन एफिडेव्हीट दाखल झाले त्याप्रमाणे हायकोर्टाने ऑर्डर दिली. सगळ्या महापालिकेने त्याला मान्यता दिली पण आपण पालघर आणि भिवंडी राहिलो होतो. २५ ऑक्टोबरला हायकोर्टाने ऑर्डर केली आणि ८ आठवड्यामध्ये हा ठराव घ्यायला सांगितला म्हणुन आपण हा ठराव घेतलेला आहे. आपल्या काही शंका आहेत हे जे पथक आहे ते पुर्णपणे आपल्या नियंत्रणाखाली असणार आहे. मागच्या वेळेला ह्याच्यावर चर्चा झाली होती त्याचे प्रशासन एसपी च्या अंडर असणार आहे असे काही नाही ते कमिशनरच्या नियंत्रणाखाली असणार त्यामुळे आपल्याला काही चॉईस नाही. हायकोर्टाची ऑर्डर आहे. ८ आठवड्यामध्ये आपल्याला ठराव करणे आवश्यक आहे त्यादृष्टीने ठराव केलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपला ठराव ऑलरेडी होता.

**मा. आयुक्त :-**

ठराव होता आपण फक्त निधी मागितला होता. सुधारीत ठराव जो हायकोर्टाने सांगितला आहे त्यापध्दतीने गव्हर्नमेंटनी फॉर्म केलेला आहे त्या पध्दतीचाच ठराव द्या.

**निलम ढवण :-**

साहेब, बरोबर आहे. परंतु, कोर्टाने ठराविक महानगरपालिकेला आदेश दिले आहेत का तर त्या त्या महापालिकेच्या अंतर्गत अत्यंत अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकाम चालू असल्यामुळे काही महानगरपालिकेचा उल्लेख ह्या गोष्टीमध्ये केला आहे. ते मागच्या सभेमध्ये निदर्शनास आणून दिल होतं की, प्रत्येक प्रभागामध्ये प्रत्येक नगरसेवकानी ती काळजी घेतली की, आपल्या प्रभागामध्ये अनधिकृत बांधकाम होऊ देऊ नये अशी काळजी घेतली तर अवाढव्य खर्च करण्याचा प्रश्न येणार नाही तोही महापालिकेचा पैसा वाचू शकेल ह्यालाच धरुन मी एक सुचना मांडू इच्छिते. मॅडम ह्या विषयावर बोलायचे असेल तर राहू दे मी ह्या संदर्भात दुसरा विषय देते. अभियंत्याविषयी माझा विषय आहे आपल्या महानगरपालिकेमध्ये इतर महानगरपालिकेच्या मानाने जे जून्या लोकांख्येनुसार .............

**मा. महापौर :-**

मॅडम तो विषय नाही.

**निलम ढवण :-**

विषय नाही म्हणूनच आपल्या परवानगीने...............

**मा. महापौर :-**

महासभा बाकी आहे "ज" चा विषय बाकी आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम ठिक आहे तेच विचारते बोलू का?

**मा. महापौर :-**

ह्या विषयावर बोलत होते म्हणून बोलायला दिले.

**प्रकरण क्र. ५५ :-**

महानगरपालिकेच्या विविध प्रयोजनासाठी शासकीय जागा मागणी प्रस्ताव करणे व आर्थिक खर्चासाठी प्रशासकीय मंजूरी देणे.

**ठराव क्र. ५३ :-**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत

शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये एकूण ३८६ आरक्षणे विविध प्रयोजनाकरिता दर्शविण्यात आलेली आहेत. सदर आरक्षणापैकी शासकीय जागेवर दर्शविण्यात आलेल्या आरक्षणांची संख्या २८ आहेत. सदर पैकी हस्तांतरीत झालेल्या आरक्षणांची संख्या २७ आहेत. यापैकी मिरा भाईंदर महानगरपालिका समूचित प्राधिकरण असलेल्या आरक्षणाखालील जागा २१ आहेत व इतर संस्थांनी विकसीत करावयाच्या आरक्षणांची संख्या ७ आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजना आरक्षणाखाली असलेल्या शासकीय जागा अतिक्रमणापासून संरक्षण होणेकरिता मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील आदेश क्र. महसूल/क-१/टे-१/एलबीपी/अति.संरक्षण/एसआर-०३/१०, दि.०७/१०/२०१० अन्वये एकूण ०८ जागा व क्र. महसूल/क-१/टे-१/एलबीपी/अति.संरक्षण/एसआर-०४/१०, दि.०७/१०/२०१० अन्वये एकूण १७ जागा अशा एकूण २५ जागांचा महानगरपालिकेस आदेशात नमुद अटी व शर्तीस अधिन राहुन आगाऊ ताबा देण्यात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस आरक्षणा व्यतिरिक्त विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी शासकीय जागेची आवश्यकता असते. आरक्षणा व्यतिरिक्त इतर शासकीय जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेतल्यानंतर सार्वजनिक सोईसुविधा / प्रयोजनासाठी वापर करता येवू शकतो, म्हणून प्रथमतः अशा शासकीय जागा हस्तांतरीत करुन घेण्यासाठी शासनास / विविध प्राधिकरणास प्रस्ताव सादर करणे, तसेच पाठपुरावा करुन जागा ताब्यात घेणे आवश्यक आहे. म्हणून महानगरपालिकेच्या विविध प्रयोजनासाठी शासकीय जागा मागणी प्रस्ताव तयार करणे, सादर करणे व पाठपुरावा करुन हस्तांतरीत करुन घेण्यासाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करुन उक्त शासकीय जागा संपादनासाठी होणा-या खर्चास ही आर्थिक व प्रशासकीय मंजूरीसह जागा हस्तांतर करुन घेण्यासाठीचे सर्व अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५६, सन्मा. सदस्या डॉ. नयना मनोज वसाणी यांचा दिनांक १३/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- विना परवानगी लावण्यात आलेले बोर्ड, बॅनर्स, कटआऊट कमानमुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान व नागरीकांना होणाऱ्या गैरसोयी बाबत.

**नयना वसानी :-**

हा विषय महासभेत घेऊन बोलायची संधी दिल्याबद्दल मी आभारी आहे. मा. महापौरांच्या परवानगीने बोलते मॅडम ही चर्चा करताना मी आधीच क्लीअर करु इच्छिते की, कुठल्याही राजकीय पक्ष किंवा जनप्रतिनीधी, सन्मा. सदस्याची भावना दुखविण्याचा माझा बिल्कुल विषय नाही पण एकावेळी आपण महापालिकेत बसून महासभेमध्ये बसून सर्व सन्मा. सदस्य महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करतो आणि त्या आर्थिक उत्पन्नाला वाढवून आपण त्याच्यामधुन लोकांना ज्या सोयी द्यायच्या असतात त्यासाठी त्याचा कसा उपयोग करता येईल ह्याच्यावर विचार विमर्ष करतो. तेव्हा हे आर्थिक उत्पन्न वाढविण्याचा एक सोर्स आहे बॅनर्स आणि होर्डीग्ज जे बिना परवानगी जेव्हा लावण्यात येतात तेव्हा आपल्याकडून त्याच्यावर काही कारवाई होत नाही. आम्ही पुष्कळ वेळा मा. उपआयुक्तांना कम्प्लेंट केलेल्या होत्या आणि त्यांनी सांगितले की, आम्ही ह्या कमानीची परमिशन दिलेली नाही आपण बघितले असेल सगळे जण होते तेव्हा मिरा भाईंदर वेस्ट मध्ये २० ते २५ कमानी लागल्या होत्या. मिरारोडमध्ये पण लागल्या होत्या आमच्याकडे लेखी तक्रारीपण आल्या होत्या त्या मी नंतर आपल्याला आणून देऊ शकते तेव्हा आम्हाला असे सांगितले गेले की, प्रभाग अधिकारी जे आहेत त्यांनी आम्ही त्याविषयी माहिती दिलेली आहे परंतु, प्रभाग अधिकारी सण कम्प्लीट होईपर्यंत त्याच्यावर कुठलीही कारवाई केली नाही मिरारोड सेक्टर ३ च्या इथे झवेरी बाजार आहे तिकडे दिवाळीच्या सणाला लहान रस्त्यामुळे अधिक गर्दी असते ट्राफीकची गैरसोय असते फुटपाथ वर चालायला अजिबात नाही कारण फेरीवाल्यांचं अतिक्रमण आहे तेव्हा लोकांना सोयी देण्याऐवजी ह्या अशा कमानी आणि कटआऊटमुळे जी गैरसोय होते त्याच्यावर अधिकारी कारवाई करत नाही आपल्याकडे न्यायालयाचे आदेश आहेत आणि बऱ्याच वेळा ह्या महासभेत बॅनर्सवर पाबंदी आणावी अशी चर्चा झाली होती त्याच्यावर पाबंदी आणुही नये कारण बॅनर्स जे आहेत ते आपल्या सन्मा. सदस्यांचा लोकांपर्यंत आपली कामं पोहोचविण्याचा एक सोर्स आहे परंतु, ते परवानगीने घ्यावे आणि ह्याच्यातुन आर्थिक उत्पन्न मिळवता येईल ते व्यवस्थितपणे मिळवावे अशी माझी विनंती आहे म्हणुन मी हा विषय महासभेत घेतला.

**वंदना चक्रे :-**

ह्याच्यापुढे दिसल तर आम्ही तुमच्यावर कारवाई करायला लावू.

**मा. महापौर :-**

महासभा असली की एक दिवस अगोदर काढतील टेन्शन घेऊ नका.

**प्रशांत दळवी :-**

त्या संस्थेने आपले ३ ते ४ लाख रुपये बाकी ठेवले आहेत. त्या संस्थेची आज जाहिरात होते एस्सल वर्ल्डची विचारुन घ्या. वारंवार मी विचारले, पण ते सांगतात रात्री लावतात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य श्रीम. नयना वसाणी ह्यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या सुचनेनुसार प्रशासनाने कारवाई करावी असे मी आदेश देत आहे.

**मा. आयुक्त :-**

मा. महपौरांच्या परवानगीने बोलतो. मा. विरोधी पक्षनेते नरेंद्र मेहताजी अतिक्रमणाच्या बाबतीत काही भावना व्यक्त केल्या. सन्मा. शरद पाटील बोलले, सन्मा. सदस्या चक्रे मॅडम बोलल्या. तुमच्या ह्या मताशी सहमत नसल्याचे काही कारण नाही. मी देखील ह्याच मताचा आहे. मेहता साहेब बोलले की ७० टक्के, ८० टक्के ह्या ठिकाणी मला कोणी गृहित धरु शकत नाही. ह्या ठिकाणी मी एवढ सांगतो. मी अत्यंत कडकपणे काम करणारा अधिकारी आहे. कुठल्याही प्रकारे मला कोणी, गृहीत धरुन काम करणारा वॉर्ड ऑफिसर मला चालणार नाही. पुढील एक महिन्यामध्ये जाणवेल कुठल्याही प्रकारचा भेदभाव न ठेवता काम करण्याची मला सवय आहे. मिरारोडमध्ये मम्मीच्या एरियामध्ये आम्ही भरपूर चांगली कारवाई केली. म्हणून तिकडच्या लोकांनी आमच्या अधिकाऱ्यांचा सत्कार केला. नवघरमध्ये कदाचीत झाले नसेल. माझा ह्याच्या पलीकडे विचार आहे की, ह्या गोष्टीमध्ये जास्त वेळ जाऊ नये. शहराच्या दृष्टीने, विकासाच्या दृष्टीने काम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे. म्हणून आम्ही सगळ्या गोष्टी सामावू. परंतु आम्ही ह्या ठिकाणी गृहित धरणार नाही आणि कुठल्या प्रकारची मुलायजा न ठेवता कामकाज केल जाईल. एवढच हया ठिकाणी सांगतो. पुढील महिन्यामध्ये जाणवेल की, हे बोर्ड लागले, कोणाचाही बोर्ड लागणार नाही. आणि बोर्ड लागला तर थांबणार नाही. मग गुन्हे दाखल करायचे म्हटले तर मग कोणीच त्यातून शिल्लक राहणार नाही. त्यामुळे सहकार्याने चाललेल कामकाज आहे. शहराचा विकास करायचा आहे. शिवाय जो मुख्य रस्ता आहे तो अत्यंत क्लिन करण्याची अपेक्षा आहे. त्या दृष्टीने महापौराच्या ..................

**मा. महापौर :-**

आम्ही ते सगळ घेतल आहे. सर्व रेल्वे स्टेशन सुशोभिकरण स्टार्ट केलेल आहे.

**मा. आयुक्त :-**

माझा नंबर ओपन आहे आणि कुठल्याही प्रकारच अतिक्रमण काम चालल असेल मी कधीपण फोन घेतो. मला काही अडचण नसते. त्याठिकाणी आपल्या कोणालाही आपली अडचण आली तर मला फोन करा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याला होर्डिंग्जला फार इन्कम आहे. आपल्याकडे ६० टक्के होर्डिंग्जची वसूली येते असे मला वाटत नाही. कारण कोणताही पक्ष असू द्या. १० होर्डिंग्जची परमिशन घेतात आणि १०० होर्डिंग्ज लावतात हे जर तुम्ही मोजले तर १५० मिळतील तर मग ११०-१४० फुकट आले. अधिकारी बघत नाही. किती होर्डिंग्ज लागले आहेत, किती होर्डिंग्जची परमिशन घेतली आहे. मला सांगा रस्त्याला येताना १०० ते १५० होर्डिंग्ज बघत असणार.......

**मा. आयुक्त :-**

मोठ्या बरोबर सोल्ड साईट असतात. त्याच्यावर आपण ठेका देऊन दिलेले आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

लहान आणि मोठे सुध्दा बाहेर लावतात . होर्डिंग्जवर नाही. बाहेर १० X १० चे २० X १० चे लावतात. होर्डिंग्ज सोडून तर त्याची वसुली आपल्याला करता आली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आपण प्रयत्न करु.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

त्याच्यावर एवढे इन्कम आहे. दर दिवशी कोणाचा तरी वाढदिवस नाहीतर मरणाचा दिवस असतोच तर त्याच्यावर होर्डिंगजच इन्कम आल पाहिजे. कारण परमिशन घेतात ५ आणि १० ची आणि १०० लावतात.

**(सदर विषयावर सभागृहात चर्चा करण्यात आली.)**

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, विषयपत्रिकेवरचे विषय सोडून माझी एक सुचना आहे. आपल्या परवानगीने बोलते. आपल्या महानगरपालिकेमधील अभियंत्यांची संख्या वाढवण्यासंदर्भात ही सुचना आहे. कारण इतर महानगरपालिकेच्या दृष्टीने आपल्या महानगरपालिकेमध्ये अभियंत्याची संख्या फारच कमी असल्यामुळे शहराच्या विकासासाठी काम करताना खूपच अडथळा निर्माण होतो, वेळ लागतो सव्वा वर्ष आम्ही फेरी मारतो

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, हा होर्डीग्जचा विषय आहे. मी कुरळेकर साहेबांना फोन करते पण ते बिझी असतात माझा ह्या बोर्ड लावण्याला विरोध नाही सगळ्यांना वाटते आमदार, खासदारांना लोकशाही आहे आणि आहे म्हणुन सगळे लावतात फक्त मला ह्याचा विरोध आहे हायटेन्शन पावर आहे तिकडे लावतात तिथे तुम्ही लावण्याची परमिशन देतात ते काढत का नाही. मागच्या वेळेस सांगितले होते ते का काढत नाही मा. कुरळेकर साहेब तुम्हीच मला उत्तर द्या. मी तुम्हाला किती फोन करते तुम्ही कधी कारवाई करता का? मी तुम्हाला आठवड्यातून दोन वेळा फोन करते. कशासाठी तुमच्या कर्मचाऱ्यांच्या जिविताला धोका आहे. तुम्ही त्याच्यावर एमआरटीपी का करत नाही? त्याच्यावर गुन्हा का दाखल करत नाही? आम्ही कितीवेळा मागणी करायची आम्ही कितीवेळा हा विषय आणायचा पत्र द्यायचे मला ह्याचे उत्तर द्या मी तुम्हाला किती वेळेला फोन करते सगळ्याच्या समोर सांगा खरं आहे की खोटं आहे ते सांगा मला बॅनर लावायला विरोध नाही आम्ही पण लावतो जे कर्मचारी काढतात त्यांचापण जीव आहे. तिथे लावू देऊ नये ज्यांचे होर्डीग्ज आहेत त्याच्यावर गुन्हा दाखल करा त्याच्यावर मला उत्तर द्या.

**नयना वसानी :-**

मॅडम पाच दिवसाची परमिशन घेऊन १५ दिवसांपर्यंत कमानी रस्त्यावर असतात एखाद्या दुकानदाराने फुटपाथवर सामान काढलं तर आपण त्याच्यावर दंडात्मक कारवाई करतो मग ह्या ज्या कमानी लावल्या आहेत त्याची परमिशन मा. उपायुक्त म्हणाले आम्ही देत नाही तर मग त्याच्यावर कारवाई का होत नाही? आपले आदेश असतील महासभेतून आदेश गेलेले आहेत न्यायालयाचे पण आदेश आहेत आणि अधिकारी वर्ग कारवाई करत नाही तर त्याच्याकडुन लेखी जवाब घ्यावा.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आपल्या महापालिकेच्या जाहिरात विभागामार्फत तात्पुरत्या ज्या बोर्ड आणि बॅनर्सना परवानगी देण्यात येतात त्या पाच दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी देण्यात येत नाही. दैनंदिन कारवाईसाठी वर्ग ४ चे ९ कर्मचारी आहेत दैनंदिन कारवाईच्या नोंदी होतात पाच दिवसांपेक्षा जास्त बॅनर्स असतील त्याची यादी ..........

**वंदना चक्रे :-**

कधी हो तुम्ही करतच नाही तुम्हाला मी किती फोन करते.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

हाय टेन्शन लाईनचा जो विषय आहे.

**वंदना चक्रे :-**

माझा मुद्दा ऐका तुम्ही हाय टेन्शन लाईन तिकडे तुम्ही होर्डीग्ज का लावू देता? लावणाऱ्यावर कारवाई का करत नाही? त्यांच्यावर फौजदारी गुन्हा का दाखल करत नाही त्याचे मला उत्तर द्या.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

हायटेन्शन लाईनच्या खाली जे होर्डीग्ज लावतात ते आपल्या कर्मचाऱ्यांसमक्ष लावले नसतात ते सुट्टीच्या दिवशी लावतात असे निर्दशनास आलेले आहे.

**वंदना चक्रे :-**

साहेब, दिवाळीचे होर्डीग्ज अजून लावलेले आहेत.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

ह्यासाठी रिलायन्सला पत्र व्यवहार केलेला आहे. मागच्या वर्षी रिलायन्सचे इंजिनियर स्वतः आले कारण विद्युत पुरवठा रिलायन्सचा आहे. त्या इंजिनियर समक्ष आणि आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत इलेक्ट्रीसीटी बंद करुन कारवाई केलेली आहे.

**भगवती शर्मा :-**

साहेब हे चुकीचे सांगतात रिलायन्सच्या पोलवर काय कटाऊट आहेत ते तुम्ही काढत नाही का?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

हाय टेन्शन लाईन.

**भगवती शर्मा :-**

तिथे पण काढत नाही. आमचे नगरसेवक नरेश पाटील ह्यांनी वारंवार तक्रार केली होती. तरी पण तुम्ही काढले नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब हाय टेन्शन पोलवर कटाऊट लावल्याने समोरुन येणरी गाडी दिसत नाही. अपघात होण्याची शक्यता वाढते. अपघात झालेले आहेत. ह्याच्यामध्ये सुधार आणायचा प्रयत्न करा.

**वंदना चक्रे :-**

तुम्ही कारवाई करतच नाही.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

ह्यापुढे कडक कारवाई करण्यात येईल.

कदाचीत ही पाच वर्ष देखील आमची फेऱ्या मारण्यातच जाईल. असे होऊ नये. इतर महानगरपालिकेच्या मानाने आपल्याकडे दोन कार्यकारी अभियंते आहेत. बाकीच्या ठिकाणी भिवंडी, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली ९-१०-११ असे आहेत. बाकीच्या ठिकाणी देखील उपअभियंता, कनिष्ठ अभियंता ह्यांची संख्या जास्त आहे. इकडे वेळोवेळी फेऱ्या मारुन देखील दोनच अभियंते असल्यामुळे कधी मिटींगमध्ये असतात, कधी साईटवर असतात. आमच्या कामासाठी आम्ही सव्वा वर्ष फेऱ्याच मारतो. सगळ्यांची तीच अवस्था आहे. त्यामुळे आपण ह्या महानगरपालिकेतील अभियंत्याची संख्या २००५ च्या लोकसंख्येनुसार जे धोरण केलं होत तीच संख्या आजपर्यंत आहे. प्रभाग समित्या वाढल्या आहेत परंतु अभियंते किंवा कर्मचारी वर्ग वाढलेला नाही.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. ह्याच्यावरही हे करते.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्याच सभागृहात मा. आयुक्त विक्रम कुमार साहेबांनी उत्तर दिले होते. आपण प्रश्न केला होता की, असलेले अभियंते किती आहेत आणि कामकाजासाठी किती आवश्यक आहेत. चार अभियंताचा प्रस्ताव पाठवतो असे सभागृहात रुलिंग दिले होते. त्याचे पुढे काय झाले की काय झाले?

**मा. महापौर :-**

आम्ही पाठवले आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम १५ जानेवारी २०१३ ला ह्या संदर्भात ठराव झालेला आहे.

**मा. महापौर :-**

ऑलरेडी पाठवले आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब आपला घनकचरा प्रकल्प आहे. तिकडे ४-५ दिवसापासून आग लागलेली आहे की, लावलेली आहे. लोकांना श्वास घ्यायला त्रास होतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात धूर येतो त्याची पाहणी वैगेरे काही केले आहे का? आग विझवण्याचा प्रयत्न केला आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मी प्रत्यक्ष भेट दिली. त्याठिकाणी रोजचा ४०० ते ५०० टन कचरा साचतो. मिथेन गॅस भरपूर तयार झालेला आहे. न वाजलेले फटाके असल्यामुळे तिथे स्फोट झाला.

**बर्नड डिमेलो :-**

आता आग विझवली का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आम्ही कन्टीन्यू विझवतो आहे.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला मा. आयुक्तांना प्रश्न करायचा आहे. मी मागे प्रभाग अधिकारी खेत्रे साहेब ह्यांच्या विरोधात त्यांच्या बदलीचा प्रस्ताव मांडला होता. आपण म्हटल होत विचार करु. मी मा. महापौराना पत्र दिल होत. त्यांनी बऱ्याच ठिकाणी कारवाई केली नाही. आणि तुम्ही म्हणता सत्कार करण्यात आला. मला क्लीयर होईल का? माझी काम झाली नसताना मी सर्वानुमते ठराव पास करुन घेतला होता. त्याच्या बदलीचा ठराव पास केला होता. पण त्याच्यावर आजपर्यंत काही निर्णय घेतला नाही. मला जरा कळू दे.

**मा. आयुक्त :-**

ठराव करुन बदली होत नाही.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

पण साहेब, अधिकारी काम करत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

काम नाही केले तर त्याच्यावर कारवाई केली जाईल.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

साहेब मी अगोदर पत्र दिले आहे. मा. महापौरांना पत्र दिले आहे.

**मा. आयुक्त :-**

काम करत नाही त्याच्यावर कारवाई करु.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

साहेब, त्याच्याने अधिकाऱ्याचे मनोबल वाढते.

**दिनेश जैन :-**

म्हात्रे साहेब खर सांगतात. खेत्रे साहेब कोणतीही कारवाई करत नाही. कुठल्याही पक्षाच्या नगरसेवकांचे ऐकत नाही.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

साहेब तुम्ही लोक खेत्रे साहेबांना पाठीशी घालता. आमचा सर्वानुमते ठराव पास झाला होता. सगळ्या नगरसेवकांच म्हणण आहे की, त्यांची बदली करावी, ते माझ्या एकट्याचे म्हणणे नाही.

**मा. आयुक्त :-**

मी त्यांना बोलवून घेतो आणि समज देतो.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

साहेब, त्यांना समज देऊन चालणार नाही. सभापती पद जेव्हापासून सांभाळले आहे तेव्हापासून वारंवार तक्रार करतो. तो खेत्रे माणूस असा आहे की, आम्ही ज्यांची कम्पलेन्ट करतो त्यांना माझ नाव सांगतो की, म्हात्रे तुमची कम्पलेन्ट करतात तुम्ही जाऊन त्यांना भेटा. ह्याचा अर्थ काय होतो आम्ही तिकडे पैसे कमवायला बसलो आहोत का? दलाली करण्यासाठी बसलो आहोत.

**मा. आयुक्त :-**

ही गोष्ट चूकीची आहे.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

खेत्रे साहेबाचे नाव मी वारंवार उच्चारलेल आहे की, तो माणूस असा करतो, मेहता साहेबांनी ते बरोबर म्हटल.

**मा. आयुक्त :-**

एखाद्या सदस्यांनी कोणते काम सांगितले तर दुसऱ्याला ती माहिती देणे हे अत्यंत चुकीचे आहे. त्याप्रमाणे मी सगळ्या वॉर्ड ऑफिसरना समज दिली की, कुठल्याही प्रकारची माहिती समोरच्या माणसांना द्यायची गरज नाही. तुम्हाला सांगितलेल्या कामाप्रमाणे कारवाई करा.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

त्याची हिंमत एवढी वाढली आहे की, मागच्या प्रभाग समितीच्या सभेमध्ये सांगितले की, किती नगरसेवक किती पैसे खातो त्याची मी तुम्हाला सविस्तर माहिती देतो. अस तो भर सभेमध्ये बोलतो.

**दिनेश जैन :-**

प्रभाग समितीच्या सभेमध्ये ते बोलतात की, मला इकडे राहायचे नाही. मी काम करणार पण नाही.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

साहेब, त्याचा काहीतरी विचार करायला लागेल. अन्यथा आम्हाला दुसरा विचार करायला लागेल.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, दौऱ्याच्या संदर्भात मला सगळे विचारतात.

**मा. महापौर :-**

दौऱ्याचे मी सचिवांना सांगितले आहे. थंडीमध्ये दौरा चांगला असतो.

**सुर्यकांत म्हात्रे :-**

मॅडम, एक वर्ष होऊन गेले.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम दौरा काढा. लवकर फिरायला न्या.

**मा. महापौर :-**

मॅडम कोणाचे गणपती, कोणाची नवरात्री, कोणाची दिवाळी त्यामुळे ते लेट झाले आहे.

**वर्षा भानुशाली :-**

बजेटची बॅग प्रॉमिस केलेली ती पण आली नाही.

**मा. महापौर :-**

बॅग दुसऱ्या हफ्त्यात येणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, टॅब देणार आहेत.

**मा. महापौर :-**

टॅबचे डॉ. जैनना सांगा आणि आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी २.०० वाजता**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ११/०२/२०१४ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **२२ सौ. तारा विनायक घरत मा. सदस्या यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| सद्याच्या प्रभाग क्र. १३ मध्ये असलेल्या विकास आराखड्यातील आरक्षणाबाबत.<br>१) मिरा भाईंदर शहराच्या विकास आराखड्यात सद्या अस्तित्वात असलेल्या पालिका प्रभाग क्र. १३ च्या हद्दीत किती व कोणकोणती आरक्षणे आहेत? त्याचे क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांक काय आहे? |
| अ) किती व कुठली आरक्षणे विकसीत झालेली आहेत? |
| ब) किती व कुठल्या आरक्षणांवर अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम झाले आहे? |
| क) आरक्षणातील कुठल्या अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम व बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई आजतागायत झाली आहे? |
| ड) किती व कोणती आरक्षणे किती टीडीआर देऊन घेतली आहेत? |
| इ) टीडीआर देऊन मिळालेली आरक्षणाची जागा पालिकेच्या ताब्यात आहे काय? का त्यावर अतिक्रमण झालेली आहेत? |
| **२३ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन मजली इमारत बांधली आहे. ती पाडणेसंदर्भात महापालिकेने केलेल्या कारवाईच्या विरोधात संबंधित मालकाने मा. न्यायालयात दावा क्र. स्पे.सीसुट १४/२०१२ व अपिल क्र.६१/२०१२ दाखल केले होते. ते दावा-अपिल फेटाळण्याने सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावी असे निर्देश महापालिका विधी अधिकारी ह्यांनी त्यांचेकडील पत्र क्र. मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०६/२०१२ ने प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना दिले होते, हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास ९ महिने कालावधी होऊनही अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) अनधिकृत इमारत पाडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२४ सौ. प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन माळ्यांची इमारत बांधल्याने त्या लगतच्या विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर गृहनिर्माण संस्था व इतर इमारतीतील फ्लॅट धारकांची हवा व उजेड बंद झाल्याने त्या त्रस्त झालेल्या फ्लॅटधारकांनी सदर अनधिकृत बांधलेली इमारत पाडण्यात यावी, अशी मागणी करणारी दि. १४/१२/२०१२, दि. ०२/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३, दि. २०/०२/२०१३, दि. २८/०२/२०१३ व २४/०३/२०१३ ची निवेदने मा. आयुक्त ह्यांना प्रत्यक्ष भेटून दिली आहेत, हे खरे आहे काय? |
| अ) असल्यास, त्रस्त झालेल्या नागरीकांच्या निवेदनांवर अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२५ डॉ. रमेश धरमचंद जैन मा. सदस्य यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मोकळ्या जागेवरील कराची परिणामकारक वसुली होण्याच्या दृष्टीने कोणत्याही जमिन मालक / विकासकाकडून मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय सुधारीत बांधकाम मंजूरी, जोत्याचा दाखला, भोवगटा दाखला देण्यात येवू नये असे निर्देश देणारे आदेश मा. आयुक्त सो. ह्यांनी त्यांचेकडील आदेश क्र. मनपा/१४३/२००८-०९, दि. २२/१२/२००८ व आदेश क्र. मनपा/आयुक्त/२९४/२००९-१०, दि. २३/१२/२००९ ने नगररचना विभागास दिले होते हे खरे आहे का? |
| अ) असल्यास, दि. ०१/०४/२००८ ते दि. ३१/०३/२०१३ पर्यंत ह्या कालावधीमध्ये नगररचना विभागाने दिलेल्या सुधारीत बांधकाम परवानगी, ज्योत्याचा दाखला, भोगवटा दाखल ह्यांची तपशिलवार माहिती (मौजे, सर्व्हे क्र., विकासकाचे नाव, मंजुर बांधकाम क्षेत्र, मंजुरी आदेश / दिनांक व भरणा केलेल्या मोकळ्या जागेवरील कराची पावती क्र. व दिनांक) प्रत्येक वर्षवार मिळावी. |
| ब) मा. आयुक्त सो. ह्यांचे आदेश असताना मोकळ्या जागेवरील कराची पावती वसुली न केल्याने मनपाचे कोट्यावधी रुपयाचे आलेल्या नुकसानीस जबाबदार कोण आहे? |

| |
|---|
| **२६ श्रीम. दिपिका पंकज अरोरा मा. सदस्या यांनी दि. १५/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) हमारे मिरा भाईंदर मे किटकनाशक छिडकाओ गाडी कितनी है? |
| अ) यह गाडी एक प्रभाग मे कितनी बार एक सप्ताह मे जानी चाहिए? |
| ब) अगर यह गाडी महिनों से खराब हो जाए तो हमारे पास दुसरी गाडी का बंदोबस्त है? |
| क) दुसरी गाडी न होने पर, क्या Alternative पध्दती है छिडकाओं की? |
| **२७ सौ. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. ०४/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. आयुक्त सो. तसेच सर्व विभागीय अधिकाऱ्यांना नगरसेवकांनी पाठविलेल्या तक्रारीबाबत तसेच कामाबाबतच्या पाठपुराव्या संदर्भात पत्रांची उत्तरे किती दिवसांत दिली जातात का? असल्यास किती दिवसात देणे अपेक्षित असते? |
| **२८ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २९/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) विभिन्न एजन्सीयो को पेमेन्ट नही करने पर अथवा किस कारण से ०.७५% yearly से अधिक किस किस एजन्सी को किस-किस साल मे कितना-कितना पेमेन्ट किया गया है, जानकारी दे। |
| अ) महानगरपालिका का कितना फंड किस-किस जगह पर कितना-कितना किस Interest रेट पर डिपोजिट है, उसकी जानकारी दी जाये। |
| **२९ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २९/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ओपन लँड टॅक्स से संबंधित निम्मलिखित बिंदु स्पष्ट करे<br>इस सुचना का स्त्रोत / रिकॉर्ड का नाम दिजीए |
| अ) प्रत्येक बिल्डर पर लगाये गये टॅक्स को २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ के हिसाब से विभाजीत कर बताइये? |
| ब) कौन कौन से ऐसे बिल्डर हो सकते है, जो आप द्वारा दी गई जवाब मे ओपन लॅन्ड टॅक्स के लिये नही लिये गये है? |
| **३० सौ. निलम हरिश्चंद्र ढवण मा. सदस्या यांनी दि. २८/०७/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) बाजार फी वसुली करणाऱ्या ठेकेदारांना फेरीवाल्यांकडून बाजार फी म्हणून किती फी वसुल करण्याची परवानगी आहे? |
| अ) महापालिकेने ठरवून दिलेल्या दरापेक्षा ठेकेदाराने जास्ती फी वसुल केल्यास महापालिका प्रशासनाला कसे कळते? |
| ब) ज्या ठिकाणाहून किंवा बाजारातून ठेकेदार बाजार फी वसुल करत आहेत, तेथे महापालिकेने दराबाबत सुचना फलक लावला आहे का? नसल्यास कधी लावणार? |
| क) ना फेरीवाला क्षेत्रामधून ठेकेदार बाजार फी वसुल करत आहेत, मात्र महापालिकेने फक्त फेरीवाला क्षेत्र गृहीत धरुन परवानगी दिली आहे. यामुळे महापालिकेच्या महसुलाचे नुकसान होते किंवा नाही? |
| ड) ना फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुल करु नये या अटीवर ठेकेदाराला ठेका देण्यात आला आहे. मग ना फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदारांवर आजपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे किंवा भविष्यात कोणती कारवाई करण्यात येईल? |
| **३१ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. २९/१०/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्ष झालेली आहे अश्या कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याचा मा. महासभेत ठराव पारीत झालेला आहे काय? |
| अ) या ठरावाची तारीख, तसेच ठराव मंजूर झाला असल्यास सदर ठरावाची काय अंमलबजावणी करण्यात आलेली आहे? |
| ब) आतापर्यंत सफाई कामगारांकरीता किती घरे बांधण्यात आली व कोणत्या ठिकाणी? |
| क) मनपा मध्ये २५ वर्ष सेवा झाली आहे असे किती सफाई कामगार आहेत? त्यांचे नांव व पत्ते द्यावेत? |
| ड) आतापर्यंत किती कामगारांना घरे देण्यात आली? |
| इ) मा. महासभेत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान राबविणेचे ठराव सहमत झाले आहे का? |
| ई) सुवर्णजयंती नगरोत्थान म्हणजे काय या अंतर्गत काय सुविधा देण्यात आलेल्या आहेत याची संपूर्ण माहिती द्यावी? |

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि.११/ २/२०१४

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. :- ८६ शहरातील पावसाळ्यापुर्वी कच्चे/ पक्के नाले सफाई करणे व इतर आरोग्य विभागाच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.**

**अ) पावसाळ्यापुर्वी कच्चे, पक्के नाले सफाई /खोदाई करणे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या लगत आहे. शहराच्या तीन बाजूने खाडीचा परिसर आहे. पावसाळ्या दरम्यान संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या डोंगराळ भागातून मोठ्याप्रमाणात पावसाचे पाणी शहरा मधील कच्चे, पक्के नाले, गटारातून खाडीत पावसाळी पाणी व सांडपाण्याचा निचरा होत असतो. शहरातील बहुतांश नाले हे कच्च्या स्वरुपाचे आहेत. महापालिका क्षेत्रात काही ठिकाणी कच्च्या नाल्यांचे पक्क्या नाल्याच्या स्वरुपात बांधकाम सुरु आहे. सदरचे कच्चे, पक्के नाले नागरी वस्ती व औद्योगिक परिसरातुन पावसाच्या पाण्याचा निचरा होत असतो.

शहरातील पावसाळ्यापुर्वी कच्चे, पक्के नाले सफाई करणे व गाळ वाहतुकची कामे समाधानकारक होण्याच्यादृष्टीने सदर कामाची निविदा माहे मार्च पुर्वी मागविल्यास नाले सफाईच्या कामास पुरेसा कालावधी उपलब्ध होईल व कामे मुदतीत पुर्ण करता येईल. सदर कामाची चार प्रभाग समिती निहाय (जुनी नुसार) नाले सफाई कामासाठी लागणारे भाडेतत्वावर जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन, हायड्रा मशिन, विविध क्षमतेचे सक्शन पंप व कंत्राटी मंजूर तसेच विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप खरेदी करणे आदी कामे करणे आवश्यक आहे.

**ब) एकात्मिक डास नियंत्रण करणे कामी अळी नाशके, किटक नाशक, दुर्गंधी नाशके खरेदी करणे.**

महानगरपालिका क्षेत्र हे खाडी लगत वसले आहे. शहराच्या तिन्ही बाजूने खाडी बाजूने खाडी परिसर आहे. शहरातील कच्चे, पक्के नाले व गटारातून सांडपाण्याचा निचरा खाडीच्या दिशेने होत असतो. सदर ठिकाणी खाडीच्या पात्रात मोठ्याप्रमाणावर कांदळवणे आहेत, त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संथगतीने होत असल्याने या परिसरात डासांची उत्पत्ती मोठ्याप्रमाणात होत असते. तसेच शहरातील मोकळ्या (ओपन प्लॉट) जागेतील पावसाळ्यात मोठ्याप्रमाणात पावसाचे पाणी जमा होऊन डबकी निर्माण होत असतात. या ठिकाणी मोठ्याप्रमाणात डासांची उत्पत्ती होत असते. त्याचप्रमाणे शहरामध्ये एकात्मिक नाले बांधणेचे बांधकामे सुरु असल्याने नाल्यातील सांडपाण्याच्या प्रवाहास बांध घातल्याने सांडपाण्याचा निचरा सुरुळीत होत नाही. परिणामी मोठ्याप्रमाणात डासांची उत्पत्ती होत असते.

शहरातील डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणे कामी एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम राविणेसाठी नामांकित कंपनीचे डास नाशके, अळी नाशके, किटक नाशके तसेच औषध फवारणी करणे कामी लागणारे यंत्र सामुग्री खरेदी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मनपा.च्या विविध आस्थापना इत्यादी ठिकाणी साफसफाई करणे कामी दुर्गंधी नाशके व साहित्य वस्तु खरेदी करणे आवश्यक आहे.

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक येत्या काही महिन्यात ~~निवडणुक~~ घोषित होणार आहे. त्यामुळे निवडणुक आचारसंहिता लागू झाल्यास या काळात सदर कामाच्या प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी घेणे तसेच मा. स्थायी समिती सभेची निविदांना मंजुरी घेणे शक्य होणार नाही. याकरीता सदरची कामे तातडीने निविदा मागविणे आवश्यक आहे.

सदर कामी येणारा खर्च सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील वॉर्ड सफाई/ नाले सफाई करणे, एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम करणे व दुर्गंधी नाशके व किटक नाशके खरेदी करणे या लेखाशिर्षाच्या तरतुदीतून खर्च करण्यात येईल.

उपरोक्त कामांना मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका

F:\Raj\Raj Documents\SADAR PATRA\Nale safsafai - 2014-15.docx

प्राप्त गोषवारी दि. २७/०९/२०१४
वेळ = ०९:०५ वा.

गोषवारा प्राप्त दि.२७/०९/२०१४ वेळ ०९:०५
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र ५०

लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११ / २ /२०१४

**प्रकरण क्र. :- ८७ प्रस्तावीत घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी कामी मंजुरी मिळणेबाबत.**

महापालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प मौजे उत्तन येथे मे.हेंजर बायोटेक मिरा यांचेतर्फे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा तत्वावर उभारण्यात आला आहे. सदर प्रकल्प माहे मे २००८ मध्ये कार्यान्वित झाला आहे.

सदर प्रकल्पातून दुर्गंधी येते याकरीता उत्तन येथील स्थानिक नागरीकांनी घनकचरा प्रक्रिया प्रकल्पा विरोधात आंदोलन करून सदरचा प्रकल्प बंद पाडण्यात आला होता. सदरचा बंद पडलेला प्रकल्प मा.खासदार, मा.आमदार, मा.नगरविकास सचिव, मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मा.जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या प्रयत्नाने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पुनश्चः सुरु करण्यात आला आहे. सदरचा प्रकल्प पुनश्चः सुरु करताना घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पर्यायी जागेत स्थलांतरीत करण्यात येईल असे लेखी आश्वासन देण्यात आले होते.

त्यानुसार घनकचरा प्रक्रिया प्रकल्प मौजे वर्सोवा येथील जागेत स्थलांतरीत करणेबाबत मा.महासभेने दि.१/२/२०११, ठराव क्र. ९० अन्वये पारीत करण्यात आला होता. मौजे वर्सोवा येथील प्रस्तावित घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पर्यायी जागेत घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे करीता १) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे, २) भुजल सर्व्हेक्षण कार्यालय, ठाणे, ३) पाटबांधारे विभाग कार्यालय, ठाणे, ४) वन विभाग, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांचेकडील नाहरकत दाखला संजय गांधी राष्ट्रीय उद्याना पासून (Eco Sensitive Zone) १०० मीटर ठेवणेबाबतचा निर्णय शासन स्तरावर प्रलंबित असल्याने अप्राप्त आहे.

सद्यस्थितीत मौजे उत्तन येथे मे. हेंजर बायोटेक मिरा यांचेतर्फे चालविण्यात येणाऱ्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्प दि.२५/१०/२०१३ रोजी पासून बंद आहे. मे. हेंजर बायोटेक मिरा यांना घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालवित नसल्याने त्यांच्या समवेत करण्यात आलेल्या करारनामा अटीशर्तीनुसार कारवाई सुरु आहे.

मा. उच्च न्यायालयाने दि. २/४/२०१३ रोजी दाखल रिट याचिका क्र.१७४०/१९९८ बाबत आदेश देताना मनपा. क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन कालमर्यादेत करणेबाबत आदेशित केलेले आहे. सदर आदेशाबाबत महापालिकेने केलेल्या कारवाईचा आढावा घेणे करीता मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी दि.१७/७/२०१३ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीत महापालिकेस जागा नसल्यास तळोजा येथे सामाहिक भराव भुमित सामिल व्हावेत अशा सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार तळोजा येथील सामाहिक भराव भुमित महापालिका क्षेत्रातील दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा प्रक्रिये करीता पाठविणेबाबतचा पर्याय विचार करणे अत्यावश्यक आहे. याकरीता तळोजा येथील सामाहिक भराव भुमित महापालिकेने सामील होणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणे व या कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मा. महासभेची मंजुरी असावी.

दरम्यानच्या काळात मा. जिल्हाधिकारी यांचेकडे महापालिकेने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प करीता पर्यायी जागा मिळणे करीता मागणी केली होती. महापालिकेने केलेल्या मागणीनुसार मा.जिल्हाधिकारी यांनी क्र.महसूल/कक्ष-१/टे-९/ज.मा./मि.भा.म.न.पा./कावि-२२२७, दि.२१/१०/२०१३ अन्वये मौजे सकवार, ता. वसई येथील स.न./हि.न./८३/१-ब क्षेत्र १३-१०-० हे आर. ही सरकारी जमिन प्राप्त झाली आहे. महापालिकेने सदर जमिनीची रक्कम रु. ७३,१०,८१६/- शासनाकडे जमा केली आहे. महापालिकेस सदरच्या जागेबाबतची ताबा पावती मिळाली आहे.

सदर प्राप्त जागेवर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे करीता सध्या उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानामधून एखाद्या तंत्रज्ञानाची निवड करणे, लॅन्डफिल साईट बनविणे, प्रकल्प जागेवर कुंपन भिंत बांधणे, प्रकल्प जागेपर्यंत रस्ता बनविणे, प्रकल्प अंतर्गत रस्ते बनविणे, घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार आवश्यक ती सर्व कामे करणे आवश्यक आहे. या कामी येणाऱ्या खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २८/०१/२०१४
वेळ = ०३:१०

मा. महासभा गोषवारा
रजिस्टर नोंद क्र. ५१

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.११ /०२/२०१४

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (८८) - <u>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी इमारतीवर वेदरशेड उभारणेकरिता सुधारीत धोरण निश्चित करणेबाबत.</u>

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रहिवासी इमारतीच्या शेवटच्या मजल्यावर वेदरशेड उभारणेसाठी महानगरपालिकेकडून परवानगी देण्यात येते. सदरची परवानगी मा. महासभा ठराव क्र. ८३, दि.१६/०१/२००९ अन्वये देण्यात येते. महानगरपालिकेकडून सध्या देण्यात येत असलेल्या परवानगीमध्ये नमुद अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. सदर शेडची मध्यभागी उंची ५ फुटापेक्षा जास्त नसावी.
२. सदर शेडचा वापर वातावरणापासुन संरक्षण होण्याच्या मर्यादेत असुन शेडचा अन्य वापर करता येणार नाही.
३. सदर परवानगी तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यायोगे कोणतेही पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.
४. सदर शेड उभारताना मालकी हक्काचा वाद किंवा तक्रार प्राप्त झाल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.
५. सदर प्रकरणात सादर केलेले कागदपत्रे विधीग्राह्य नसल्यास नाहरकत दाखला रद्द करुन विहीत कार्यवाही करण्यात येईल.
६. सदर परवानगीमुळे विद्यमान इमारत अधिकृत होत नाही व इमारतीच्या अनधिकृत बांधकामाच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा येणार नाही.
७. सदर शेडमुळे विद्यमान इमारतीच्या स्ट्रक्चरल स्टॅबिलिटीस धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल.
८. वेदरशेडच्या परवानगीमुळे इमारतीस भोगवटा दाखला प्राप्त होत नाही.
९. वरील अटीशर्तींचा भंग केल्यास परवानगी रद्द करणेत येईल.
१०. सदरची परवानगी (तीन महिने) राहिल.
११. मुदत संपल्यानंतर वेदरशेड स्वखर्चाने काढणे बंधनकारक राहिल.
१२. वेदर शेडची मुद्दत पूर्ण झाल्यानंतर संबंधित प्रभाग अधिकारी यांना त्वरीत अवगत करुन द्यावे.

उपरोक्त नमुद अटी व शर्तीचे अवलोकन केले असता, वेदरशेडची परवानगी ही ०३ महिन्याच्या कालावधीकरिता देण्यात येते. तद्नंतर दिलेल्या परवानगीस मुदतवाढ घेण्यात येत नाही व इमारतीवरील वेदरशेड काढणेत येत नाहीत. त्यामुळे वेदरशेड काढून टाकण्याबाबत महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त होत आहेत.

इमारतीच्या टेरेसवर वेदरशेड उभारल्यानंतर कोणतीही सोसायटी व इमारतधारक हे आयर्न ॲन्गल, पाईप व लोखंडी पत्रे, इ. साहित्याचा वापर करुन वेदरशेड उभे केले जातात. त्यामुळे ०३ महिन्याचा परवानगी कालावधी संपुष्टात आल्यानंतर वेदरशेड काढून ठेवणे व पुन्हा परवानगी प्राप्त करुन वेदरशेड उभारणे ही बाब निश्चितच इमारतधारकांना खर्चिक व अडचणीची आहे. त्यामुळे विद्यमान धोरणात नमुद अटी व शर्ती क्र. ९, १०, ११, १२ वगळण्यात येत असून नव्याने खालील अटी व शर्तीचा सामावेश करण्यात येत आहेत.

१. वेदरशेडचे जागेत कोणत्याही स्वरुपाचे चटईक्षेत्र (रहिवास, वाणिज्य व अन्य) वापर करता येणार नाही.
२. वेदरशेडचे जागेस महानगरपालिकेकडून कर आकारणी करण्यात येणार नाही.

01/2/2014 11:15
मा. महासभा
सभा नोंद क्र. ५३

३. महानगरपालिकेस आवश्यकता वाटल्यास परवानगी रद्द करण्यात येईल व वेदरशेड काढून टाकण्यात येईल.

४. सदरची परवानगी ही तात्पुरती स्वरुपाची असल्यामुळे सदर परवानगीचे नुतनीकरण / मुदतवाढ प्रथम परवानगी दिलेल्या दिनांकापासून तीन वर्षाचा कालावधी संपुष्टात येण्यापूर्वी नुतनीकरण / मुदतवाढ प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील अन्यथा वेदरशेडचे महानगरपालिकेकडून विनासुचना / विना नोटीस काढून टाकण्यात येईल.

सद्यस्थितीत रहिवास इमारत एका विंगकरिता अनामत ठेव रक्कम रु.५,०००/- व वेदरशेड शुल्क रु.२,५००/- याप्रमाणे आकारणी करण्यात येते. यामध्ये अनामत ठेव रक्कम रु.१०,०००/- व वेदरशेड शुल्क रु.५,०००/- प्रतीवर्ष याप्रमाणे बदल प्रस्तावित करण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

मा. महासभा दि :-११/02/२०१४

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ९०

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३५ शाळा असुन त्यापैकी इयत्ता १ ते ४ थी चे ३२४, इयत्ता १ ते ५ वी चे १२६, १ ते ७ वी चे ८४२२ असे दि.३० सप्टेंबर २०१३ च्या पटसंख्येनुसार एकुण ८८७२ विदयार्थी-विदयार्थीनी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात १०% संभाव्य वाढ लक्षात घेवून एकुण अंदाजे १०,००० पर्यंत पटसंख्या अपेक्षित आहे. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये विदयार्थी-विदयार्थीनींना शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश-टाय सह (प्रत्येकी-२), बुट-मोजे, वहया, बॅग, पाण्याच्या बाटल्या इत्यादी पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे. मनपा शाळेतील विदयार्थी-विदयार्थीनींना सदर धोरणानुसार सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे. सबब साहित्य खरेदी करण्याकरीता मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळावी ही विनंती.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त मि. ६/२/५८

[illegible] दु. १२.२०९१.

६/२/५८

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१४

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ९१ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीच्या स्ट्रीट लाईट पोलचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरूस्ती करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रिलायन्स इन्फ्रा. मार्फत स्वखर्चाने स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात येऊन त्यांची देखभाल व दुरूस्ती देखिल त्यांच्यामार्फतच केली जाते. सन २००७ ते २०१० या काळात रिलायन्स इन्फ्रा. लि. यांनी झोपडपट्टी व ३.०० मीटर रूंदीपेक्षा कमी असलेल्या रस्त्यांवर स्ट्रीट लाईट पोल बसविण्याचे काम बंद केल्याने त्या दरम्यान महानगरपालिकेमार्फत स्वतः खर्च करुन स्ट्रीट लाईट पोल बसविण्यात आले आहेत. तसेच चेणा, काजूपाडा भागात, फाउंटन हॉटेल ते ठाणे मनपा जकात नाका पर्यंतच्या रस्त्यावर महानगरपालिकेमार्फत स्ट्रीटलाईट पोल बसविण्यात आलेले आहेत. सदर भागात महावितरणामार्फत वीजपूरवठा केला जात आहे. मागिल वर्षी मागविलेल्या निविदाची मुदत ०९/०१/२०१४ पर्यंत आहे. सदर स्ट्रीट लाईट्स पोलची देखभाल दुरूस्ती कामी सक्षम मान्यता घेऊन निविदा मागवून कार्यादेश देणे आवश्यक आहे. सदरची कार्यवाही दि.०९/०१/२०१४ पूर्वी पूर्ण करून कार्यादेश देणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत १८१२ स्ट्रीट लाईट पोल व २०७० लाईटस् आहेत. सदर कामासाठी रु. ७५.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदर पोलची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे कामी वरील प्रमाणे येणाऱ्या खर्चास व वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास, आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-2/DK/2013-14/MG 6

गोषवारा प्राप्त दि. 03/02/२०१२
वेळ - ११:०० वा.

मा. महालेखा गोषवारा
रजिस्टर नोंद क्र.: ५५

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१४

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ९२ )** :- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या "भाडे तत्वावरील घरे" या योजनेतून महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या सदनिकांचे वाटप धोरण निश्चित करणे बाबत..

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मार्फत मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये "भाडे तत्वावरील घरे" (रेन्टल हाऊसिंग स्कीम) ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये विशिष्ट आकारमानाच्या बांधल्या जाण्याऱ्या सदनिका या भाडेतत्वावर वितरित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे संबंधित विकासकाकडून विनामुल्य हस्तांतरित केल्या जातात. या महानगरपालिका हद्दीमध्ये सद्यस्थितीत काही योजना पुर्णत्वास येत आहेत व त्यातुन आवश्यक सदनिका मुंबई महानगर प्रदेशिक प्राधिकरणाकडे विनामुल्य हस्तांतरित होणार आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये काही इमारती धोकादायक म्हणून घोषित झालेल्या असून त्यांची तपासणी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या "बांधकाम अभियंता" यांनी शिफारस केल्यानुसार अशा इमारती रिक्त करुन पुर्नबांधणी करणे किंवा रिक्त करुन दुरुस्ती करणे आवश्यक आहे तथापी, अश्या इमारती धोकादायक घोषित झाल्या असल्या तरीही वारंवार सुचना देऊनही सदर इमारती रिक्त करण्यास रहिवासी विरोध करतात व ते पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करतात. महानगरपालिकेतर्फे दि.२७/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये राज्यशासन व मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सदर प्राधिकरणामार्फत "भाडे तत्वावरील घरे" या योजनेतून मधून उपलब्ध होणारी घरे, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील धोकादायक इमारती मधील रहीवाशांना तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली होती. त्याअनुषंगाने नगरविकास विभागाने क्र. टि.पी.एस.-१२१३/९०५१/प्र.क्र.१२१/१३/नवि-१२ दि. २२ ऑगस्ट २०१३ रोजीच्या पत्रान्वये, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना "भाडेतत्वावरील घरे" या योजनेतुन उपलब्ध होणाऱ्या सदनिकांपैकी सर्व साधारणपणे ५०% सदनिका संक्रमण निवासस्थान म्हणुन वापरण्यासाठी संबंधित महानगरपालिकांना उपलब्ध करून देण्याबाबत कळविलेले आहे.

सदर शासन पत्रान्वये अतिधोकादायक, धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतीच्या रहीवाशांना तात्पुरत्या निवाऱ्यासाठी संक्रमण निवास म्हणून भाडे तत्वावर देण्यासाठी सदर

सदनिकांचे भाडे मा. आयुक्त यांनी निश्चित करावयाचे आहे. सदर भाडे महानगरपालिकेने वसूल करून त्यामधून प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून सदर इमारतीची देखभाल व दुरुस्ती करावयाची आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "भाडेतत्वावरील घरे" या योजने खाली पाच गृहबांधणी प्रकल्प सुरु आहेत. सदर प्रकल्पामधून एम.एम.आर.डी.ए ला १४.८६ चौ मीटर (१६०.०० चौ.फूट) क्षेत्राच्या ४६७० सदनिका प्राप्त होणार आहेत. राज्य शासनाकडील पत्रानुसार सदर सदनिका पैकी ५० टक्के पर्यंत सदनिका एम.एम.आर.डी.ए यांनी महानगरपालिकेस धोकादायक इमारतीमधील रहिवाशांकरीता संक्रमण निवासस्थान म्हणुन रु. १/- प्रति चौमीटर एवढया नाममात्र वार्षिक भाडयाने ३० वर्षाकरीता भाडे तत्वावर उपलब्ध करुन दयावयाच्या आहेत.

सदर सदनिकांचे सन २०१२-१३ बाजारभाव (रेडी रेकनर) नुसार रु. ६७२९/- प्रतिमाह एवढे भाडे होत आहे. प्रत्यक्षात सदर सदनिका, इमारत परिसर यांची देखभाल, सुरक्षा, साफ सफाई, लिफ्टमन, सार्वजनिक वापराचे विजबिल व मालमत्ता कर या बाबीवर खर्च होणार असून सदर खर्च रहीवाशाकडुन वसूल करावयाचा आहे. सदर खर्च हा सरासरी रु. २५००/- एवढा अपेक्षित आहे. सदनिका धारकाकडुन घेण्यात येणाऱ्या भाडयामधूनच सदर इमारतीची देखभाल दुरुस्ती महानगरपालिकेस करावयाची आहे. तथापी पाणी बील व वीजबील सदनिका धारकांनी भरावयाचा आहे. सदर सदनिका धोकादायक इमारतीमधील रहीवाशांना वितरीत करताना हमीपत्र व करारनामा करावा लागणार असून त्यादृष्टीने खालील प्रमाणे अटीशर्ती निश्चित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) सदर सदनिकाचे मासिक भाडे रु. ६७२९/- प्रति सदनिका असेल.

२) अ) सदर सदनिकेचा वापर केवळ तात्पुरत्या निवासासाठी होणार असल्याने या ठिकाणी वाढीव / अतिरिक्त बांधकाम, वाढीव लाईट फिटींग, विजेचा अवाजवी वापर, पाण्याचा अनावाश्यक वापर इ. बाबी कटाक्षाने टाळुन सदर परिसर स्वच्छ ठेवावयाचा आहे. या सदनिकेचा वापर भोगवाटादाराने स्वतःच्या रहिवासासाठीच करावयाचा असून ती कोणत्याही इतर व्यक्तीस भाडयाने किंवा अन्य मार्गाने हस्तांतरीत करता येणार नाही. किंवा तिचा व्यावसायिक वापर करता येणार नाही, सदर अटींचा भग केल्याचे आढळल्यास किंवा भाडयाची रक्कम व इतर देय रक्कम तीन महिन्याचे वर थकविल्यास सदनिका वाटप आदेश रद्द करण्यात येऊन ती महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल.

ब) या सदनिकेसाठी वापरण्यात येणाऱ्या विद्युत व पाणी वापराचे देयक भोगवटादाराने भरावयाचे आहे.

क) आवश्यकता भासल्यास महापालिका इतर ठिकाणच्या संक्रमण शिबीरातील सदनिकांमध्ये सदर भोगवटारास स्थलांतरीत करणेचे अधिकार महानगरपालिकेकडे असतील.

ड) सदर वाटप केलेल्या सदनिकांचे आवश्यकतेनुसार अथवा दर ६ महिन्यांनी थर्डपार्टी सोशल ऑडीट (सामाजीक लेखापरिक्षण) करण्यात येईल तसेच सदनिका धारकांची उपस्थिती बायोमेट्रीक पध्दतीने तपासण्यात येईल.

इ) एका कुटुंबास एकाच सदनिकेचा ताबा देण्यात येईल.

ई) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कुटुंबातील पती / पत्नी अज्ञान मुले व त्याच्या अविवाहीत मुलींचे नावे इतर ठिकाणी घर सदनिका असल्यास ते असे सदनिका मिळण्यास पात्र ठरणार नाहीत.

३) अशा सदनिका धारकांचे मुळ इमारतीमधील निवासाचे हक्क कायमस्वरुपी अबाधीत ठेवून सदरचे स्थलांतरण करण्यात येणार आहे.

४) धोकादायक इमारतीत जे रहिवाशी सदर इमारत धोकादायक / अथवा मानवी वस्तीस अपात्र घोषीत करण्यात आलेल्या दिनांकास, ११ महिन्याच्या लिव्ह लायसन्सवर अथवा भाडेतत्वावर रहात असतील, त्यांना सद्यस्थितीत मानवतेच्या दृष्टीकोनातुन व इमारत संपुर्णपणे निष्कासन होण्याच्या दृष्टीने या योजनेमध्ये संक्रमण निवासस्थानात स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

५) येत्या पावसाळयानंतर रिक्त राहणाऱ्या सदनिका हया महापालिकेचे मंजुर राज्य व केंद्र शासनाच्या गृहबांधणी प्रकल्प मिशन कालावधीत पुर्ण होणेकरीता त्यांचा वापर करणेस परवानगी देता येईल.

६) "भाडे तत्वावरील घरे" प्रकल्पामध्ये प्राप्त झालेल्या इमारती, आणि परिसराची देखभाल व दुरुस्ती, लिफ्ट देखभाल दुरुस्ती, सार्वजनिक विजेच्या वापरासंबंधीचे कामे, मोकळी जागा व उद्यान, पार्किंग परिसर, पॅसेजेस, साफसफाई, सुरक्षा रक्षक व लिफ्टमन इत्यादी दैनंदिन हाऊसकीपींगच्या कामासाठी महानगरपालिकेमार्फत निविदा मागविण्यात येतील व निविदा अंतीम होईस्तोवर सदरची कामे महानगरपालिके तर्फे सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने करण्यात येतील. यासाठी नवीन लेखाशिर्ष तयार करुन पुढील कार्यवाही करण्यात यईल.

७) सदर सदनिकांचे वाटप लॉटरी पध्दतीने करण्यात येतिल.

८) एकुण प्राप्त सदनिका मधील २५ % सदनिका महानगरपालिकेकडे आपतकालिन स्थितीत रहिवाशांच्या व्यवस्थेसाठी राखुन ठेवण्यात याव्यात.

९) .　सदर सदनिका हस्तांतरीत करण्यासाठी ३ वर्षासाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स (करारपत्र) करुन सदर कालावधी मुळ दिनांकापासुन जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत सिमित असेल.

१०)　सदरचे धोरण मा. महासभेने मंजुरी दिलेल्या दिनांकापासुन अंमलात येईल.

वरील प्रमाणे सदनिकांचे भाडे, देखभाल दुरुस्तीचा घ्यावयाचा खर्च व धोरण निश्चित करण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC-1/DK/2013-14 /MG 1

मा. महासभा गोषवारा प्राप्त
दि. ०३/०२/२०१४
वेळ : ११:२५

मा. महासभा गोषवारा
रजिस्टर नोंद क्र. ब्रु. ५६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/०२/२०१४

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ९३ )** :- महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी सुविधांच्या विकास कामासाठी विशेष अनुदान उपलब्ध करुन निर्णय घेणे.

शासन निर्णय क्र. जी ई एन -- २०१३/प्र.क्र २९५/नवि-१६, दि.०३/१२/२०१३ अन्वये विकास कामांसाठी अनुदान उपलब्ध होणार आहे. सदर कामाकरीता मा. श्री. गिल्बर्ट जॉन मेडोन्सा, मा. श्री. प्रताप सरनाईक व मा. श्री. मुझफ्फर हुसेन या तीन सन्माननीय आमदारांनी निधी करीता शासनाकडे मागणी केलेली होती. त्याअनुशंगाने संदर्भिय शासन निर्णय पारीत झालेला आहे. सदर कामासाठी मागणी करण्यात आलेला निधी व वितरीत करावयाची रक्कम याचा तपशिल जोडला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मागणी केलेला निधी (रु. लाखात) | वितरीत करावयाची रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) येथे नवीन विसर्जन घाट बांधणे. | रु.१५०.०० | रु. ६०.७५ |
| २ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. ३५५ या जागेत नागरिकांच्या सोयी सुविधाकरीता कम्युनिटी हॉल व इतर आवश्यक सोयीमुक्त इमारती बांधणे. | रु.३००.०० | रु. १२१.५ |
| ३ | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट सर्कल येथे रस्ता ओलांडण्यासाठी फुट ओव्हर ब्रीज बांधणे. | रु.१५०.०० | रु.६०.७५ |
| ४ | भाईंदर (प.) पोलिस स्टेशन समोरील रस्ता, नगरभवन व पुढे मॅक्सस पोलीस चौकी पर्यंत कॉंक्रीटचा रस्ता तयार करणे. | रु.४००.०० | रु.१६२.०० |
| ५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. १३ मधील सर्व्हे क्र. ११७ नवघर तलावानजीक क्रिडांगण विकास करणे. | रु.१५.०० | रु.६.०७५ |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ४५ मधील माशाचा पाडा जरीमरी तलावाभोवती सुशोभित कुंपण, आसने झाडांची लागवड, ट्री गार्ड, कचरा पेटी बांधणे. | रु.१५.०० | रु. ६.०७५ |
| ७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ७ मधील शिवज्योत बिल्डींग समोरील कॉर्नर व कस्तुरी पार्क जवळील रिकाम्या जागेवर ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी आसने व छतासहित वाचनालय बांधणे. | रु.१०.०० | रु.४.०५ |
| ८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ७ आरक्षण क्र. १०८ मधील साईबाबा नगर, अयप्पा मंदिराच्या मागील परिसरात भाजी मार्केट व समाज मंदिर उभारणे. | रु.२५.०० | रु.१०.१२५ |
| ९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ७ नवघर रोड स्नेहा हॉस्पीटलच्या कॉर्नरवर ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी आसने व छतासहित वाचनालय बांधणे. | रु.१०.०० | रु.४.०५ |
| १० | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ७ साईबाबा नगर परिसरातील हॉलीक्रॉस समाजमंदिर उभारणे. | रु.२०.०० | रु.८.१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ८ कविता बिल्डींगच्या शेजारील जागेत व्यायाम शाळा व समाजमंदिर उभारणे. | रु.२०.०० | रु.८.१ |
| १२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ७४ वरसावे गांव मौजे चेणे येथील स्मशानभूमीच्या सुशोभिकरण करणे. | रु.१०.०० | रु.४.०५ |
| १३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. १४ हनुमान नगर येथील व्यायाम शाळेत साहित्य पुरविणे. | रु.१०.०० | रु.४.०५ |
| १४ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ११ नवघर स्मशानभूमी पुर्नबांधणी व सुशोभिकरण करणे. | रु.२०.०० | रु.८.१ |
| १५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ११ गावदेवी मंदिर येथे खुला रंगमंच आणि समाजमंदिर बांधणे. | रु.२५.०० | रु. १०.१२५ |
| १६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र. ११ शिवशक्ती नगर येथील साईश्रध्दा चाळ जवळ २० आसनी शौचालय बांधणे. | रु.२०.०० | रु.८.१ |
| १७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १४६ ओवळा माजीवडा मतदार संघातील रस्ते विकास करणे. | रु.२५.०० | रु.१०.१२५ |
| १८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १४६ ओवळा माजीवडा मतदार संघातील रस्त्याच्या बाजुची गटारे बनवणे. | रु.२५.०० | रु.१०.१२५ |
| १९ | मिरा भाईंदर मुख्य रस्ता ते सुंदर नगर अंतर्गत रस्त्याची उंची वाढवणे व चेकर्ड बसविणे. | रु.१०.०० | रु.४.०५ |
| २० | मिरा भाईंदर मुख्य रोड ते गोल्डन नेस्ट फेस – २ ते ६ समोरील रस्त्याची उंची वाढवणे व गटार बांधणे. | रु.१०.०० | रु.४.०५ |
| २१ | इंद्रलोक फेस -३ मधील मुख्य रस्त्याची उंची वाढवणे व गटार बांधणे. | रु.१०.०० | रु. ४.०५ |
| २२ | नविन गोल्डन नेस्ट मुख्य रस्ता ते गोल्डन इगल इमारतीपर्यत रस्त्याची उंची वाढविणे व डांबरीकरण करणे. | रु.१०.०० | रु.४.०५ |
| २३ | रोझ वुड टॉवर ते आकाश टॉवर पर्यत रस्ता व गटार बनविणे. | रु.१०.०० | रु.४.०५ |
| २४ | प्रभाग क्र. ३१ इंद्रलोक फेस ३ मधील मैदान विकसीत करणे. | रु.२५.०० | रु.१०.१२५ |
| २५ | आरक्षण क्र. ३०० येथे कम्युनिटी सेंटर बांधणे. | रु.२०.०० | रु.८.१ |
| २६ | आरक्षण क्र. ३५५ येथे कम्युनिटी सेंटर बांधणे. | रु.२५.०० | रु.१०.१२५ |
| २७ | ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांकरीता निधी. | रु.३०.०० | रु. १२.१५ |

वरील कामांची अंदाजपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यतेसह मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे पाठवावयाची आहेत. तसेच सदर कामांवर ५०% रक्कम महानगरपालिका करणार असल्याबाबतचा मा. महासभेचा ठराव मा. जिल्हाधिकारी व मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग, यांचे कडील पाठवावयाचा आहे. जेणे करून जिल्हा स्तरीय समितीची बैठक घेऊन कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करून शासनास निधी वितरीत करता येईल. वरील प्रस्तावातील कामांसाठी उर्वरीत निधी उपलब्ध करून देण्यास विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

(सही)

आयुक्त

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा गोषवारा प्राप्त
दि. ०३/०५/२०१८
वेळ = ११:४५

मा. महासभा गोषवारा
रजिस्टर नोंद अ.क्र. ५१

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/२/२०१४

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. :- ९४**

**विषय :- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (National Urban Health Mission) कार्यक्रम महानगरपालिका हद्दीत राबविण्यास मंजुरी मिळणेबाबत.**

शहरातील झपाटयाने वाढणारी लोकसंख्या व तेथे उपलब्ध असलेल्या अपुऱ्या वैद्यकीय सोयी-सुविधा लक्षात घेऊन केंद्र शासनाने राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०१३-१४ पासून सदर अभियान सुरु करण्यात येत आहे.

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) सन २०१३-१४ तयार करण्यासाठी राज्यातील प्रत्येक महानगरपालिकांसोबत दि. १७ जून ते २८ जून २०१३ या कालावधीत राज्य स्तरावर वैयक्तिक चर्चा आयोजित करण्यात आली होती. सदर चर्चेमध्ये अंमलबजावणी आराखडयाबाबत करण्यात आलेल्या सविस्तर मार्गदर्शनानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (Programme Implimentation Plan) तयार करण्यात आलेला आहे.

सदर अभियान राबविण्याकरिता आवश्यक असलेल्या निधी पैकी ७५ टक्के निधी केंद्र शासन व २५ टक्के निधी राज्य शासनातर्फे देण्यात येणार आहे. या अंतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन आरोग्य केंद्रे चालू करणे व आरोग्य विषयक विविध कार्यक्रम राबविण्यासाठी निधी प्राप्त होणार आहे. सदर कार्यक्रमांतर्गत नवीन उभारावयाच्या आरोग्य केंद्रांसाठी जागा उपलब्ध करून देणे, त्यांची स्थान निश्चिती करणे, शासनाच्या मार्गदर्शक सुचनांन्वये प्रकल्प अंमलबजावणी आराखडा बनवून आवश्यकते नुसार त्यात फेरफार करणे, प्रत्येक वर्षी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (PIP) बनवून मंजूरीकरिता शासनाकडे पाठविणे इत्यादींसाठी मा. महानगरपालिका आयुक्त यांना अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) राबविणेस व त्या अंतर्गत वेळोवेळी आवश्यक ते निर्णय घेण्यास मा. आयुक्त यांना अधिकार देण्यास मा. महासभा मंजुरीस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

अग्रेषवारा प्राप्त दि. ~~2.15~~
दि- 29/11/2014 दुपारी - 4.15